

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# विद्यावार्ता

फेब्रुवारी २०२६

ई- मासिक

## बेचाळिसावा दीक्षांत समारंभ








विशेषांक

# विद्यावार्ता
ई - मासिक

# अनुक्रमणिका



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्गदर्शक

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in


- विद्यापीठाचा ४२ वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न ... १
- राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत आठ पारितोषिकांसह विद्यापीठ तिसऱ्या स्थानावर ... ५
- अजिंक्य पोटे याला आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धेत प्रथम क्रमांक
- भौतिकशास्त्र विभागाची कु. साक्षी चोपकरला प्रथम महिला कुलगुरू डॉ. कमलसिंग सुवर्ण पदक } ... ६
- सॉफ्टबॉल महिला स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन ... ७
- विद्यापीठाचा आव्हान स्पर्धेमध्ये विजय घोष ... १०
- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केला महिला संघाचा सत्कार ... ११
- विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन ... १३
- खेलो इंडिया स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र ... १८
- आविष्कार स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा कुलगुरुंच्याहस्ते सत्कार ... १९
- श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न ... २०
- कु. श्रावणी रोटे हिचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते सत्कार ... २१
- नेट परिक्षेत पद्व्यत्तर मराठी विभागाच्या यशाची परंपरा यंदाही कायम ... २२
- विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरव्दारा वक्तृत्व स्पर्धा संपन्न ... २३
- वुमेन्स स्टडीज सेंटरच्या विद्यार्थ्यांची पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेलला क्षेत्र भेट ... २४
- ड्रॅगनफ्लाय व कॅमेरा ट्रॅपिंग विषयावर व्याख्यान संपन्न ... २५
- मेळघाटातील विविध गावांमध्ये जनजागृती मोहिम ... २६
- ग्लोबल विमेन्स ब्रेकफास्ट -२०२६ कार्यक्रम उत्साहात संपन्न ... २७
- विद्यापीठात ह्दयविकार व सीपीआर तंत्रावर प्रशिक्षण संपन्न ... २८
- आंतर विभागीय क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन ... ३०
- विद्युत विभागात एलईडी लॅम्प फॅब्रिकेशन कार्यशाळा संपन्न ... ३१
- एक दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम संपन्न ... ३३
- विद्यापीठात वाङ्‌वनिता संस्कृत साहित्य संमेलन संपन्न ... ३४
- विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारिरीक शिक्षण विभागाचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत ... ३५
- फिजिक्स ऑफ रेनफॉरेस्ट इकॉलॉजी विषयावर व्याख्यान संपन्न ... ३६
- भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची स्टारका उद्योग समुहाला शैक्षणिक भेट ... ३७
- विद्यापीठात क्लाऊड आणि जनरेटिव्ह ए.आय. वर तांत्रीक कार्यशाळा संपन्न ... ३८
- विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यान संपन्न ... ३९
- विद्यापीठात श्री संत मारोती महाराज व्याख्यानमाला संपन्न ... ४१
- विद्यापीठात सेवानिवृत्ती कार्यक्रम संपन्न ... ४३
- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांची मुलाखत ... ४५
- केमीकल टेक्नॉलॉजी व विद्यार्थी विकास विभागाचा उपक्रम ... ५१
- विद्यापीठात झुंबा व योग कार्यक्रम उत्साहात साजरा ... ५२
- क्रीडा विशेष ... ५३
- जयंती विशेष ... ६७
- बातमी कात्रणे ... ६९

# विद्यापीठाचा ४२ वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न




## युवाशक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख

## जनरल मनोज पांडे यांचे प्रतिपादन


दीक्षांत भाषण करतांना जनरल मनोज पांडे

'तरुण पिढी ही केवळ देशाचे नागरिक नसून ती भारताच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग आहे. येणा-या काळात विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तुम्हा तरुणांच्या खांद्यावर असेल, युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचे प्रेरणादायी उद्‌गार भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर.एम. कडू, श्री हर्षवर्धन देशमुख, डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. आर.डी. सिकची, डॉ. व्ही.एच. नागरे, डॉ. व्ही.एम. मेटकर, डॉ. विद्या शर्मा, डॉ. ए.एम. बोर्डे, डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, अधिष्ठाता डॉ. अरूण हरणे, डॉ. एच. आर. देशमुख, डॉ. मोना चिमोटे, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे, तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ. व्ही.आर. मानकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

जनरल मनोज पांडे यांनी या प्रसंगी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी 'तीन सी' चा मंत्र दिला. चरित्र, क्षमता आणि आचरण हे यशाचे तीन आधारस्तंभ आहेत. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि नैतिक धैर्य हे उत्तम माणसाचे लक्षण आहे. विद्यार्थ्यांनो हेच गुण तुम्हाला योग्य मार्ग निवडण्यास मदत करतील. आपल्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्य सतत अद्ययावत ठेवा. आयुष्यभर शिकण्याची वृत्ती जोपासा. शिस्त, सांघिक कार्य आणि सहानुभूती या गुणांमुळे तुम्ही समाजात वेगळी ओळख निर्माण करू शकाल. बदलाचा स्वीकार करा. ते पुढे म्हणाले, प्रगती ही बदलाशी जोडलेली असते. जुन्या विचारसरणीला आव्हान देऊन नवनवीन कल्पनांचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. 'केवळ प्रयत्न करून थांबू नका, तर परिणामांवर आणि सकारात्मक परिणामांवर लक्ष केंद्रित करा,' असा मोलाचा सल्लाही

आजच्या तांत्रिक युगावर भाष्य करताना ते म्हणाले की, तंत्रज्ञान आपली क्षमता वाढवत असले तरी, भावनिक बुद्धिमत्ता आणि मानवी मूल्ये यांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही. तंत्रज्ञानाचा वापर करताना माणुसकी विसरू नका. यावेळी जनरल पांडे यांनी विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षकांच्या आणि प्राध्यापकांच्या असलेल्या भूमिकेचे विशेष कौतुक केले. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मार्गदर्शक तारे आहेत, जे त्यांना जीवनाच्या प्रवासात योग्य दिशा दाखवतात, असे त्यांनी आवर्जून सांगितले. शेवटी, तुम्ही ज्ञानाचे दूत आणि बदलाचे वाहक म्हणून जगात वावरा. देशाच्या प्रगतीची मशाल तुमच्या हातात आहे, असेही त्यांनी युवकांना सांगितले.

नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेर परसोपंत येथील कु. निकीता किशोर पुनसे या विद्यार्थीनीने ०६ सुवर्ण पदके व १ रोख पारितोषिक, आर.ए. कला, एम.के. वाणिज्य व एस.आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील कु. पल्लवी बालकृष्ण राठोड या विद्यार्थीनीने ०५ सुवर्ण पदके व ०१ रौप्य, श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव येथील कु. तेजस्विनी विठ्ठल भगत आणि विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील कु. साईश्वरी सत्यजित इंदुरकर या विद्यार्थीनीने प्रत्येकी ०४ सुवर्ण पदके प्राप्त केली आहेत. दीक्षांत समारंभात या विद्यार्थीनींना मान्यवरांच्या हस्ते पदके व रोख पारितोषिके देवून गौरवान्वित करण्यात आले. दीक्षांत समारंभात ८० टक्के पदके मुलींना, तर २० टक्के पदके मुलांना मिळाली.

**डॉ. कमलताई गवई यांना डी. लीट**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभामध्ये डॉ. कमल रामक्रिष्ण गवई यांना मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयात वाङ्मय पंडित (डी.लीट) या सर्वोच्च पदवीने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी त्यांच्या सन्मानार्थ गौरवोद्घोषाचे वाचन करण्यात आले.

या दीक्षांत समारंभात विद्याशाखानिहाय ४६६ संशोधकांना आचार्य पदवी देवून सन्मानित करण्यात आले. पदके प्राप्त करणा–यांमध्ये निकीत टिकैत या दिव्यांग विद्यार्थ्याचा सुध्दा समावेश आहे. या प्रसंगी अधिष्ठात्यांनी पदवीकांक्षी व आचार्य पदवीकांक्षींना सादर केले. यावेळी कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना अनुग्रह दिला.


अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

**कृत्रिम बुध्दिमत्तेशी जुळवून घेत विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे पादक्रांत करावीत : कुलगुरू**

'आजचे युग हे 'ए.आय.' अर्थात कृत्रिम बुध्दिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या बदलांना घाबरून न जाता नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. एआय हे रोजगाराची नवीन दालने उघडणारे तंत्रमित्र ठरेल,' असे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मिलींद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषण करतांना व्यक्त केले. विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते.

विद्यापीठाशी सध्या ४५१ महाविद्यालये संलग्न असून सुमारे दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावर्षी ४२,३१७ विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. बदलत्या काळानुसार विद्यापीठाने पदवी स्तरावरील सर्व विद्याशाखांच्या अभ्यासक्रमात 'ए.आय.'चा अनिवार्य घटक म्हणून समावेश करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. विद्यापीठाने संशोधनात मोठी झेप घेतली असून, यावर्षी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटंट मिळवण्यासह एकूण १२ पेटंट्सवर मोहोर उमटवली आहे. विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून अभ्यासक्रम अद्ययावत करण्यावर सतत भर दिला जात आहे. 'इंद्रधनुष्य' सारख्या इतरही आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये आणि खेलो इंडिया, सॉफ्ट बॉल स्पर्धा सारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचे कुलगुरूंनी कौतुक केले. संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचे पालन करत विद्यापीठ गरजू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका'



डॉ. कमलताई गवई यांना डी.लीट. पदवीने सन्मानित करतांना मान्यवर

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, विद्यापीठ गीत व सरस्वती स्तवनाने दीक्षांत समारंभाची सुरुवात झाली. पाहुण्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अतिथींचा परिचय करुन दातृनामावलीचे वाचन केले. संचालन डॉ. सुलभा पाटील व डॉ. प्रणव कोलते यांनी केले. पसायदानाने व राष्ट्रगीताने दीक्षांत समारंभाची सांगता झाली. कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री भूषण गवई, महात्मा गांधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही.एस. जामोदे, डॉ. प्रसाद वाडेगावकर, माजी कुलसचिव डॉ. वंदन मोहोड, प्रा. सी.डी. देशमुख, डॉ. बी.आर. वाघमारे, डॉ. तुषार देशमुख तसेच डॉ. श्वेता मिलींद बारहाते, प्रा. स्वाती महेंद्र ढोरे व सौ. ओजस्विनी अविनाश असनारे तसेच एन.सी.सी.चे अधिकारी, शासकीय अधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सर्व सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, पाचही जिल्ह्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थी, आचार्य पदवीधारक, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक याशिवाय शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने



कु. निकिता पुनसे या विद्यार्थीनीला ०६ सुवर्ण पदके व ०१ रोख पारितोषिक प्रदान करतांना मान्यवर



कु. पल्लवी राठोड या विद्यार्थीनीला ०५ सुवर्ण व ०१ रौप्य पदक प्रदान करतांना मान्यवर



कु. तेजस्विनी भगत या विद्यार्थीनीला ०४ सुवर्ण पदके प्रदान करतांना मान्यवर



कु. साईश्वरी सत्यजित इंदुरकर या विद्यार्थीनीला ०४ सुवर्ण पदके प्रदान करतांना मान्यवर



# राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत आठ पारितोषिकासह विद्यापीठ तिस-या स्थानावर

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आठ पारितोषिकासह तिसरे स्थान मिळिवले आहे.

अजिंक्य पोटे याने शेती व पशू संवर्धन विषयाच्या पी.एचडी. गटातून प्रथम पारितोषिक, कु. रोहिणी कांबे हिने वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा विषयाच्या पदवी गटातून द्वितीय, कु. प्रिया जंजाळकर हिने अभियांत्रिकी व तांत्रिकी विषयाच्या पदव्युत्तर गटातून तृतीय, तर सौरभ श्रीराव याने मेडिसीन ॲन्ड फार्मसी विषयाच्या पदव्युत्तर गटातून तृतीय व राजकुमार जीवतानी याने मानवविज्ञान, भाषा आणि ललित कला विषयाच्या पी.एचडी. गटातून, रोहन बुंदेले याने वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा विषयाच्या पदव्युत्तर गटातून, कु. श्रावणी ठाकरे हिने शुध्द विज्ञान विषयाच्या पदव्युत्तर गटातून, कु. रेणुका येंडे हिने वैद्यकीय आणि औषध निर्माण विषयाच्या पदव्युत्तर गटातून उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त करुन विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. स्पर्धेच्या समारोपीय समारंभात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

स्पर्धेतील पहिल्या टप्प्यात पहिल्या दिवशी पोस्टर व मॉडेल सादरीकरणाच्या माध्यमातून ९०८ स्पर्धकांमधून व सर्व गटातून एकूण २२९ स्पर्धकांची निवड दुस-या दिवशी होणा-या सादरीकरणाच्या टप्प्यासाठी करण्यात आली होती. यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४६ पैकी १८ विद्यार्थ्यांचा समावेश होता. या टप्प्यात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करुन परिक्षकांची मने जिंकलीत. महोत्सवाच्या समारोपीय समारंभामध्ये सर्व विजेत्यांना पारितोषिके व संशोधन फेलोशिप देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, तर प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंग, पद्मश्री तथा प्रगतिशील शेतकरी श्री श्रीरंगदादा लाड होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ८ स्पर्धकांनी विविध पारितोषिके प्राप्त केलीत.

समाजाच्या गरजा ओळखून नवनवीन संशोधन व्हावे, पदवी पासूनच विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण व्हावी व त्यांना संशोधनाची प्रेरणा व प्रोत्साहन देण्यासाठी महामहीम राज्यपालांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात दरवर्षी आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे २८ ते ३१ जानेवारी, २०२६ दरम्यान पार पडला. या महोत्सवात राज्यातील २५ कृषी व अकृषी विद्यापीठांच्या ९०८ विद्यार्थी संशोधकांनी आपला सहभाग नोंदविला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सहा गटातून ४६ विद्यार्थी संशोधक सहभागी झाले होते. चमू सोबत आविष्कार समन्वयक डॉ. मनीषा कोडापे, चमू व्यवस्थापक डॉ. राजेश भोयर, डॉ. नीरज घनवटे, डॉ. जयंत वडतकर सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी मिळिवलेल्या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, आविष्कार सेलचे सर्व सदस्य, तज्ज्ञ समिती यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील

# विद्यापीठाच्या अजिंक्य पोटे याला आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धेत प्रथम क्रमांक विद्यापीठाच्या गौरवात भर



अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्लीच्यावतीने आंतरराष्ट्रीय संशोधन महोत्सव 'अन्वेषण-२०२६' ही आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धा शूलिनी विद्यापीठ, सोलन (हिमाचल प्रदेश) येथे नुकतीच पार पडली. या संशोधन महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संशोधक विद्यार्थी श्री. अजिंक्य पोटे याने प्रथम क्रमांक प्राप्त करून विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यापीठाच्या गौरवात भर पडली आहे.

अजिंक्य पोटे याने ॲग्रिकल्चरल सायन्सेस या विभागात उत्कृष्ट संशोधन सादरीकरण करुन प्रथम क्रमांक पटकाविला. त्याच्या प्रकल्पाचे परीक्षक समितीने विशेष कौतुक केले. राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलडाणा येथील पीएच.डी. संशोधक असलेला श्री अजिंक्य पोटे याने या प्रतिष्ठित स्पर्धेत यश मिळिवले आहे.

**कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले अभिनंदन**

श्री अजिंक्य पोटे याने आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळिवल्याबद्दल आणि त्याच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी श्री अजिंक्य पोटे याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा

---

# विद्यापीठ भौतिकशास्त्र विभागाची कु. साक्षी चोपकरला प्रथम महिला कुलगुरू डॉ. कमल सिंग सुवर्ण पदक



कु. साक्षी चोपकर

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागाची विद्यार्थीनी कु. साक्षी गजानन चोपकर हिने विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत पदव्युत्तर पदार्थ विज्ञान विभागातून विज्ञान पारंगत (पदार्थ विज्ञान) प्रथम क्रमांक पटकाविला आहे. विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभात कु. साक्षी हिला डॉ. कमलसिंग प्रथम महिला कुलगुरू सुवर्ण पदक प्रदान करण्यात येणार आहे. या सुवर्ण पदकासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या माजी प्रथम कुलगुरू डॉ. कमलसिंग यांनी दाननिधी दिलेला आहे.

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी नियमितपणे उच्च स्तरावर काम करीत असतात. त्यामुळे विभागात संशोधनाची गुणवत्ता व शिस्त कायम राहते. विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये भाग घेत असल्यामुळे ते नवे संशोधन करत, जागतिक पातळीवर कार्य करण्यास सक्षम होतात. भौतिकशास्त्र विभागात विद्यार्थ्यांकरिता अत्याधुनिक प्रयोगशाळा व तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध आहेत. विभागातील विज्ञान स्नातकोत्तर भौतिकशास्त्र हा अभ्यासक्रम करून विद्यार्थी वैज्ञानिक, रेडिओलॉजिस्ट, हवामान शास्त्रज्ञ, फॉरेन्सिक लॅबमध्ये विश्लेषक, आयएएस, वायरलेस स्ट्रीममध्ये पोलीस अधीक्षक, प्राध्यापक, व्याख्याते, शिक्षक, दूरसंचार अधिकारी म्हणून नियुक्त झालेले आहेत. कु. साक्षी हिच्या यशाबद्दल कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे तसेच विभागातील प्राध्यापक, संशोधक, शिक्षकवृंद, विद्यार्थ्यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अमरावतीमध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

## १८ विद्यापीठांचा सहभाग



अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला)स्पर्धा २०२५-२६' चे भव्य उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. सॉफ्टबॉलच्या इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांच्या राष्ट्रीय स्पर्धा एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी आयोजित करून अमरावतीने एक नवा इतिहास रचला आहे.

उद्घाटन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री आशिष येरेकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, संस्थेचे कोषाध्यक्ष श्री दिलीपबाबू इंगोले, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, महाराष्ट्र सॉफ्टबॉल असोसिएशनचे सहसचिव डॉ. सुरजसिंह येवतीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे, डॉ. श्वेता बारहाते, डॉ. सौ स्वाती ढोरे, सौ. निर्मलाताई हर्षवर्धन देशमुख, सौ प्रेरणाताई दिलीपबाबू इंगोले, सौ मीनाताई विजय ठाकरे, शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, सदस्य प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. सतीश पहाडे, डॉ. विकास टोणे, प्राचार्य डॉ. जी व्ही कोरपे, डॉ. रूपाली इंगोले, ए. आय. यु. चे निरीक्षक श्री दिलीप तूरकी, स्पर्धेचे मुख्य परीक्षक श्री मुकुंद देशपांडे आदी उपस्थित होते.

**खेळ माणसांना जोडतो - जिल्हाधिकारी आशिष येरेकर**

प्रमुख अतिथी म्हणून खेळाडूंना संबोधित करताना जिल्हाधिकारी येरेकर यांनी अमरावतीच्या पावन भूमीत सर्व खेळाडूंचे स्वागत केले. ते म्हणाले की, 'अमरावती ही अंबादेवी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांची भूमी आहे. या भूमीने देशाला अनेक नामवंत खेळाडू दिले आहेत. खेळाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, भारतातील विविध राज्यांतून आलेल्या खेळाडूंमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, खेळ हे सर्व प्रांतांना एकत्र जोडण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. 'केवळ शिस्तबद्ध व्यक्तीच आयुष्यात खऱ्या अर्थाने प्रगती करू शकतो.' खेळांमुळे आयुष्यात शिस्त येते. संघभावना आणि स्वतःवरचा विश्वास या गोष्टी खेळामुळे शिकायला मिळतात, ज्यामुळे खेळाडूच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो. पुढील चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील विविध विद्यापीठांचे संघ सहभागी झाले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व महिला खेळाडूंना शुभेच्छा देत त्यांनी देशपातळीवर उत्तम कामगिरी करून देशाचे नाव उज्वल करावे, अशी आशा व्यक्त केली.

श्री दिलीपबाबू इंगोले मनोगत व्यक्त करताना म्हणाले,

अमरावती ही रुक्मिणीची नगरी आणि चिखलदरा हे भीमाचे स्थान (जिथे कीचक वध झाला) असल्याचे सांगून त्यांनी देशभरातून आलेल्या खेळाडूंचे पौराणिक संदर्भासह स्वागत केले. नुकत्याच झालेल्या मुलांच्या स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या असून, आता ६ ते १० तारखेपर्यंत मुलींच्या स्पर्धा चालणार आहेत. हार-जीत पेक्षा एकता आणि खेळाडूवृत्ती महत्त्वाची आहे. प्रत्येकाने 'इंडिया' टीममध्ये खेळण्याचे स्वप्न उराशी बाळगून मैदानात उतरण्याचे आवाहन त्यांनी केले. खेळाडूंच्या राहण्याची आणि जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून, कोणत्याही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणी




मार्गदर्शन करतांना श्री दिलीपबाबू इंगोले

अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी खेळाडूंना संबोधित करताना अमरावतीच्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख केला आणि खेळाडूंना 'टीम स्पिरिट'ने खेळण्याचे आवाहन केले. अमरावती ही अंबाबाई आणि श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी यांची नगरी आहे. त्यामुळे या जिल्ह्याला मातृशक्तीचा मोठा आशीर्वाद आणि परंपरा लाभलेली आहे. या स्पर्धेसाठी देशभरातून आणि विविध राज्यांतून सुमारे ९८ महिलांचे संघ अमरावतीत दाखल झाले आहेत. जरी प्रत्येकाची भाषा आणि पार्श्वभूमी वेगळी असली, तरी सर्वांच्या मनात भारताविषयीचे प्रेम आणि भावना एकच आहेत. 'विविधतेत एकता' हीच



उद्घाटनीय भाषण करतांना जिल्हाधिकारी
श्री आशिष येरेकर

आपल्या देशाची खासियत असल्याचे त्यांनी सांगितले. नुकत्याच पार पडलेल्या मुलांच्या स्पर्धेचा उल्लेख करताना कुलगुरूंनी सांगितले की, त्या स्पर्धेत पंचांनी अतिशय पारदर्शक आणि योग्य निर्णय दिले, ज्याचे प्रमाणपत्र सहभागी संघांच्या व्यवस्थापकांनी दिले. महिलांच्या स्पर्धेतही खेळाडूंना असाच न्याय्य आणि पारदर्शक अनुभव मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.
हार–जीत हा खेळाचा भाग आहे, परंतु विजयासाठी जीवाची बाजी लावतानाच 'टीम स्पिरिट' जपणे अधिक महत्त्वाचे आहे, असे आवाहन डॉ. बारहाते यांनी केले व सहभागी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्यात.
सुरुवातीला क्रीडा ज्योत मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. कर्मयोगीश्री संत गाडगेबाबा व शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याप्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तिरंगा असलेली फुगे मान्यवरांच्या हस्ते आकाशात सोडण्यात आली. स्मृतीचिन्ह व पुष्प देऊनपाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.



क्रीडाज्योत प्रज्वलीत करतांना

स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.व्ही. कोरपे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. तनुजा राऊत यांनी, संचालन डॉ. रेखा मग्गीरवार व डॉ. मुकुंद भोंडे यांनी केले, तर आभार डॉ. रूपाली इंगोले यांनी मानले. डॉ. अवंतिका मानकर यांनी प्रेरणादायी गीत सादर केले. उद्घाटन कार्यक्रमाला देशभरातील सर्व विद्यापीठांचे सहभागी खेळाडू, विद्यापीठ व शिवाजी शिक्षण संस्थेच्या विविध प्राधिकारणींचे सन्माननीय सदस्य, शिक्षक अधिकारी,कर्मचारी, तसेच गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पाहुण्यांचा सत्कार करतांना

## उद्घाटन कार्यक्रमाची क्षणचित्रे













# विद्यापीठाचा 'आव्हान' मध्ये विजयघोष!
# चमू व्यवस्थापकांचा कुलगुरूंच्या हस्ते गौरव




सत्कार कार्यक्रम

प्रतिनिधी महामहीम राज्यपाल कार्यालयाच्या वतीने अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर 'आव्हान–२०२५' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने 'उत्कृष्ट विद्यापीठ' हा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर आपला दबदबा निर्माण केला आहे. या ऐतिहासिक विजयाचे औचित्य साधून, मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या जिल्हा चमू व्यवस्थापकांचा गौरव सोहळा ५ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. निलेश कडू व सर्व चमू व्यवस्थापकांनी 'आव्हान–२०२५' चा विजेता फिरता चषक कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द केला. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. अजय लाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर आणि अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांची प्रमुख उपस्थिती होती.
आव्हान शिबिरादरम्यान दाखवलेले उत्कृष्ट नियोजन आणि मार्गदर्शनाबद्दल जी. एस. कॉलेज, खामगाव येथील डॉ. नीता बोचे यांचा 'उत्कृष्ट महिला चमू व्यवस्थापक' फिरता चषक पटकावल्याबद्दल कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी शिबिरात सर्वोत्तम कामगिरी नोंदवल्याबद्दल मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.

महाराष्ट्रातील २४ विद्यापीठांमधील ११२२ विद्यार्थ्यांच्या सहभागात अमरावती विद्यापीठाच्या १२५ स्वयंसेवकांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आपल्या भाषणातून नमूद केले की, आपत्ती व्यवस्थापनातील जिद्द आणि शिस्त ही केवळ पुरस्कारापुरती मर्यादित नसून, ती समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा सन्मान आहे. विद्यार्थ्यांची शिस्तबद्धता, उत्कृष्ट देखावा आणि कार्यतत्परता यामुळेच विद्यापीठाला 'आव्हान चान्सलर्स ब्रिगेड' मध्ये हे यश संपादन करता आले.

**पाचही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचे योगदान –**
रासेयो संचालक डॉ. निलेश कडू यांनी या यशाचे श्रेय पाचही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाला आणि चमू व्यवस्थापकांच्या चोख नियोजनाला दिले. विद्यार्थ्यांनी मिरवणुकीत सादर केलेला उत्कृष्ट देखावा आणि प्रशिक्षणातील अनुकरणशीलता ही जमेची बाजू ठरल्याचे त्यांनी नमूद केले. या यशामुळे अमरावती विद्यापीठाची मान संपूर्ण राज्यात उंचावली असल्याचे त्यांनी सांगितले.

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेतही अमरावती विद्यापीठ अव्वल
## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महिला संघाचा केला सत्कार




खेळाडूंना मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली १ फेब्रुवारी पासून झालेल्या 'अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचा मंगळवारी समारोप झाला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला संघाने सुध्दा सर्वांवार मात करत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदकाचा मान मिळिवला. तर उपविजेता संघ लवली प्रोफेशनल युनिर्व्हसिटी, जालंधरने रजत पदक, कालिकत विद्यापीठ व चंदिगड युनिर्व्हसिटीने कांस्य पदक पटकाविले. यावेळी ट्रॉफी व पदके देवून मान्यवरांच्या हस्ते चारही चमूंना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सहभागी खेळाडूंचे कौतूक करुन खेळामध्ये जय–पराजय होत असतो, परंतु त्यामुळे खचून जावू नये. सहभाग देखील तितकाच महत्वाचा असून हा आपल्या जीवनातील महत्वाचा क्षण असतो असे सांगून पुरुष स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सुवर्ण पदक पटकाविले, तर महिला स्पर्धेतही अमरावती विद्यापीठाने सुवर्ण पदकाचा मान मिळवून राष्ट्रीय स्तरावर आपल्या विद्यापीठाचा नावलौकीक केला आहे. सर्व खेळाडू, प्रशिक्षक तसेच मार्गदर्शक यांचे त्यांनी भरभरुन कौतूक करुन अभिनंदन केले. समारोप समारंभामध्ये अध्यक्षीय भाषण करतांना ते मार्गदर्शन करीत होते. व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री दिलीपबाबू इंगोले, उपाध्यक्ष श्री जयवंत उर्फ भैय्यासाहेब पुसदेकर, कार्यकारिणी सदस्य श्री सुरेशराव खोटरे, श्री सुभाषराव बनसोड, प्राचार्य डॉ. जी.व्ही. कोरपे, प्राचार्य अंबादास कुलट, श्री दिलीप तिरके, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, डॉ. रुपाली इंगोले आदी उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले चारही दिवस अतिशय चुरशीच्या लढती झाल्यात. थोड्याशा फरकाने जय–पराजय होत असतो. मात्र सर्व संघाच्या चमूंनी अतिशय उत्कृष्ट प्रदर्शन केले आहे. देशभरातून आलेल्या खेळाडूंना अधिकाधिक चांगल्या सुविधा पुरविण्याकडे आमचा सातत्याने प्रयत्न राहिला आहे. संघाच्या प्रशिक्षक, मार्गदर्शक यांनी सुध्दा आपल्या खेळाडूंना चांगले प्रशिक्षण व मार्गदर्शन केले आहे, त्यामुळे खेळाडू उत्कृष्टरित्या खेळलेत. मुलांच्या स्पर्धेत आणि आता मुलींच्या स्पर्धेतही संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सुवर्ण पदक प्राप्त करुन राष्ट्रीय स्तरावर आपल्या विद्यापीठाचा नावलौकीक केला आहे, असे सांगून त्यांनी दोन्ही संघाचे भरभरुन अभिनंदन केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. दिलीपबाबू इंगोले म्हणाले, आपण सुध्दा व्हॉलिबॉल खेळाडू होतो व कालिकत विद्यापीठामध्ये झालेल्या स्पर्धेत आपण आपल्या संघाकडून खेळलो, असा उल्लेख करुन विजेता ठरलेल्या चारही टीम उत्कृष्ट आहेत. थोड्याशा फरकाने हारजीत होत असते व त्यातही सर्वांनी आपल्या खेळाचे चांगले प्रदर्शन केले आहे. स्पर्धेदरम्यान खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, मार्गदर्शक यांना आवश्यक त्या सुविधा देण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर चांगली मैदाने देखील आम्ही उपलब्ध करुन दिलीत, असेही ते म्हणाले.

यावेळी लवली प्रोफेशनल युनिर्व्हरसिटीची खेळाडू अनुराधा भिंगारे व संघ मार्गदर्शक प्रभारिका गौर यांनी मनोगत व्यक्त करतांना चांगल्या सुविधांबद्दल अमरावती विद्यापीठ तसेच आयोजक महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी विविध विद्यापीठांच्या प्रशिक्षक, मार्गदर्शक, अम्पायर तसेच स्पर्धेच्या आयोजनासाठी परिश्रम घेणा–या सर्व शारीरिक शिक्षण संचालकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोपटे देवून सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट टिचर पुरस्कार कंचन (लवली प्रोशनल युनिर्व्हसिटी, जालंधर) बेस्ट कॅचर ममता (पंजाब विद्यापीठ), बेस्ट फास्टमॅन हन्सा मोल (कालिकत विद्यापीठ), बेस्ट सेकंड फास्ट मॅन सोनी (पंजाब युनिर्व्हसिटी, चंदिगड), बेस्ट थर्ड मॅन दिव्या (जालंधर विद्यापीठ), बेस्ट शॉट (नवदीप पंजाब विद्यापीठ, चंदिगड), बेस्ट लेफ्ट लॉक कमला (पंजाब युनिर्व्हसिटी, चंदिगड), बेस्ट सेंटर लॉक अश्विनी (कालिकत विद्यापीठ), बेस्ट राईट लॉक सँड्रा (कालिकत विद्यापीठ), ऑल राऊंडर क्षितिजा (संत गाडगे बाबा

शिक्षण महर्षि डॉ. भाऊसाहेब देशमुख व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने समारंभाची सुरुवात झाली. डॉ. रुपाली इंगोले यांनी स्पर्धेच्या शुभारंभापासूनची रुपरेखा सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवंतिका मानकर चौधरी व डॉ. रेखा मग्गीरवार यांनी, तर आभार क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे पदाधिकारी तसेच खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित



सुवर्ण पदक विजेता संघ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



रजत पदक विजेता संघ, लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, जालंधर



कास्य पदक विजेता संघ कालिकत विद्यापीठ



कास्य पदक विजेता संघ चंदिगड युनिव्हर्सिटी

# छत्रपती शिवरायांचे विचार युवा पिढीने अंगिकारावे - कुलसचिव डॉ. अविनाश असनारे
## विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन


कुलसचिव डॉ. अविनाश असनारे मार्गदर्शन करतांना

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ इतिहासाच्या पानांत राहू न देता, आजच्या युवा पिढीने शिवरायांचे विचार अंगिकारावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आयोजित शिवकालिन शस्त्र प्रदर्शनीच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. मिनल मालधुरे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे श्री शिवा काळे, आय.आय.एम.सी.चे संचालक डॉ. राजेश कुशवाह उपस्थित होते.

कुलसचिव पुढे म्हणाले, पदवी शिक्षणाचे दिवस हे आयुष्यातील महत्त्वाचे असतात. हा काळ जो युवक सत्कारणी लावेल, तो समाजासाठी नवी पायाभरणी करू शकेल. सोशल मीडियाचा वापर करतांना तंत्रज्ञानाचा वापर विधायक कामासाठी करावा असे सांगून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या विचारांचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

श्री शिवा काळे म्हणाले, स्वयंसेवी संस्थेकडून अमरावती जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता करण्यात आली, ते स्थळ एकेकाळी मुख्य जलस्त्रोत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय कौशल्यांचा वारसा जपण्यासाठी विद्यापीठाने विशेष अभ्यासक्रम सुरू केला आहे. गावीलगड किल्ल्याचा इतिहास लोकांपर्यंत नेण्यासाठी विशेष वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. मिनल मालधुरे म्हणाल्या, विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या शस्त्रास्त्रांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सांस्कृतिक वारसा या माध्यमातून जोपासण्याचा हा प्रयत्न असून या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची आवड निर्माण करणे, शस्त्रास्त्रांमागील विज्ञान सांगणे आणि महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा मुख्य उद्देश असल्याचे त्या म्हणाल्या.

विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले. शस्त्रप्रदर्शनीची यावेळी मान्यवरांनी पाहणी केली. प्रास्ताविकेतून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान शिवजयंती उत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धेची माहिती दिली. संचालन आदित्य पुंड यांनी, तर आभार डॉ. अनघा देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला आय.आय.एम.सी. चे शिक्षक, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, आजीवन अध्ययन विभागातील शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


श्री शिवा काळे विचार मांडतांना



शस्त्र प्रदर्शनीचे फित कापून उद्घाटन करतांना
कुलसचिव व इतर मान्यवर















शिवकालीन विविध शस्त्रांची माहिती देतांना श्री शिवा काळे




प्रदर्शनीतील शिवकालीन शस्त्रे



विद्यापीठातील निसर्गरम्य परिसर

# तरूण पिढीने शिवरायांच्या विचारांचा वारसा जपावा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
## विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा



शिवरायांना अभिवादन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर

शिवरायांच्या संस्कारांची आणि मूल्यांची आजच्या काळात गरज असून तरुण पिढीने शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपावा, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, प्रादेशिक कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले आजच्या काळात सर्वांना आपल्या हक्कांची जाणीव आहे, परंतू आपण आपल्या जबाबदाया विसरत चाललो आहोत. तरुण पिढीने अमली पदार्थांच्या व्यसनासोबतच मोबाईलच्या व्यसनापासून दूर राहणे आवश्यक आहे. वाढता स्क्रीन टाईम तरुणांच्या मानसिक स्वास्थ्यावर आणि सहनशीलतेवर विपरीत परिणाम करत आहे. शिवजयंती म्हणजे केवळ रॅली किंवा उत्सव नसून, ती स्वतःच्या भूमिकेचे आणि राष्ट्रभक्तीचे आत्मचिंतन करण्याची संधी असल्याचेही ते म्हणाले.

विद्यापीठात चार दिवस शस्त्र प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्फूर्ती गीत स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, एकपात्री प्रयोग स्पर्धा आणि पोवाडा स्पर्धा अशा उपक्रमांद्वारे शिवरायांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्याबद्दल कुलगुरूंनी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील व त्यांच्या टीमचे अभिनंदन केले. केवळ उत्सव साजरा न करता, शिवरायांच्या विचारांचा जागर करून आपण समाजासाठी काय करू शकतो, याचा विचार प्रत्येकाने करावा, असे आवाहनही कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी समर्थ रामदास स्वामींनी शिवरायांचे वर्णन करताना लिहिलेल्या ‘शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप’ या ओव्यांचा उल्लेख करत शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची आठवण करून दिली. समाजाला आपल्या हक्कांची पूर्ण जाणीव आहे, परंतू आपण आपल्या जबाबदाया विसरत चाललो आहोत, अशी खंत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. नागरी शिस्तीचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले रस्त्यावरील खड्ड्यांसाठी प्रशासनाला दोष देतानाच, रस्त्यावर न थुंकणे ही आपलीही जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले. शिवजयंती केवळ रॅली काढून साजरी न करता, शिवरायांनी दिलेला राष्ट्रभक्तीचा मंत्र अंगीकारून आपण समाजासाठी आणि देशासाठी काय करू शकतो, याचे चिंतन प्रत्येकाने करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.



अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रा. शुभम पाचखंडे यांनी लिहीलेल्या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. प्रास्तविक भाषणातून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी १६ ते २१ फेब्रुवारी दरम्यान शस्त्र प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्फूर्ती गीत स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, एकपात्री प्रयोग स्पर्धा आणि पोवाडा आदी स्पर्धा आयोजनामागील भूमिका मांडली. श्री वैभव म्हस्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली. पेटेन्ट मिल्याबद्दल डॉ. रत्नशील खोब्रागडे यांचा, सॉफ्टबॉल स्पर्धेत मेडल मिळिवल्याबद्दल कु. राधिका उमेश दानखेडे हिचा, तर उत्कृष्ट छायाचित्र काढल्याबद्दल कु. ईश्वरी गांजरे हिचा कुलगुरूंनी सत्कार केला. याप्रसंगी सहा वर्षाचा शिवांश वैभव इंगळे याने ‘छत्रपती संभाजी महाराजांवर’, तसेच अमरजित वानखडे व चमूने ‘अफजलखानचा वध’ सुरुवातीला पोवाडा सादर केला. संचालन प्रा. आदित्य पुंड तर आभार डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी मानले. कार्यक्रमाला उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, श्री विक्रांत मालवीय, डॉ. अनिता पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. प्रेमानंद तिडके तसेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





प्रा. शुभम पाचखंडे लिखित पुस्तकाचे विमोचन करतांना मान्यवर

# पश्चिम विभाग व अ. भा. आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत अमरावती विद्यापीठाचे घवघवीत यश खेलो इंडिया स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याकडून चमूंचा सत्कार

पारूल विद्यापीठ, वडोदरा (गुजरात) येथे ५ ते ११ जानेवारी, २०२६ दरम्यान झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूने उत्कृष्टरित्या खेळाचे प्रदर्शन करीत प्रथम क्रमांक पटकाविला. त्यानंतर ३० जानेवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान कालिकत विद्यापीठ येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतही खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करुन अमरावती विद्यापीठाने आठवे स्थान प्राप्त करुन खेलो इंडिया स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र ठरला आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी चमूंचे भरभरुन कौतुक करुन त्यांचा सत्कार केला.

चमूंमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हाचा ऋतिक अतकर, प्रज्योत तायडे व ओम काशीकर, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा राज मिश्रा, डुकीवाकोर ही, ओमा हंग सुब्बा, झाकीइसतुओ केट्स, राहुल कुमार, पलडेन धोनडूप, अफिरमिंग तलंग व सोनम तमंग, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा साहिल बेनिवाले व सुफियान अब्दुल, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा ओम घारव व मुस्तफा शेख, दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा मोरवीन मोसेस, इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांवचा अभिषेक बुटके व यश यादव, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा रोमन खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा रफिक खान यांचा समावेश होता. तर चमू व्यवस्थापक म्हणून इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांवचे डॉ. किरण पवार, प्रशिक्षक म्हणून डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचे राहुल भालेराव यांचे मार्गदर्शन लाभले.

या घवघवीत यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी चमूंचे अभिनंदन केले.



विद्यापीठाची फुटबॉल चमू

# आविष्कार स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार

## विद्यार्थ्यांनी संशोधनातून स्वत:चे स्टार्टअप उभे करावे - कुलगुरू



पुणे–मुंबईसारख्या महानगरांशी तुलना करता आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि कल्पकतेची अजिबात कमतरता नाही. येणारा काळ हा संशोधनाचा असून विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता आपल्या संशोधनातून स्वतःचे 'स्टार्टअप' उभे करावे आणि 'जॉब सीकर' (नोकरी मागणारे) होण्यापेक्षा 'जॉब गिव्हर' (नोकरी देणारे) बनावे, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठाच्यावतीने आविष्कार स्पर्धेत राज्यातून तिसरे स्थान मिळिवल्याबद्दल सहभागी सर्व विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृह येथे सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलगुरू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे उपस्थित होते.

कुलगुरूंनी सर्वप्रथम राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून मार्गदर्शन करताना कुलगुरू पुढे म्हणाले, अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी, विशेषत: ग्रामीण भागातील मुले नाविन्यपूर्ण संशोधनात आघाडीवर आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बुलडाणा जिल्ह्यातील श्री अजिंक्य पोटे या विद्यार्थ्याने 'अन्वेषण' स्पर्धेत थेट आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारून यश मिळिवले. यावरून हे सिध्द होते की, आपल्या विद्यार्थ्यांचे 'इनोव्हेशन' जागतिक दर्जाचे आहे.

**स्टार्टअप्ससाठी विद्यापीठाचा पुढाकार**

बदलत्या काळाचा वेध घेताना कुलगुरूंनी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) चे उदाहरण दिले. ते म्हणाले, 'आज एआयमुळे सॉफ्टवेअर क्षेत्रात क्रांती होत आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे व्यापारीकरण करणे काळाची गरज आहे. आपल्या विद्यापीठातही 'इन्क्युबेशन फाऊंडेशन'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'सीड फंड' दिला जातो. सध्या ४५ स्टार्टअप्स आपल्याकडे नोंदणीकृत आहेत, याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

**यशाला पहिले पाऊल समजा**

आविष्कार स्पर्धत आज मिळालेले यश हा शेवट नसून, हे तुमच्या कारकीर्दीचे 'पहिले पाऊल' आहे, असे समजून जिद्दीने पुढे वाटचाल करा, असा मोलाचा सल्ला कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी अजिंक्य पोटे, रोहिणी कांबे, प्रिया जंजाळकर, सौरभ श्रीराव, रोहण बुंदेले, राजीवकुमार जीवतानी, कु. श्रावणी ठाकरे, कु. रेणुका येंडे या विद्यार्थ्यांचा कुलगुरुंच्या हस्ते सत्कार झाला. तसेच आविष्कार सेलचे अध्यक्ष डॉ. अजय लाड, समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, व्यवस्थापक डॉ. निरज घनवटे, डॉ. राजेश भोयर, डॉ. जयंत वडतकर तसेच शाहु महाविद्यालयाचे डॉ. शिरिष जैन व डॉ. प्रकाश केंद्रे, डॉ. तिडके यांचाही त्यांनी सत्कार केला. सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्तविक भाषणातून आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी आविष्कार स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकडून करून घेतलेली तयारी, स्पर्धेचे नियोजन आदीविषयी माहिती दिली. संचालन करत आभार कु. खुशबु जयस्वाल हिने मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच शिक्षक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था गटात दिव्या फाऊंडेशन व व्यक्ती गटात श्री मनिष पावडे यांना प्रदान
## समाजघटकांनीही समाजकार्यात आपला सहभाग द्यावा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

पुरस्कार दिल्यानंतर आपले कार्य संपले असे नाही, तर समाजघटकांनीही सामाजिक कार्यामध्ये आपला सहभाग द्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. २०२५ या वर्षीचा कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था गटात बुलडाणा जिल्हातील वरवंड येथील दिव्या फाऊंडेशनला व व्यक्ती गटात अमरावती शहरातील श्री मनिष रमेशराव पावडे यांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते ससन्मान प्रदान करण्यात आला, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी दिव्या फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री अशोक काकडे व समाजसेवक श्री मनिष पावडे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रु. पाच हजार रोख देऊन सन्मान केला व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, दानदात्यांचे प्रतिनिधी व विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे समन्वयक श्री दिलीप काळे, दिव्या फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री अशोक काकडे, समाजसेवक श्री मनिष पावडे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

पुरस्कारप्राप्त दोन्ही मान्यवरांच्या कार्याला शुभेच्छा देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, सुरुवातीला एकच पुरस्कार दिला जात होता. परंतु संस्था आणि व्यक्ती यांच्यात कार्यात फरक असतो, त्यामुळे व्यक्ती गटातही पुरस्कार दिल्या गेला पाहिजे, अशी भावना ठेवून त्यादृष्टीने पावले उचललीत आणि त्याचा मूर्त रुप मिळाले, याचा आनंद आहे. समाजमनाने देखील आता चिंतन करणे गरजेचे असून अशाप्रकारच्या संस्था का उभ्या कराव्या लागल्यात, केवळ पुरस्कार देवून आपली जबाबदारी संपली असे नाही, तर आपलाही त्यात सहभाग असावा अशी समाजघटकाने भावना ठेवली पाहिजे, असे सांगून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सदैव आपल्या पाठिशी राहील असा विश्वास कुलगुरूंनी दोन्ही पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्ते श्री अशोक काकडे व श्री मनिष पावडे यांना दिला.

दिव्या फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री अशोक काकडे यांनी संस्था उभारणीचा मागोवा घेतांना एका मनोयात्री महिलेचा प्रसंग सांगितला आणि त्यानंतर आपण एक भूखंड घेऊन तेथे प्रत्यक्ष कामाला सुरूवात केल्याचे सांगून दु:ख निवारण्याचे काम फाऊंडेशनच्या माध्यमातून केले जात असल्याचे ते म्हणाले. मनोयात्रीची सेवाच नाही, तर त्यांना स्वत:च्या पायावर उभे करेपर्यंत फाऊंडेशनचे कार्य आहे. एवढेच नाही, तर प्रत्येक मनोयात्रीचे आधारकार्ड, मतदान कार्ड सुध्दा तयार करण्यात आलेत.

व अनेकांना ते पूर्णपणे बरे झाल्यानंतर त्यांच्या घरी देखील पोहचवून दिल्याचे श्री काकडे यांनी यावेळी सांगितले. या पुरस्कारामुळे आपले कार्य सफल झाल्याचे सांगून आता आणखी जबाबदारी देखील वाढल्याचे ते म्हणाले. श्री मनिष पावडे यांच्यावतीने श्री महेंद्र देशमुख यांनी मनिष पावडे यांच्या कार्याची माहिती देतांना मनिष पावडे यांच्या आईवडीलांचा वारसा ते चालवित आहेत व लुळ्यापांगळ्यांना



दिव्या फाऊंडेशन व श्री मनिष रमेशराव पावडे यांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर म्हणाले, माजी आमदार बबनराव मेटकर व दादासाहेब गवई यांचा विद्यापीठाच्या विकासात मोठा हातभार लागला आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या नामकरणातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यापीठात अध्यासन केंद्र व्हावे यासाठी दादांनी पाठपुरावा केला आणि त्याचे सार्थकही झाल्याचे सांगून भैय्यासाहेब मेटकर पुढे म्हणाले, संत गाडगे बाबांचे कार्य समाजापर्यंत जावे, तरुणांना प्रेरणा मिळावी या हेतूने नावाने हा पुरस्कार सुरू सुरू केला. पुरस्कार सुरू करण्यामागील उद्देश आज सफल होत असल्याचा आनंद आहे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी स्व. नागोरावजी व स्व. बबनरावदादा मेटकर याच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी दिव्या फाऊंडेशन व श्री मनिष पावडे यांच्या कार्याची माहिती दिली. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, तर आभार जनसंपर्क विभागातील श्री ओम जगताप यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, ॲड. यदुराज मेटकर, डॉ. एम.टी. देशमुख, सामाजिक कार्यकर्ते श्री गोविंद कासट, श्री अभिनंदन पेंढारी, श्री मुंधडा, शाम देशमुख, दिपक हुंडीकर, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, संजय जैन, श्री पावडे, श्री काकडे


## कमलनयन बजाज स्मृति राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यापीठाचे सुयश कु. श्रावणी रोटे हिचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते सत्कार



वर्धा येथे नुकत्याच झालेल्या ५० व्या कमलनयन बजाज स्मृति राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यापीठाची कु. श्रावणी श्रीकांत रोटे हिने चतुर्थ क्रमांक पटकावून विद्यापीठाचा नावलौकीक केला. याबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते कु. श्रावणी हिचा सत्कार करण्यात आला. २२ व २३ जानेवारी, २०२६ या कालावधीत 'क्यों गांधी आज भी जीवित है?' या विषयावर शिक्षा मंडळ वर्धा तर्फे ५० वा कमलनयन बजाज स्मृती राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शिक्षा मंडळ, जमनालाल बजाज मार्ग, सिव्हिल लाईन, वर्धा येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून ८४ विद्यापीठांनी आपला सहभाग नोंदविला.

सदर वक्तृत्व स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याकरीता विद्यार्थी विकास विभागातर्फे सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, बडनेरा रोड, अमरावती येथील कु. श्रावणी श्रीकांत रोटे या विद्यार्थीनीची निवड करण्यात आली होती. कु. श्रावणी हिने सदर स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावून रोख रक्कम रु. पाच हजार व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्राप्त करुन विद्यापीठाचा नावलौकीक केला आहे. याबद्दल कु. श्रावणीचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी

# नेट परीक्षेत पदव्युत्तर मराठी विभागाच्या यशाची परंपरा यंदाही कायम

|  |  |  |  |  |  |
|---|---|---|---|---|---|
| राजेश डोंगरे | आशिष धुर्वे | निखिल चव्हाण | निलेश कुमरे | स्नेहा खडसे | निशिगंधा सोनोने |

उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, सातत्य आणि शैक्षणिक निष्ठेचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाने यंदाही उज्ज्वल परंपरा कायम राखत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेट परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत विभागातील एकूण सहा विद्यार्थ्यांनी यश मिळवत सहाय्यक प्राध्यापक पदासाठी तसेच आचार्य पदवीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही विभागाचा निकाल समाधानकारक ठरला असून या यशामागे विद्यार्थ्यांची चिकाटी, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि विभागातील शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण यांचा मोठा वाटा असल्याचे स्पष्ट होते. अभ्यासक्रमातील सातत्य, नियमित मार्गदर्शन वर्ग, चर्चासत्रे, वाचन संस्कृतीला चालना देणारे उपक्रम आणि स्पर्धा परीक्षांसाठीची विशेष तयारी यामुळे विद्यार्थ्यांना सक्षम आधार मिळत असल्याचे शिक्षकांनी नमूद केले. नेट परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विभागाची माजी विद्यार्थिनी कु. निशिगंधा सोनोने हिने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच सध्या विभागात द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या कु. स्नेहा खडसे आणि निलेश कुमरे यांनीही नेट परीक्षा उत्तीर्ण होत विभागाचा गौरव वाढविला आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यमान विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरणा मिळाली आहे.

याचबरोबर विभागाचे माजी विद्यार्थी निखिल चव्हाण, आशिष धुर्वे तसेच सध्या द्वितीय वर्षाला प्रवेशित असलेला राजेश डोंगरे यांनी आचार्य पदवीसाठीची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली आहे. माजी आणि विद्यमान विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे यश संपादन केल्याने विभागातील शैक्षणिक परंपरेचे सातत्य अधोरेखित झाले आहे. पदव्युत्तर मराठी विभाग हा विद्यापीठातील अभ्यास, संशोधन आणि स्पर्धा परीक्षा तयारीच्या दृष्टीने अग्रगण्य विभाग म्हणून ओळखला जातो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी साहित्य चर्चासत्रे, व्याख्याने, संशोधन मार्गदर्शन, वाचन संस्कृती वृद्धिंगत करणारे कार्यक्रम तसेच स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन यांसारखे विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात. या प्रयत्नांचेच फलित म्हणून विभागाचा निकाल दरवर्षी उल्लेखनीय ठरत आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विभागप्रमुख प्रा. डॉ. मोना चिमोटे, प्रा. डॉ. माधव पुटवाड आणि डॉ. प्रणव कोलते यांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यातही मराठी भाषा, साहित्य आणि संशोधन क्षेत्रात भरीव योगदान देण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मराठी भाषा व साहित्य क्षेत्रात गुणवत्तापूर्ण संशोधक, प्राध्यापक आणि अभ्यासक घडविण्याच्या दिशेने पदव्युत्तर मराठी विभाग सातत्याने कार्यरत




# विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा वक्तृत्व स्पर्धा संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा 'जेंडर इक्वलिटी : सद्यस्थिती आणि आव्हाने' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमधील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक समानता विषयक जाणीव जागृती व्हावी, तसेच त्यांच्यात लिंगभाव संवेदनशीलतेचा विकास व्हावा, या हेतूने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक स्पर्धकाने विषयाच्या अनुषंगाने संदर्भ देत मांडणी केली. त्यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आणि दोन प्रोत्साहनपर क्रमांक निवडण्यात आले.

या स्पर्धेत एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रफुल्ल कुकडे यांनी यांनी प्रथम, तर ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील विद्यार्थी नितीन गवई यांनी द्वितीय, शिक्षणशास्त्र विभागातील विद्यार्थी प्रज्वल घोम यांनी तृतीय तर एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमाची प्राजक्ता देशमुख आणि पल्लवी चिमूरकर यांनी प्रोत्साहनपर क्रमांक पटकाविला. या स्पर्धेचे परीक्षण महात्मा ज्योतिबा फुले वाणिज्य व विज्ञान आणि विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय, भातकुली येथील मराठी विभागप्रमुख डॉ. रवी साखरकर यांनी केले. क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना स्पर्धेचे परीक्षक डॉ. रवी साखरकर यांसह सेंटरचे प्रा. डॉ. भगवान फाळके उपस्थित होते.

बक्षीस वितरणावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना परीक्षक डॉ. रवी साखरकर म्हणाले, समाजाचा संतुलित विकास होण्यासाठी लैंगिक समानता आवश्यक आहे. त्यासाठी समाजात लिंगभाव संवेदनशीलता विकसित करण्यासाठी जाणीव-जागृती करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. पूजा अलोणे यांनी केले.

# वुमेन्स स्टडीज सेंटरच्या विद्यार्थ्यांची पोलीस आयुक्तालयातील 'भरोसा सेल'ला क्षेत्रभेट



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रम चालवण्यात येतो. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी अमरावती पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेल येथे क्षेत्रभेट दिली. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक अभ्यासासह विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांमधील कार्यप्रणालीचा परिचय व्हावा तसेच व्यावहारिक बाजूंचे आकलन व्हावे, या उद्देशाने अभ्यासक्रमा अंतर्गत ही क्षेत्रभेट देण्यात आली.

यावेळी अमरावती पोलीस आयुक्तालायातील भरोसा सेलमधील पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मे, पोलीस उपनिरीक्षक सुनिता कांगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मेघाली गावंडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनील मेतकर, श्रद्धा रोकडे (एल.पी.सी.) टाटा समाजविज्ञान संस्थे अंतर्गत कार्यरत विशेष कक्षाच्या प्रादेशिक समन्वयक प्रतिभा गजभिये यांसह राजेश यादव ( हेड कॉन्स्टेबल), अनिता जवंदर ( हेड कॉन्स्टेबल), संगीता आठवले (कॉन्स्टेबल) उपस्थिती होते. तसेच त्यांनी आपल्या कार्याविषयी माहिती दिली.

यावेळी पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भरोसा सेलची स्थापना, कार्यप्रणाली आणि कार्यानुभव यांची सविस्तर माहिती दिली. भरोसा सेल अंतर्गत पिडीत महिला व मुलींना करण्यात येणारे सहकार्याचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले.


प्रतिभा गजभिये यांनी महिला व मुलींच्या येणाऱ्या तक्रारींची सद्यस्थिती स्पष्ट करून समुपदेशनाचे अनुभव सांगितले. बदलत्या सामाजिक पर्यावरणात कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात ताणतणाव वाढत आहेत. शिवाय समाजमाध्यमे आणि अन्य बाबींमुळे नात्यांमध्ये गुंतागुंत निर्माण होत आहे. यामध्ये महिला व स्त्रियांचे प्रश्न भीषण रूप धारण करीत आहेत. अशावेळी भरोसा सेल अंतर्गत येणाऱ्या पिडीत महिला व मुलींच्या तक्रारींवर विविध प्रकारे सेवा देऊन कार्य करण्यात येते. त्यात प्रामुख्याने समुपदेशन अत्यावश्यक ठरते. समुपदेशनाचा सकारात्मक परिणाम दिसून येतो, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या भेटी दरम्यान भरोसा सेल अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा परिचय व त्यांचे कार्य याबाबतही विद्यार्थ्यांकडून जाणून घेण्यात आले. या क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी महिलांसंबंधीचे कायदे, समाजातील महिलांसंबंधीचे गुन्हे आणि त्यांचे निवारण या संदर्भात विविध प्रश्न संबंधितांना विचारून अधिक माहिती प्राप्त केली. सदर क्षेत्रभेटी दरम्यान सेंटरमधील डॉ. भगवान फाळके, प्रा. पूजा अलोने, डॉ. मनीषा



# विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागात 'ड्रॅगनफ्लाय' व 'कॅमेरा ट्रॅपिंग' विषयावर व्याख्यान संपन्न





डॉ. पवन राठोड व्याख्यान देतांना

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागामध्ये 'ड्रॅगनफ्लाय' व 'कॅमेरा ट्रॅपिंग' विषयावर नुकतेच व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. एच.पी. नांदुरकर उपस्थित होत्या.

व्याख्याते डॉ. पवन राठोड, महसूल अधिकारी, अमरावती यांनी ड्रॅगनफ्लाय यावर व्याख्यान देतांना ड्रॅगनफ्लाय हे एक प्रकारचे किटक असल्याचे सांगून डासांसारख्या किटकांचे भक्षण करुन पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करीत असल्याचे सांगितले. ड्रॅगनफ्लायच्या प्रजननाविषयी देखील त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. ड्रॅगनफ्लायच्या जगभरात सहा हजाराहून अधिक प्रजाती आढळून येतात आणि त्या त्या परिसरातील पर्यावरणाची गुणवत्ता देखील त्यांच्या उपस्थितीवरुन ओळखता येत असल्याचे सांगून जैवविविधता संवर्धनासाठी त्यांचे खूप महत्व असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी व्याख्यात्यांनी ड्रॅगनफ्लायची काही छायाचित्रे सुध्दा विद्यार्थ्यांना दाखविली. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही विषयाची चांगली माहिती झाली.

कॅमेरा ट्रॅपिंग या विषयावर व्याख्यान देतांना वन्यजीव संशोधक पंकज बांडाबुचे यांनी कॅमेरा ट्रॅप म्हणजे काय, त्याची कार्य पध्दती आदींबाबत माहिती दिली. वसाहतींमध्ये वाघ अथवा बिबट यासारख्या वन्य प्राण्यांची सुटका करणे, संख्या मोजणे, वर्तनाचा अभ्यास करणे, प्रजातींची नोंद ठेवणे, संवर्धनासाठी नियोजन यामध्ये कॅमेरा ट्रॅपिंगचे महत्व, कॅमेरा बसविण्याची योग्य पध्दत, ठिकाणे, डेटा संकलन आदींविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच प्रत्यक्ष कॅमेरामधून घेतलेली छायाचित्रे सुध्दा विद्यार्थ्यांना दाखविली.

आभार प्रदर्शनाने व्याख्यान कार्यक्रमाची सांगता झाली. दोन्ही व्याख्यान कार्यक्रमाला विभागातील डॉ. नागले, डॉ. रजनी तायडे, डॉ. सीमा सावळे, अंकिता पानसरे, संपदा जोशी, निधी बजाज, विनय झटाले, रचना धुरे तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनी



श्री पंकज बांडाबुचे माहिती देतांना

# विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाची मेळघाटातील विविध गावांमध्ये जनजागृती मोहीम




जनजागृती मोहिमचे क्षणचित्र

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने मेळघाटमधील आदिवासी गावांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना विविध प्रकारची माहिती देण्यात आली.

मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील घटांग, सेमाडोह, हरिसाल, धारणी, खा–याटेम्ब्रू, मोथा, पंचबोल, चिखलदरा अशा विविध गावांना भेटी देण्यात आल्या. गावागावांमध्ये आदिवासी बांधव तसेच युवकांना शासनाच्या विविध योजना, कार्यक्रम कीर्तनकार मंडळी तसेच विद्यार्थी व प्राध्यापकाच्या माध्यमातून, साऊंड सिस्टिमच्या माध्यमातून ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. त्याचबरोबर आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण, रोजगार, सामाजिक सुरक्षेच्या योजनांबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थी व प्राध्यापकांनी गावातील आदिवासी महिला व पुरुषांशी संवाद साधून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. तसेच त्यांच्या जीवनशैली व सद्यस्थितीचा समाजशास्त्रीय दृष्किोनातून अभ्यास करण्यात आला. यामुळे आदिवासी समाजासमोरील वास्तव परिस्थिती समजून घेण्यास मदत झाली.

या जनजागृती मोहीमेमध्ये समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, अंशदायी शिक्षक डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा. साधना इंगोले, शिक्षकेतर कर्मचारी प्रवीण घर्डीणकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी राजकुमार सयाम, रमेश पवार, गोपाल वानखडे, दिलीप धावणे तसेच विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जनजागृती मोहीमेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आदिवासी समाजातील वास्तव अनुभवण्याची संधी मिळाली. समाजाभिमुख शिक्षणाची ही परंपरा भविष्यातही कायम राहील, असे मत यावेळी संशोधक, तसेच विद्यार्थी व प्राध्यापकांनी व्यक्त केले.

# विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात ‘मेनी व्हॉईसेस, वन सायन्स’ विषयावर ग्लोबल विमेन्स ब्रेकफास्ट - २०२६ कार्यक्रम उत्साहात संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभाग व मुलींचे वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने व इंडियन वुमन सायंटिस्टस् असोसिएशन, अमरावती शाखेच्या सहकार्याने आणि असोसिएशन ऑफ केमिस्ट्री टीचर्स, मुंबई यांच्या प्रोत्साहनातून आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र संघटना प्रेरित ‘मेनी व्हॉईसेस, वन सायन्स’ या विषयावर ग्लोबल विमेन्स ब्रोकफास्ट - २०२६ कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, प्रमुख वक्ते म्हणून हैदराबाद येथील आयआयसीटीच्या प्रिन्सिपल सायंटिस्ट डॉ. वसुंधरा मुत्ता, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्कुल ऑफ केमिकल सायन्सेसच्या संचालक डॉ. संगिता माकोने, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे व माजी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार यांची उपस्थिती होती.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्कुल ऑफ केमिकल सायन्सेसच्या संचालक डॉ. संगिता माकोने यांनी विषयाची मांडणी करतांना आजच्या काळात मुलींनी विज्ञान क्षेत्रात पुढे येणे आवश्यक असल्याचे सांगितले. हैदराबाद येथील आयआयसीटीच्या प्रिन्सिपल सायंटिस्ट डॉ. वसुंधरा मुत्ता यांनी ‘फंक्शनल नॅनोमटेरियल्स फॉर अ सस्टेनेबल फ्युचर’ या विषयावर व्याख्यान देतांना कार्यक्षम नॅनोमटेरियल्सच्या माध्यमातून शाश्वत विकास व जागतिक समस्यांवरील उपायांची सविस्तर माहिती दिली. माजी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग आवश्यक आहे. महिलांनी प्रगती केली तर राष्ट्राची प्रगती होते, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे यांनीही याप्रसंगी आपले विचार मांडले.


अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, अशा कार्यक्रमांमुळे सहकार्याची भावना वाढीस लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना उच्च शिक्षणासाठी यातून प्रेरणा मिळत असल्याचे सांगून उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रास्ताविक डॉ. जागृती बारब्दे, स्वागतपर भाषण राष्ट्रीय समन्वयक डॉ. विजेंद्र सिंह, पाहुण्यांचा परिचय श्री शुभम क-हाडे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन कु. प्रांजली चव्हाण, तर आभार श्रावणी ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी दोनशेहून अधिक सहभागींनी नोंदणी केली होती. कार्यक्रमाला शिक्षक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संबंधित प्रतिनिधी, वसतिगृहातील विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील संशोधक, वैष्णवी बंड, आरती कुंभारे, श्री शुभम क-हाडे, विद्यार्थी हकीम नौशाद, सुमित लोणे, श्रेया चौहान, नफिसा आणि प्रांजली चौहान यांनी विशेष परिश्रम घेतले.





# विद्यापीठात हृदयविकार व सीपीआर तंत्रावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न
## डॉ. महेंद्र गुढे व डॉ. शैलेश जायदे यांनी दिले प्रशिक्षण




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आरोग्य विभाग व प्राणिशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने हृदयविकार व कार्डिओपल्मोनरी रेस्क्युसिटेशन या विषयावर प्राणिशास्त्र विभागाच्या सभागृहात विशेष प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, एक्झॉन हॉस्पिटलचे अस्थिरोग व ट्रॉमा तज्ज्ञ डॉ. महेंद्र गुढे, ह्रदयरोग तज्ज्ञ डॉ. शैलेश जायदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर उपस्थित होते.

याप्रसंगी ह्रदयरोग तज्ज्ञ डॉ. शैलेश जायदे यांनी प्रशिक्षण देतांना ह्रदयविकार होण्याची कारणे विषद करुन आज जगामध्ये १७.५ मिलियन लोकांचा मृत्यू होतो आहे. २०३० पर्यंत हेच प्रमाण २३ मिलियन इतके जाण्याची शक्यता त्यांनी वर्तविली. ह्रदयविकार होण्याकरिता नेमके कुठले घटक जबाबदार आहेत, कशामुळे हार्टअटॅक येतो, हार्टअटॅक येण्याची कुठली रिस्क आहे, यावर माहिती देतांना ते म्हणाले, उच्च रक्तदाब, वाढलेले कोलेस्ट्रॉल, त्याचे प्रकार, तंबाखू, सिगारेट, मधुमेह, चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव, अल्कोहोलचे अतिप्रमाणात सेवन हे रिस्क फॅक्टर असल्याचे ते म्हणाले.

बदललेली जीवनशैली व प्रदुषण यामुळे आज शालेय विद्यार्थ्यांमध्ये हार्टअटॅक येण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते, म्हणून विद्यार्थ्यांनी अठरा वर्षानंतर आपला रक्तदाब तपासण्याची गरज आहे. तसेच तीस वर्षानंतर नियमितपणे मधुमेह तपासण्याची सुध्दा गरज आहे. ज्यांना चालतांना थोडा जरी दम लागत असेल, तर ती हार्ट अटॅकची लक्षणे असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांपासून प्रौढांपर्यंत प्रत्येकाने आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करावी आणि संतुलित जीवनशैली ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. महेंद्र गुढे यांनी सीपीआर कसा द्यायचा, हाताची स्थिती, हाताचा दाब, सातत्याने दाब कसा द्यायचा याचे सीपीआर प्रात्याक्षिक त्यांनी दिले. यावेळी उपस्थितांकडून सुध्दा सीपीआर प्रात्यक्षिक त्यांनी करुन घेतले. सीपीआर मुळे अनेकांचे प्राण वाचले आहेत, म्हणून सीपीआर विषयक प्रत्येकाला माहिती असण्याची आवश्यकता आहे. आज विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सीपीआर प्रशिक्षण घेतल्यामुळे त्यांना भविष्यात सीपीआर ची गरज लागल्यास ते देवू शकतील आणि इतरांनाही माहिती देतील व रुग्णांचे प्राण वाचविण्यास अनेक हात पुढे येतील असेही ते म्हणाले. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची दोन्हीही डॉक्टरांनी समर्पक उत्तरे दिली.

हृदयविकारावर प्रात्याक्षिकाव्दारे माहिती देतांना डॉ. गुढे व डॉ. जायदे







अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, तरुण पिढींमध्ये हार्टअटॅक येण्याचे प्रमाण आज दिसून येत आहे. हा खूप चिंतेचा विषय आहे. आपल्या पूर्वजांनी ज्या पध्दतीने आहार सांगितला, त्याच्या विपरित आहार आपण घेत आहोत. हवेतील, पाण्यातील, अन्नधान्यातील प्रदुषण नियंत्रणाबाहेर गेले आहे. याशिवाय श्वसन विकार सुध्दा वाढत आहे, असे सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते पुढे म्हणाले, दोन्हीही वैद्यकीय तज्ज्ञांनी अतिशय साध्या व सोप्या भाषेत ह्मदयविकार आणि त्याची कारणे, सीपीआर कसा द्यायचा याची सविस्तर माहिती आपल्याला दिली. त्यामुळे सर्वांनी फास्टफुड खाऊ नये, जास्तीतजास्त व्यायाम करावा, असेही त्यांनी सांगितले. विशेष महत्वाचे म्हणजे आपला विद्यापीठाचा परिसर हा प्रदुषणमुक्त आहे. अशाप्रकारचे आरोग्यविषयक कार्यक्रम विद्यापीठाच्यावतीने आयोजित करण्यामध्ये माझा सदैव पुढाकार राहिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. हेमलता नांदुरकर यांनी, पाहुण्यांचा परिचय डॉ. स्मिता थोरात यांनी करुन दिला. संचालन कु. श्रविका देवडे यांनी, तर आभार डॉ. व्ही.के. नागले यांनी मानले. कार्यक्रमाला उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, डायबेटिक असोसिएशनचे जनसंपर्क अधिकारी श्री राजेश पिदडी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. विशाल बापते तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागाचे

# विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारिरीक शिक्षण विभागात आंतर विभागीय क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन





संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर शारिरिक शिक्षण विभागाच्यावतीने आंतर विभागीय क्रिकेट सामन्यांचे ५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान विद्यापीठाच्या क्रीडांगणावर आयोजन करण्यात आले होते. सामन्यांचे उद्घाटन प्रसंगी श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावतीचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, प्रमुख अतिथी म्हणून डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचे डॉ. दिनानाथ नवाथे, असोसिएट एलएनआयपीई, ग्वालियरचे डॉ. दिलीप तुरकी उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. सुभाष गावंडे म्हणाले, आजची पिढी मोबाईलमध्ये व्यस्त दिसतात, त्यातून बाहेर पडण्यासाठी क्रीडा स्पर्धा आवश्यक असून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनातील परिश्रम पुढील आयुष्यात नक्कीच उपयोगी पडतात.

प्रमुख अतिथी डॉ. दीनानाथ नवाथे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवांचे दाखले दिले. जेव्हा स्मृती मंधानासारखे खेळाडू बाद होतात, तेव्हा त्या आपल्या चुका सुधारण्यासाठी स्वत:चे व्हीडीओ हजारो वेळा पाहतात. खेळात यश मिळिवण्यासाठी अशाच चिकाटीची आणि सूक्ष्म अभ्यासाची गरज असे, असे सांगितले.० डॉ. दिलीप तुरकी यांनी फिटनेसचे महत्त्व पटवून देतांना जर तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असाल, तर तुम्ही तरूण दिसाल. शारीरित क्षमता टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांनी खेळामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा. खेळासाठी वय हा फक्त आकडा आहे, असे त्या म्हणाल्या.

सूत्रसंचालन सुरभी डोंगरे यांनी, तर आभार लोंगशिथुंग निखील कुमार यांनी मानले. सामन्यांच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, कु. सविता बावनथडे, डॉ. निलेश इंगोले, डॉ. सौरभ त्रिपाठी, विभागातील शिक्षक परिश्रम घेत आहेत.





# विद्यापीठातील उपयोजित परमाणू विद्युत विभागात एलईडी लॅम्प फॅब्रिकेशन कार्यशाळा संपन्न



विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील उपयोजित परमाणू विद्युत विभागामध्ये उर्जा संवर्धन जागृती केंद्र अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एलईडी लॅम्प फॅब्रिकेशन कार्यशाळा नुकतीच पार पडली. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे, उद्घाटक म्हणून विद्यापीठ व्य. प. सदस्य तथा पदार्थ विज्ञान प्रमुख डॉ. संदीप वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून टेक्नोसंकल्प प्रा. लि. अमरावतीचे संचालक श्री संदीप पांडे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधीचा लाभ घेऊन प्रयत्न करावेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असावे, प्रकल्प राबवावे, विविध सर्किट्स तयार करुन आपले तांत्रिक कौशल्य वाढवावे, असे आवाहन उद्घाटनीय भाषणातून डॉ. संदीप वाघुळे यांनी विद्यार्थ्यांना केले. प्रमुख अतिथी श्री संदीप पांडे यांनी कंपनी उभारण्यामागील परिस्थिती, व्यवसाय कशाप्रकारे उभारला याची माहिती देवून विद्यार्थ्यांना त्यांनी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तर प्रा. डी.आर. सोळंके यांनी उर्जा संवर्धनाचे महत्व, एलईडी लॅम्पची कार्यक्षमता, निर्मिती प्रक्रिया यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



श्री संदीप पांडे विचार मांडतांना



डॉ. संदीप वाघुळे उद्घाटनपर बोलतांना

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुजाता काळे यांनी कार्यशाळा केवळ एलईडी लॅम्प निर्मितीपुरती मर्यादीत नाही, तर त्यामागील आधुनिक तंत्रज्ञान, प्रायोगिक कौशल्य विकास, शाश्वत विकासासोबतच सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

कार्यशाळेत ६५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विभागातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी श्री चंद्रकांत चौधरी, एन.एस्सी. अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्सच्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण दिले. विद्यापीठ संलग्नित महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, राजश्री शाहू महाविद्यालय, चांदुररेल्वे या महाविद्यालयातील विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी झाले होते.


कार्यशाळेला प्रा. के.डी. चिंचखेडे, प्रा. पी.एस. कंटाळे, प्रा. ए.एस. कदम, प्रा. यु.व्ही. चौधरी, डॉ. एन.एन. सरकार, प्रा. अमिन शाह, प्रा. सोनाली माचेवार, प्रा. यामीन शेख, प्रा. चेतना सावरकर, प्रा. हिमानी राऊत, प्रा. पल्लवी देशमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. पायल गवई, तर आभार राजकुमार राठोड याने मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.







एलईडी लॅम्प बनवितांना विद्यार्थीनी



# विद्यापीठात जनरेटिव्ह ए.आय. विषयावर एक दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम संपन्न



व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशनच्यावतीने ओपन सोर्स कम्युनिटी व गुगल फॉर डेव्हलपर्स यांच्या सहकार्याने जनरेटिव्ह एआय विषयावर नुकताच फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमामध्ये प्रॉम्ट डिझाईन ॲन्ड प्रोटोटायपिंग (व्हर्टेक्स कोर), एसडीकेस ॲन्ड स्टुडिओ गेट स्टार्टेड, व्हिजन ट्रॉफिक मॉनिटरिंग ॲन्ड चॅलेंज लॅब (व्हर्टेक्स एआय) एडीके एजेंट ॲन्ड सर्व्हर मॅनेजमेंट, व्हीएस कोड, क्लाऊड कॉन्सोल, फायरबेस होस्टिंग ॲन्ड डिप्लोमेंट अशा आधुनिक जनरेटिव्ह एआय आधारित विषयांवर प्रात्यक्षिकाव्दारे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. श्री. आशुतोष एस. भाकरे, श्रीमती गीता काकाणी, श्री. सौरभ मिश्रा, श्री. जितेंद्र गुप्ता या वक्त्यांनी जनरेटिव्ह एआय तंत्रज्ञानाची संकल्पना, त्याचे शैक्षणिक, संशोधन व तांत्रिक क्षेत्रातील उपयोग याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष डेमो व केस स्टडीजमुळे सहभागी प्राध्यापकांना या तंत्रज्ञानाचा व्यवहार्य वापर समजून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमासाठी इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक प्रा. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर तसेच प्राईम सोल प्रायव्हेट लि. चे संचालक श्री सौरभ सिसोदिया यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. कार्यक्रमामुळे सहभागी शिक्षकांना जनरेटिव्ह एआय तंत्रज्ञानाचे अद्ययावत ज्ञान मिळाले. एवढेच नाही, तर अध्यापन, संशोधन आणि नवोन्मेषाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व लाभदायक ठरल्याचे सहभागी प्राध्यापकांनी याप्रसंगी नमूद केले. कार्यक्रमाला विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील



प्रशिक्षण देतांना

# संस्कृत भाषाच नव्हे, संस्कृतीचा आत्मा - प्र - कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे
# विद्यापीठात वाङ्:वनिता संस्कृत साहित्य संमेलन संपन्न



अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

संस्कृत ही केवळ भाषा नसून, भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीला देववाणीची ओळख होईल आणि तिचा वारसा टिकून राहील, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या संयुक्त विद्यमाने डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्या सभागृहात आयोजित वाङ्:वनिता संस्कृत साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. विचारपीठावर संमेलनाच्या बीजभाषक कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेकच्या माजी अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीच्या संस्कृत विभागप्रमुख डॉ. रुपाली कविश्वर, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कलापिनी अगस्ती, विश्व संस्कृत प्रतिष्ठान (वाराणसी) विदर्भ प्रदेश समितीच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती राम पिंजरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.

पहिल्या सत्राचे बीजभाषण करतांना डॉ. नंदा पुरी यांनी 'संस्कृत साहित्यात महिलांचे योगदान' या विषयावर अत्यंत चिंतनशील व मार्मिक मार्गदर्शन केले. लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी यांसारख्या प्राचीन महिलावीर, तर आजच्या काळातील विदुषींच्या कार्याचा त्यांनी उल्लेख करून संस्कृतच्या समृध्द वारशात महिलांचे स्थान किती महत्वपूर्ण आहे, हे स्पष्ट केले. सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. रुपाली कविश्वर होत्या. त्यांच्या अभ्यासपूर्ण व ह्रदयस्पर्शी मार्गदर्शनाने उपस्थित भारावुन गेले. दुपारच्या सत्रात डॉ. कलापिनी अगस्ती यांनी 'संस्कृत साहित्याची आधुनिक काळातील प्रासंगिकता' या विषयावर मार्गदर्शन करतांना विज्ञान, तंत्रज्ञान व आयुर्वेदाशी संस्कृतचे नाते जोडून आजच्या युगातही देववाणीचे अमूल्य महत्त्व त्यांनी पटवून दिले. सत्राच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती राम पिंजरकर म्हणाल्या, संस्कृतचा प्रचार व प्रसाराची आपली सामूहिक जबाबदारी असून ती पार पाडावी, असे त्या म्हणाल्या.



पुस्तकाचे विमोचन करतांना मान्यवर



दीपप्रज्वलन करून संमेलनाची सुरुवात झाली

संमेलनात विद्यार्थ्यांनी संस्कृत गीते, नाटिका, स्वरचित प्रस्तूती सादर केल्या. मिरा भेरडे या चिमुकलीने बालगीत सादर केले. परमेश्वरी शेलोटकर हिने 'भगवतगीता स्तोत्र पठण', मैथिली अजनकर हिने 'स्त्री भ्रूणहत्या एकपात्री प्रयोग', आयुर्वेद महाविद्यालयाचे राजेंद्र गोळे यांनी 'आयुर्वेद एक विचार' यावर आपले विचार मांडले. तर समूहगटात गृहविज्ञान विभागाने पोवाडा, महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी 'ऐगीरी नंदिनी' हे स्तोत्रपठण सादर केले. याप्रसंगी स्वप्ना प्रशांत यावले यांच्या दोन पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. वेदांचा सामान्य परिचय व दशरूपकमब ही दोन पुस्तके एम.ए. संस्कृतच्या प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमात आहेत. समारोप सत्रात पुस्तके व प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. प्रास्ताविक विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांनी,प्रा. स्वप्ना यावले यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन राहुल लोधा व प्रियांका मोहोड, तर आभार आकाश हरणे यांनी मानले. संमेलनाला विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षकवृंद, विद्यार्थी, विद्यार्थीनी, गणमान्य नागरिक उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत



कु. कल्याणी सांगुनवेढे (प्रथम)



कु. समा लिवा (द्वितीय)



मो. लाईक (तृतीय)



अंकित चौबे (तृतीय)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या कु. कल्याणी सांगुनवेढे प्रथम, कु. समा लिवा द्वितीय, मो. लाईक व अंकित चौबे तृतीय या विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तुंग भरारी घेत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळिवले आहे.

कु. कल्याणी सांगुनवेढे हिने विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ एम.पी.एडब. परीक्षेत ३२०० पैकी २९३२ गुण मिळवून सुवर्ण पदकाची मानकरी ठरली आहे. तसेच तिने नेट (पीएच.डी) जून व डिसेंबर-२०२५ उत्तीर्ण केली आहे. विद्यार्थ्यांनी मिळिवलेल्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बरहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय विभागातील सर्व



# विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात 'फिजिक्स ऑफ रेनफॉरेस्ट इकॉलॉजी' विषयावर व्याख्यान संपन्न



विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्राच्या पारंपरिक अभ्यासाबरोबरच पर्यावरण व परिसंस्था अभ्यासामधील भौतिकशास्त्राच्या आंतरशाखीय उपयोगांची ओळख व्हावी, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात फिजिक्स क्लब अंतर्गत 'फिजिक्स ऑफ रेनफॉरेस्ट इकॉलॉजी' विषयावर नुकतेच विशेष व्याख्यान संपन्न झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील भौतिकशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख व प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ प्रा. डॉ. सुभाष बेहेरे यांनी वर्षावन परिसंस्थेच्या अभ्यासामध्ये भौतिकशास्त्राची भूमिका सोप्या आणि उदाहरणांसह स्पष्ट केली. ऊर्जा प्रवाह, ऊष्मागतिकी, द्रवगतिकी, किरणोत्सर्ग संतुलन, आर्द्रता चक्र, पर्जन्यमानाचे स्वरुप आणि जैवविविधतेचे वितरण या सर्व घटकांचा अभ्यास भौतिकशास्त्रीय तत्त्वांच्या साहाय्याने कसा करावा, आधुनिक वैज्ञानिक साधने, गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विश्लेषण यांचा वापर करून पर्यावरणीय बदलांचा अभ्यास कसा केला जातो, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महत्त्वाचे म्हणजे पर्यावरणीय भौतिकशास्त्र आणि परिसंस्था संशोधनातील करिअर व संशोधनाच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना हवामान बदल, जैवविविधता संवर्धन आणि पर्यावरणीय संतुलन यांसारख्या जागतिक समस्यांच्या निराकरणामध्ये भौतिकशास्त्रज्ञांची भूमिका कशी महत्त्वाची आहे याविषयी व्याख्यानाच्या माध्यमातून महत्वाची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांनी आंतरशाखीय संशोधन क्षेत्रांकडे वळावे आणि भौतिकशास्त्राच्या ज्ञानाचा समाजोपयोगी संशोधनासाठी उपयोग करावा, असे आवाहन याप्रसंगी व्याख्याते डॉ. बेहरे यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी डॉ. बेहरे यांनी विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले.

प्रास्ताविकेतून विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांनी व्याख्यानाच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. आभार फिजिक्स क्लबचा अध्यक्ष व एम.एस्सी. भाग-२ चा विद्यार्थी आदित्य प्रधान याने मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची स्टारका उद्योग समूहाला शैक्षणिक भेट



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि अभ्यासक्रमातील संकल्पना उद्योगांमध्ये कशा प्रकारे वापरल्या जातात, याची प्रत्यक्ष ओळख व्हावी, या उद्देशाने अमरावती शहरातील औद्योगिक क्षेत्रातील स्टारका इन्नोव्हेटिव्ह सिस्टिम प्रा. लि. या उद्योग समूहाला शैक्षणिक भेट देण्यात आली. या भेटीप्रसंगी विद्यार्थ्यांनी कंपनीतील आधुनिक उत्पादन प्रक्रिया, तांत्रिक उपकरणांची रचना, गुणवत्ता नियंत्रण प्रणाली तसेच उद्योगामध्ये वापरल्या जाणा-या भौतिकशास्त्रीय तत्त्वांचा प्रत्यक्ष अभ्यास केला. तर कंपनीतील तज्ज्ञांनी उत्पादन प्रक्रियेतील विविध टप्पे, औद्योगिक ऑटोमेशन, ऊर्जा व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याबाबत विद्यार्थ्यांना विस्तृत मार्गदर्शन केले.

प्रयोगशाळा व उत्पादन विभागाची पाहणी करताना विद्यार्थ्यांना सैध्दांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष औद्योगिक कार्यपध्दती यातील संबंध स्पष्टपणे



समजून घेण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी उद्योगातील सुरक्षा नियम, उपकरणांची कार्यपध्दती, गुणवत्ता तपासणी प्रक्रिया तसेच संशोधन व नवोपक्रमाचे महत्त्व याबाबत माहिती घेतली. उद्योग क्षेत्रात भौतिकशास्त्र विषयाचे व्यापक उपयोग कसे आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांना या भेटीतून झाली. विशेषतः उत्पादन व्यवस्थापन, मापन तंत्रज्ञान, सामग्री विज्ञान आणि ऊर्जा कार्यक्षमतेशी संबंधित संकल्पना विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून जाणून घेतल्या. विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील प्राध्यापक डॉ. जी. जी. मुळे, प्रा. प्रियंका गोळे (ठाकरे), प्रा. कु. श्वेता वाघमारे, प्रा. विजय लोडे, प्रा. गौरव सातव, प्रा. एन. एस. थोरात, प्रा. वैभव भोरजार उपस्थित होते. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. नितीन लव्हाळे, श्री. गजानन काळे, श्री. अरुण पवार यावेळी उपस्थित होते. भौतिकशास्त्र क्लबचे अध्यक्ष व एम.एस्सी. भाग–२ चा विद्यार्थी आदित्य प्रधान याने समन्वयनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी उद्योगातील तज्ज्ञांशी संवाद साधत करिअरच्या संधी, कौशल्य विकास आणि उद्योगाभिमुख शिक्षणाचे महत्त्व जाणून घेतले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची



आवड वाढण्यासोबतच उद्योग क्षेत्रात कार्य करण्यासाठी आवश्यक कौशल्यांची जाणीव निर्माण झाली. अभ्यासक्रमातील सैध्दांतिक ज्ञानाला व्यावहारिक दृष्टिकोन मिळाल्याने आत्मविश्वास वाढल्याचे मत विद्यार्थ्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. ही औद्योगिक भेट विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी उपयुक्त ठरली. भविष्यात अशा उद्योगभेटींचे आयोजन करून विद्यार्थ्यांना उद्योग शिक्षण दुवा अधिक मजबूत करण्याचा विभागाचा मानस असल्याचे विभाग प्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांनी सांगितले.

# विद्यापीठात क्लाऊड आणि जनरेटिव्ह ए.आय. वर तांत्रिक कार्यशाळा संपन्न

## रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन, संगणकशास्त्र विभाग व एडब्ल्यू क्लाऊड क्लबचा संयुक्त उपक्रम




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संगणक शास्त्र विभाग, एडब्ल्यू क्लाऊड क्लब आणि इन्क्युबेशन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्लाउड आणि जनरेटिव्ह एआय' या विषयावर एक दिवसीय विशेष तांत्रिक कार्यशाळा उत्साहात पार पडली. शैक्षणिक सिद्धांत आणि उद्योगातील बदलत्या गरजा यांच्यातील दरी सांधण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान आणि जागतिक उद्योगातील अनुभवांची ओळख करून देण्यात आली.

कार्यशाळेत आनंद मेहता यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. ते सध्या एनएएसडीएक्यू मध्ये कार्यरत असून एडब्ल्यूएसचे कम्युनिटी बिल्डर, 'फिनऑप्स' आणि एआय क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत. त्यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून मल्टि-क्लाउड आर्किटेक्चर आणि एंटरप्राइझ स्तरावरील तंत्रज्ञानावर कार्यशाळेत प्रकाश टाकला.

कार्यशाळेत एडब्ल्यूएस फाउंडेशन, क्लाऊड कॉम्प्युटिंगच्या मूलभूत संकल्पनांसह एडब्ल्यूएस च्या विविध सेवांची सखोल माहिती देण्यात आली. तसेच वास्तविक जगात आणि विविध उद्योगांमध्ये एआय चा प्रभावी वापर कसा केला जातो, फिनऑप्स, क्लाऊडवरील खर्च कमी करणे, आर्थिक व्यवस्थापन करण्याचे कौशल्य, जे सध्याच्या कॉर्पोरेट जगात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, करिअर रोडमॅप, क्लाऊड आणि एआय क्षेत्रात करिअरच्या संधी आणि अपेक्षा आदिंबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यशाळा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या नेतृत्वात व प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे मार्गदर्शन आणि कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मो. अतिक, विभागातील शिक्षक तसेच इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर, नरेश मोवाळे, रवी ढेंगळे, भावेश वारके, संतोष मालधुरे, एडब्ल्यूएस क्लाऊड क्लब कॅप्टन यश साठे व प्रणव शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. कार्यक्रमात सर्व सहभागींना एडब्ल्यूएस कडून प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यशाळेत संगणकशास्त्र विभागातील पदवी,

# सज्जनांचे रक्षण, दृष्टांचा विनाश आणि धर्माची संस्थापना यासाठी भगवान श्रीकृष्णाचा जन्म प्रसिध्द व्याख्याते डॉ. विनोद कोलवाडकर यांचे प्रतिपादन

## विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यान संपन्न



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

भगवान श्रीकृष्णाची दैवी रूपं महाभारतात जागोजागी आढळत असून सज्जनांचे रक्षण करणे, दुष्टांचा विनाश करणे आणि धर्माची संस्थापना करणे यासाठी भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला. महाभारताच्या प्रमाण संहितेत आलेल्या गोष्टींना वाचकांनी महत्त्व द्यावं. कथा, कादंब-यांतून अनेक घटना वस्तुस्थितीला सोडून आल्या असल्यामुळे वाचकांनी तारतम्य राखून महाभारताचं आकलन करावं. महाभारतात द्रौपदी स्वयंवरात कृष्णाचा पहिल्यांदा प्रवेश झालेला आहे. त्या प्रसंगानंतर पडवांशी त्यांचा परिचय झालेला आहे. तेथून पुढे महाभारताचे १८ दिवसांचे युध्द होईपर्यंत भगवान श्रीकृष्णाने वेळोवेळी पांडवांना मार्गदर्शन केले, असे विस्तृत मार्गदर्शन पांच हजारांवर प्रवचनं करणारे डॉ. विनोद कोलवाडकर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'महाभारतातील कृष्ण' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून दै. हिंदुस्थान वृत्तपत्राचे प्रबंध संपादक तथा विदर्भ साहित्य संघाचे अमरावती शाखा अध्यक्ष श्री विलास मराठे, मराठी विभाग प्रमुख डॉ. मोना चिमोटे उपस्थित होते.

**मराठी भाषेचा न्यूनगंड सोडा, अभिमानाने मराठी बोला – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे तरूणांना आवाहन**

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, जागतिकीकरण आणि शहरीकरणाच्या प्रवाहात आपल्या मातृभाषेचे अस्तित्व टिकवून ठेवणे हे प्रत्येक मराठी भाषिकाचे कर्तव्य आहे. आजच्या तरूण पिढीने मराठी भाषेचा न्यूनगंड बाळगण्याऐवजी तिचा अभिमान बाळगून ती व्यवहारात वापरली पाहिजे. आजच्या काळात समाजमाध्यमांचे आक्रमण आणि कॉन्व्हेंट संस्कृतीमुळे आपली तरूण पिढी मराठीपासून दूर जात आहे की काय, असा प्रश्न पडतो. अनेकदा मराठी कार्यक्रमांमध्येही वक्ते इंग्रजीचा वापर करतात, ही खेदजनक बाब आहे. पालकांनी आपल्या मुलांना घरी जाणीवपूर्वक मराठी बोलण्याची सवय लावली पाहिजे, जेणेकरून त्यांना आपल्या मातृभाषेची आणि संस्कृतीची मुळे घट्ट करता येतील, असा सल्लाही त्यांनी दिला. तरूणांच्या उदासीनतेवर भाष्य करताना कुलगुरू म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांना आपल्या गौरवशाली मराठा इतिहासाची, संत परंपरेची आणि लष्करी इतिहासाची पुरेशी माहिती नाही. पानिपतचे युध्द काय होते, हे समजण्यासाठी आजच्या पिढीला सिनेमाचा आधार घ्यावा लागतो, हे दुर्दैवी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, बाजीराव पेशवे आणि आपली संत परंपरा ही आपली खरी श्रीमंती असून, ती समजून घेणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. मराठी भाषेला आता 'अभिजात' दर्जा प्राप्त झाला आहे, ही आनंदाची बाब असल्याचे सांगत कुलगुरुंनी मराठी भाषा अत्यंत समर्थ आहे. इतिहासात अनेक संकटे आणि संघर्ष सोसूनही ही भाषा टिकून



विचारपीठावर उपस्थित मान्यवर



डॉ. विनोद कोलवाडकर विषयाची मांडणी करतांना

सुरुवातीला संत गाडगे बाबा व कवी वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रस्ताविक भाषणातून विभाग प्रमुख डॉ. मोना चिमोटे यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका विषद केली व पाहुण्यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरुंच्या हस्ते मराठी विभागातून नेट–सेट परीक्षा उत्तीर्ण निखिल चव्हाण, निशिगंधा सोनवणे, निलेश कुमरे, कु. स्नेहा खडसे यांचा तसेच आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल प्रशासन विभागातील अधीक्षक श्री धनंजय पाटील, आस्थापना विभागातील वरिष्ठ सहाय्यक डॉ. श्रीकांत तायडे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे, तर आभार अंशदायी शिक्षक अमृता राऊत यांनी मानले. कार्यक्रमाला मराठी विभागातील डॉ. माधव पुटवाड, डॉ. प्रणव कोलते, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. विशाल बापते, जनसंपर्क



डॉ. मोना चिमोटे

अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जगाला दिशा देण्याचे सामर्थ्य भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानात - डॉ. प्रवीण देशमुख

## विद्यापीठात श्री संत मारोती महाराज व्याख्यानमाला संपन्न



अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

समाजाचे अध:पतन होतांना दिसते आहे. त्यामुळे समाजाचे सर्वांगीण प्रबोधन होणे आवश्यक असून जगाला दिशा देण्याचे सामर्थ्य भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानात असल्याचे प्रतिपादन शिवशक्ती विद्यालय, कळंब, जि. यवतमाळ येथील सहाय्यक शिक्षक डॉ. प्रवीण देशमुख यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात श्री संत मारोती महाराज संस्थान, माकनेर यांच्या दाननिधीतून केमिकल टेक्नॉलॉजी विभागातर्फे आयोजित 'आध्यात्मिक लोकशाहीचे श्रेष्ठ भाष्यकार' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, दानदात्यांचे प्रतिनिधी प्रा. दिवाकर देशमुख, रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. बी. नाईक उपस्थित होते.

डॉ. प्रवीण देशमुख पुढे म्हणाले, नीतीमान व चिकित्सक समाज आज अभिप्रेत आहे. विज्ञानमूल्य, आध्यात्मिक जोड असलेला समाज घडला, तर भारताला विश्वगुरू बनल्याशिवाय कोणीच रोखू शकणार नाही. भारतभूमितच सर्व संतांचा जन्म झाला. वेगवेगळ्या संप्रदायाचा आश्रयदाता आपली भूमी आहे. आध्यात्मिक लोकशाहीची सुरुवात संत ज्ञानेश्रवांनी केली. संतांनी समाजासाठी खूप कार्य केले आहे, असेही डॉ. देशमुख म्हणाले.

**तरुणांनो, व्यसनाच्या आहारी जावू नका – कुलगुरू**

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू म्हणाले, व्यसनाधीनतेचे मोठे संकट आज दिसत आहे. त्यातच मोबाईलचे देखील मोठे वेड लागल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे तरुणांनी व्यसनाच्या आहारी जावू नये, असे आवाहन त्यांनी केले. कौटुंबिक मूल्यांचा –हास, न्यूक्लियर फॅमिली आणि लिव्ह–इन रिलेशनशिप यांसारख्या संकल्पनांमुळे भारतीय समाजव्यवस्था आणि कौटुंबिक वीण विस्कळीत होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. कुलगुरू म्हणाले, आज संत साहित्याची अत्यंत आवश्यकता असून समाजातील अंधःकार दूर करण्यासाठी ज्याप्रमाणे संतांनी कार्य केले, त्याचप्रमाणे आजच्या विस्कळीत समाजाला सावरण्यासाठी संत मारोती महाराज, गणपती महाराज, गुलाबराव महाराज यांच्या विचारांची तरुणांना ओळख करून देणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. यावेळी प्रा. दिवाकर देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

संत गाडगे बाबा व श्री संत मारोती महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. ए.बी. नाईक, सूत्रसंचालन कु. कृती बारबुध्दे, तर आभार डॉ. प्रदीप वानखडे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला



विषयावर व्याख्यान देतांना वक्ते डॉ. प्रवीण देशमुख व विचारपीठावर उपस्थित मान्यवर



व्याख्यान कार्यक्रमाला उपस्थित प्रेक्षक

## विद्यार्थ्यांचे प्रेम हीच चांगल्या शिक्षकाची पावती - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
## डॉ. प्रसाद वाडेगावकर व डॉ. वर्षा वाडेगावकर यांना सेवानिवृत्तीप्रसंगी समारंभपूर्वक निरोप



चांगला शिक्षक कसा असतो, आणि सेवानिवृत्तीप्रसंगी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात असलेली उपस्थिती हेच प्रेम एका चांगल्या शिक्षकाची पावती असते, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा–यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अविनाश बोर्डे, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती माजी प्र–कुलगुरू व जीवतंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर, सौ. वर्षा वाडेगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते प्रथमत: मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देवून पुढे म्हणाले, सध्या एआय चा काळ आहे व अशाही वेळी शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना अधिक प्रबळ करण्यासाठी प्रयत्नरत असतो. काळ कितीही बदलत असला तरी चांगला शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसाठी झटत असतो, असे सांगून त्यांनी उभयतांना उज्ज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. वर्षा वाडेगावकर यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला, तर डॉ. वर्षा वाडेगावकर यांचा डॉ. स्वाती शेरेकर यांनी साडी–चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. अविनाश बोर्डे म्हणाले, एकाच वेळी दोघेही सेवेतून निवृत्त होत आहे, हा विद्यापीठाच्या इतिहासातील पहिला योग असावा. वृत्तीची निवृत्ती होत नाही व ती होऊ नये. नावाप्रमाणेच डॉ. वाडेगावकर यांनी विद्यार्थ्यांना प्रसाद दिला आणि पुढेही ते विद्यापीठाला आणि विद्यार्थ्यांना देतील, असे सांगून त्यांनी दोन्ही सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, विद्यापीठाच्या इतिहासामध्ये एकाच दिवशी पती–पत्नी दोघेही एकाच संस्थेतून सेवानिवृत्त होण्याचा हा पहिलाच दुर्मिळ आणि आनंदाचा योग आहे. डॉ. वाडेगावकर सरांचे शिक्षण हिंदी माध्यमातून झाले असूनही, मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. सरांच्या निवृत्तीमुळे विद्यार्थ्यांसाठी पेला अर्धा रिकामा वाटू शकतो, पण त्यांनी दिलेली शिदोरी आणि प्रेरणा हा पेला सदैव भरलेला ठेवण्यास मदत करेल.



अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



मनोगत व्यक्त करतांना डॉ. प्रसाद वाडेगावकर

सत्काराला उत्तर देतांना डॉ. प्रसाद वाडेगावकर म्हणाले, सेवेतून निवृत्त झालो तरी समाजाप्रति असलेली बांधिलकी कायम राहील. सेवानिवृत्ती ही केवळ कार्यालयीन कामकाजातून झालेली सुटका, मात्र कार्याप्रती असलेली वृत्ती कधीही निवृत्त होत नाही. ज्ञानाचा 'प्रसाद' आपण सातत्याने विद्यार्थ्यांना वाटला आहे आणि ज्ञानदानाची ही परंपरा भविष्यातही सुरू राहील. विविध क्षेत्रात काम करताना आणि शैक्षणिक प्रवासात विद्यापीठाने मला खूप काही दिले. आज मी सेवेतून निवृत्त होत असलो, तरी माझ्या कार्याची शिदोरी आणि समाजाप्रती असलेली वृत्ती कधीही निवृत्त होणार नाही. विद्यापीठ प्रशासन, सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतांना संस्थेच्या प्रगतीत सर्वांचा सहभाग महत्त्वाचा असतो. आपल्या यशस्वी प्रवासात पत्नी प्रा. वर्षा वाडेगावकर यांच्या खंबीर साथीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला व विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि विद्यापीठाच्या विकासासाठी आपण नेहमीच उपलब्ध राहू, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी डॉ. सौ. वर्षा वाडेगावकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना सेवाकाळात सहका–यांकडून मिळालेल्या आदरभाव, स्नेहाबद्दल आभार व्यक्त केले. विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या व दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, सचिव श्री श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची



मनोगत व्यक्त करतांना प्रा. वर्षा वाडेगावकर

सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी



**साधना ट्रस्ट संचलित ग. प्र. प्रधान संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या वतीने डॉ.सुनील पाटील यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मिलिंद बारहाते यांच्याशी विद्यापीठांचे आर्थिक भविष्य : अनुदान, खर्च आणि टिकाऊ नवा आराखडा या विषयावर संवाद साधून मुलाखत घेतली. साप्ताहिक 'साधना' च्या दि. ७ मार्च २०२६ च्या अंकात ही मुलाखत प्रकाशित झाली आहे.**

## विषय : विद्यापीठांचे आर्थिक भविष्य : अनुदान, खर्च आणि टिकाऊ नवा आराखडा

अमरावतीचे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण नकाशावर केवळ एक केंद्र नाही, तर विदर्भाच्या सामाजिक-शैक्षणिक संघर्षाची साक्ष आहे. १९८३ साली नागपूर विद्यापीठातून वेगळे होऊन स्थापन झालेले हे विद्यापीठ अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करणारे प्रमुख केंद्र म्हणून कार्यरत आहे. शेतीप्रधान, ग्रामीण आणि आदिवासी लोकसंख्येचा मोठा पट्टा या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतो, त्यामुळे येथे उच्च शिक्षणाचा प्रश्न हा केवळ शैक्षणिक न राहता सामाजिक संदर्भांनी व्यापलेला आहे. या विद्यापीठाची ओळख केवळ आकडेवारीत बसणारी नाही. विदर्भातील शेतीआधारित अर्थव्यवस्था, स्थलांतर, आदिवासी भागातील शिक्षणाचा तुटलेला प्रवाह आणि रोजगाराच्या मर्यादित संधी या सगळ्यांचा भार विद्यापीठावर अप्रत्यक्षपणे येतो. त्यामुळे येथे उच्च शिक्षणाचा प्रश्न हा केवळ शैक्षणिक न राहता तो सामाजिक उत्तरदायित्वाचा प्रश्न बनतो. गुणवत्तेचा आग्रह धरताना वास्तवाचा स्वीकार करावा लागतो आणि वास्तव स्वीकारताना आकांक्षा जपण्याची तारेवरची कसरत करावी लागते.

सुमारे ७५० एकरांवर पसरलेला अमरावती विद्यापीठाचा कॅम्पस हा भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असला, तरी त्याच्या व्यवस्थापनाशी निगडित आव्हानेही तितकीच मोठी आहेत. मोठा परिसर, पायाभूत सुविधांची देखभाल, संलग्न महाविद्यालयांचा पसारा आणि विद्यार्थ्यांची सामाजिक पार्श्वभूमी, या सगळ्याचा ताण विद्यापीठाच्या प्रशासनावर सातत्याने जाणवतो. विदर्भातील आर्थिक मर्यादा, रोजगाराच्या संधींचा अभाव आणि शिक्षणातून अपेक्षित असलेली सामाजिक उन्नती यांचा समतोल राखणे हे येथे नेहमीच आव्हानात्मक राहिले आहे. इथे गुणवत्तेचा आग्रह धरताना वास्तवाची जाणीव ठेवावी लागते आणि वास्तव स्वीकारताना शैक्षणिक आकांक्षा जपाव्या लागतात.

भारतीय सार्वजनिक विद्यापीठे आज ज्ञाननिर्मितीपेक्षा आर्थिक टिकावासाठी अधिक झगडताना दिसतात. घटती अनुदाने, वाढते वेतन-पेन्शनचे ओझे, थांबलेली पायाभूत गुंतवणूक आणि स्वतः उत्पन्न निर्माण करा हा वाढता दबाव. या सगळ्यांच्या कात्रीत विद्यापीठांचे शैक्षणिक स्वप्न अडकले आहे.

विद्यापीठ म्हणजे कॉर्पोरेट संस्था नाही; पण त्याच वेळी ती केवळ अनुदानावर चालणारी यंत्रणाही राहू शकत नाही. या ताणातूनच आर्थिक स्वायत्तता, "मोनिटायझेशन", "PPP", "CSR", "स्वयं-उत्पन्न" असे शब्द शिक्षणाच्या शब्दकोशात ठळक झाले आहेत. मार्च २०२४ मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीबाबत राज्यभरात चर्चा सुरू झाली. "जनरल फंड संपत चालला आहे", "पगारासाठी निधी अपुरा" अशा बातम्यांनी केवळ एका विद्यापीठाचा प्रश्न मांडला नाही; तर सार्वजनिक उच्च शिक्षण व्यवस्थेच्या खोलात रुजलेल्या आर्थिक असुरक्षिततेकडे लक्ष वेधले.

याच पार्श्वभूमीवर प्रा. मिलिंद बारहाते यांनी कुलगुरू म्हणून स्वीकारलेली जबाबदारी महत्त्वाची ठरते. प्रा. बारहाते हे वाणिज्य आणि व्यवस्थापन शास्त्रातील ख्यातनाम तज्ज्ञ आहेत, शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ योगदान दिले आहे. त्यांनी नागपूरच्या सी.पी. अँड बेरार कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली, नंतर ते तेथेच व्यवस्थापन विभागाचे समन्वयक झाले आणि २०१० मध्ये प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळली. त्यांनी वाणिज्य आणि व्यवस्थापन विषयात पदव्युत्तर पदव्या प्राप्त केल्या असून, बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पीएच.डी. पूर्ण

ज्यामुळे त्यांना प्रशासकीय निर्णय घेताना कायदेशीर दृष्टिकोन मिळतो. संशोधन क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. रिटेल मॅनेजमेंट, एक्स्पोर्ट मॅनेजमेंट आणि इंटरनॅशनल फायनान्शियल मॅनेजमेंट या विषयांवर तीन पुस्तके लिहिली आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये त्यांचे १७ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत, आणि जमिनीला पाणी देण्याच्या प्रणालीवर त्यांना पेटंट मिळाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १२ संशोधकांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे, आणि त्यांनी 'संशोधन' या राष्ट्रीय जर्नलचे संपादक म्हणून १० वर्षे काम केले आहे. याशिवाय त्यांनी पाच पुस्तकांचे संपादनही केले आहे. आज ते अमरावती विद्यापीठाचे नेतृत्व करत आहेत.

ते विद्यापीठाच्या प्रश्नांकडे केवळ प्रशासकीय अडचणी म्हणून पाहत नाहीत, तर आर्थिक शिस्त, दीर्घकालीन टिकाव आणि सार्वजनिक शिक्षणाची जबाबदारी या व्यापक चौकटीतून पाहतात. अनुदानावर अवलंबून असलेल्या सार्वजनिक विद्यापीठांना आज आर्थिक नियोजन, खर्चाचे प्राधान्यक्रम आणि उत्पन्ननिर्मितीचे नवे मार्ग यांचा गंभीरपणे विचार करावा लागतो, हे ते ठळकपणे मांडतात.

अमरावती विद्यापीठासमोरील प्रश्न हे एका विद्यापीठापुरते मर्यादित नाहीत. वाढता देखभाल खर्च, आउटसोर्सिंगची गरज, संशोधनाची दिशा, शिक्षकांच्या कामगिरीचे मूल्यमापन आणि सामाजिक बांधिलकी या सगळ्यांचा एकत्रित विचार केल्याशिवाय विद्यापीठाचे भवितव्य ठरवता येणार नाही. म्हणूनच ही मुलाखत केवळ एका प्रशासकाचे अनुभवकथन न राहता, सार्वजनिक उच्च शिक्षण व्यवस्थेच्या सध्याच्या स्थितीवर टाकलेला विचारपूर्ण प्रकाश ठरते.

प्रा. मिलिंद बारहाते यांच्याशी झालेला हा संवाद अमरावती विद्यापीठाच्या वास्तवाकडे पाहताना, महाराष्ट्रातील अनेक सार्वजनिक विद्यापीठांना लागू पडणाऱ्या प्रश्नांची जाणीव करून देतो. आर्थिक शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि शैक्षणिक गुणवत्ता यांचा समतोल साधण्याची ही चर्चा 'साधना' साप्ताहिकाच्या वाचकांसाठी विचारप्रवर्तक ठरेल, अशी अपेक्षा आहे.

**प्रश्न :** शिक्षक ते कुलगुरू हा प्रवास कसा घडत गेला?

**उत्तर :** माझे वडील नागपूरमध्ये भौतिकशास्त्राचे प्राध्यापक होते. ते अनेक वर्षे शिक्षक संघटनेत सक्रिय होते. त्यामुळे घरात लहानपणापासून शैक्षणिक वातावरण होते. शिक्षक-विद्यार्थी यांचे प्रश्न, संघर्ष, अपेक्षा यांची जाणीव नकळत होत गेली. पदव्युत्तर शिक्षणानंतर करिअरचे काही पर्याय होते, पण शिक्षण क्षेत्राची ओढ अधिक होती. नागपूरच्या महाविद्यालयात व्यवस्थापन विषयाचा शिक्षक म्हणून रुजू झालो, नंतर प्राचार्य झालो, आणि त्या अनुभवाच्या बळावर कुलगुरूपदाची जबाबदारी आली.

**प्रश्न :** 'सर आपण वाणिज्य आणि व्यवस्थापन शास्त्राचे प्रदीर्घ काळ अभ्यासक आहात. एक शिक्षणतज्ज्ञ' कुलगुरू होणे आणि 'व्यवस्थापनतज्ज्ञ' कुलगुरू होणे यामुळे विद्यापीठाच्या आर्थिक नियोजनात पडणारा फरक खरोखर निर्णायक ठरतो का?

**उत्तर –** दोन्ही ठिकाणी उद्दिष्ट एकच असते, विद्यापीठाचे हित. पण व्यवस्थापनाची शिस्त आणि आर्थिक वास्तव समजून घेण्याची सवय हा फरक घडवते. मी कुलगुरू म्हणून रुजू झालो तेव्हा विद्यापीठाचा जनरल फंड आटलेला होता. विद्यापीठाचा सामान्य निधी काही दिवसांपूर्वी अगदी शून्यावर आला होता. दोनच महिन्यात वृत्तपत्रात मोठ्या बातम्या आल्या. विद्यापीठाकडे नियोजन नाही,दिवाळे निघाले वगैरे अशा आशयाच्या. मी आढावा घेतला. अभ्यास केला आणि त्याची फळे मिळाली. २०२३-२४ मध्ये तूट १७ कोटी होती. मी तातडीने 'कॉस्ट-कटिंग'चे कडक धोरण राबवले. अनावश्यक जेवणावळी बंद केल्या. कॅम्पसवरील अल्पप्रवेश होते असे काही विषयांचे विनाअनुदानित पदव्युत्तर अभ्यासक्रम बंद केले. उधळपट्टी थांबवली. त्याचे फळ असे मिळाले की २०२४-२५ मध्ये ही तूट १२ कोटींवर आली. म्हणजे एका वर्षात ५ कोटींची बचत.मी कुलगुरूंच्या गाडीच्या डिझेलपासून ते चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापर्यंत आणि स्टेशनरीपर्यंत काटकसर सुरू केली. १० रुपयांचे काम

**प्रश्न –** खर्च कपात करताना विरोध झाला नाही का?

**उत्तर–** निर्णय घेतले की विरोध होणार, हे माहीत होते. त्यामुळे आधी सर्व प्राधिकरणे, संघटना, अधिकारी–कर्मचारी यांना विद्यापीठाची खरी आर्थिक स्थिती समजावून सांगितली. सुदैवाने सहकार्य मिळाले. 'दहा पैकी पाचावर काम होत असेल तर तेवढ्यात निभावू' अशी मानसिकता तयार झाली. कुलगुरूपासून वर्ग चारपर्यंत काटकसरीचे धोरण राबवता आले.

**प्रश्न –** संत गाडगेबाबा यांच्या दशसूत्रीचा वारसा आजच्या प्रशासनात कसा उतरवता?

**उत्तर –** दशसूत्री केवळ शिक्षणापुरती मर्यादित नाही. सामाजिक, सांस्कृतिक जबाबदारीही त्यात आहे. यवतमाळ जिल्हा महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्येसाठी महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांसाठी उपक्रम, विधवा महिलांसाठी मदत,शेतकरी आत्महत्या संदर्भात संशोधनप्रकल्प, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी संत गाडगेबाबा पुरस्कार योजना हे सगळे त्याच विचारातून आले. विद्यापीठ हे समाजापासून वेगळे नाही.

**प्रश्न –** कुलगुरूंच्या शैक्षणिक आकांक्षा आणि विद्यापीठाचे आर्थिक वास्तव यात रोज संघर्ष होत नाही का?

**उत्तर –** संघर्ष असतो, पण सुवर्णमध्य साधता येतो. संशोधन किंवा शिक्षणाशी तडजोड करण्याची वेळ माझ्या काळात तरी आलेली नाही.

प्रश्न – भारतीय विद्यापीठे 'राज्य–अनुदानित' (State-Funded) कडून 'राज्य–समर्थित' (State-Supported) कडे झुकत आहेत. सरकार जबाबदारी झटकतेय की आपण स्वायत्ततेकडे जातोय?

**उत्तर –** मी असं म्हणणार नाही की सरकार जबाबदारी झटकत आहे, कारण बदलत्या काळाबरोबर खाजगी विद्यापीठांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, आणि अमरावतीसारख्या भागातही ती दिसते. या स्पर्धेत टिकायचे असेल तर राज्य विद्यापीठांना स्वतःमध्ये बदल करावे लागतील, आणि हे स्वायत्ततेकडे जाणारे पाऊल आहे. पारंपरिक मानसिकता ही आहे की शिक्षक वर्गात गेला, शिकवले, संशोधन केले की काम आटोपले, पण या पलीकडचा विचार शिक्षक, कुलगुरू आणि प्रशासनातील सर्वांना करावा लागेल. राज्य सरकार आपल्या परीने प्रयत्न आणि सहकार्य करत असते, पण या पुढच्या काळात विद्यापीठांनी आपली पारंपरिक मानसिकता सोडून नव्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. उदाहरणार्थ, स्वयं–उत्पन्नाचे मार्ग शोधणे, उद्योगांशी सहयोग वाढवणे हे स्वायत्तता वाढवते, आणि सरकारची भूमिका समर्थनाची राहते. हे संक्रमण विद्यापीठांना अधिक लवचिक आणि स्वावलंबी बनवते, ज्यामुळे ते भविष्यातील बदलांसाठी तयार होतात. विद्यापीठांनी आता स्वतःचे 'रेव्हेन्यू मॉडेल्स' उभे केलेच पाहिजेत. आपण केवळ 'अनुदान उपभोगणारे' न राहता 'संसाधने निर्माण करणारे' व्हायला हवे.

**प्रश्न–** अनुदान घटत आहे का? असे असेल तर जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा सार्वजनिक विद्यापीठांना शक्य आहेत का?

**उत्तर–** अनुदान घटत नाहीये, उलट पीएम उषा सारख्या योजनांद्वारे ते मिळत आहे, आणि महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यापीठांना त्याचा लाभ झाला आहे. अमरावती विद्यापीठाचे उदाहरण घ्या , आम्हाला २० कोटी रुपये मिळाले, ज्यातून सॉफ्ट स्किल इन्फ्रास्ट्रक्चर विकसित होत आहे. मल्टिपल क्लासरूम कॉम्प्लेक्स बांधले जात आहेत, मुलींच्या वसतिगृहाचे काम सुरू आहे, आणि सॉफ्ट कॉम्पोनंटसाठी प्राप्त पैशातून वर्षभर कार्यशाळा आणि परिषदा आयोजित केल्या जातील. पायाभूत सुविधांसाठी आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी निधी उपलब्ध आहे, त्यामुळे जागतिक दर्जाची निर्मिती सार्वजनिक विद्यापीठांना शक्य आहे. मात्र, केंद्राच्या विविध एजन्सीजकडूनही संशोधन प्रोजेक्ट्ससाठी निधी मिळतो, ज्याने इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत होते.

**प्रश्न –** पूर्वी कॅम्पसवर संशोधानाचे कल्चर दिसायचे ते आता दिसत नाही. हे संशोधन निधी अभावी झाले का?

उत्तर– निधी कमी झालाय हे खरे असले तरी काही पर्याय उभे राहिले आहेत. राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोगाकडून निधी दिला जातो. केंद्राच्या काही एजन्सीकडून संशोधन प्रकल्प सुरु आहेत. विद्यापीठ निधीतून तरुण संशोधकांना तीन लाख रुपयांपर्यंत लघू

**प्रश्न–** पण सर, विद्यापीठांवर स्वतःचे उत्पन्न वाढवण्यासाठी दबाव वाढतो आहे;पण, विद्यापीठ हे काही 'कॉर्पोरेट युनिट' नाही. मग 'नफा' आणि 'ज्ञानदान' यातील सीमारेषा कशी राखायची?

**उत्तर–** नफा मिळवणे हा शैक्षणिक संस्थांचा उद्देश कधीच नसतो, पण विद्यापीठ चालवायचे आणि उपक्रम राबवायचे तर पैसा लागतोच, आणि पैशाचे सोंग घेता येत नाही. मात्र, मी व्यवहारिक विचार करतो की विद्यापीठाचे जेवढे उत्पन्न आहे तेवढाच खर्च करावा, किंवा खर्चानुसार उत्पन्न वाढवावे, विशेषतः वेतन वगळून. सीमारेषा राखण्यासाठी मी शैक्षणिक गुणवत्ता प्राधान्य देतो, आणि आर्थिक निर्णय हे ज्ञानदानाला पूरक असतात. उदाहरणार्थ, परीक्षा शुल्क वाढवणे हे उत्पन्न वाढवते, पण ते विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर भार टाकत नाही असे पाहतो. हे संतुलन साधणे गरजेचे आहे, ज्यामुळे विद्यापीठ टिकून राहते आणि ज्ञानदान सुरू राहते.

**प्रश्न–** विद्यापीठांचा मुख्य खर्च कोणत्या क्षेत्रात होतो?

**उत्तर –** आउटसोर्सिंग(स्वच्छता, सुरक्षा, उद्यान आदीचे), सर्वविद्यापीठात नवी भरती नाही. त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचारी–अधिकारी यांनापुन्हा कामावर घ्यावे लागते. त्यांच्या वेतनचा भार जनरल फंडावर पडतो. शिवाय इमारती बांधताना पुढील २०–२५ वर्षांच्या मेंटेनन्सचा विचार केला जात नाही. त्यांच्या देखभालीवर मोठा खर्च होतो, ४५० एकर परिसर सांभाळणे हा मोठा खर्च आहे.

**प्रश्न–** यावर उपाय काय? हा सर्व विद्यापीठांचा प्रश्न आहे.

**उत्तर–** हा खर्च पूर्णपणे टाळता येत नाही, पण त्यात सुधारणा करता येतात, आणि ते आपल्या हातात आहे. उदाहरणार्थ, जिथे ५० कामगार/संगणक लागतात तिथे २५ देता येतील का ते पाहावे, गुणवत्तेशी तडजोड न करता खर्च कुठे कमी करता येतो ते अभ्यासावे. एक कोटी खर्चाऐवजी ७० लाखात काम होत असेल तर थेंबे थेंबे तळे साचे असे करून बचत करता येते. हे उपाय राबवल्यास आर्थिक स्थिरता येते.

**प्रश्न–** उच्च शिक्षणाचे लोकशाहीकरण होत असताना दुर्गम मेळघाट सारख्या भागातील मागास विद्यार्थ्यांसाठी दारे खुले ठेवणे आर्थिकदृष्ट्या परवडते का?

**उत्तर–** मेळघाट,धारणी येथे संलग्नित महाविद्यालये आहेत त्यामुळे आर्थिक भार विद्यापीठावर येत नाही मात्र त्या ठिकाणी पदव्युत्तर अभ्यासक्रम नाहीत.विद्यार्थ्यांनी तक्रारी केल्यात मेळघाटमध्ये आम्ही 'ट्रायबल स्किल सेंटर' सुरू करण्याचा २५ कोटींचा प्रस्ताव सरकारला दिला आहे. तिथला मध, मोह, जडीबुटी यावर प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण आणि उत्पादनाला बाजारपेठ मिळवून आम्ही देणार आहोत. सामाजिक भूमिकेतून पाहताना तिथे 'नफा' गौण ठरतो. पण या केंद्रातून जर स्थानिक रोजगार निर्माण झाला, तर ते विद्यापीठाचे सर्वात मोठे यश असेल. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आम्ही 'रिस्क' घेण्यास तयार आहोत, कारण तिथेच शिक्षणाची खरी गरज आहे.

**प्रश्न–** आर्थिक ओझ्याखाली शैक्षणिक नवकल्पना आणि संशोधनासाठी 'रिस्क कॅपिटल' कुठून येणार?

उत्तर– आउटसोर्सिंगमुळे विद्यापीठावर ताण पडत आहे, त्यामुळे उत्पन्न वाढविण्याशिवाय पर्याय नाही, पण संशोधन आणि इनोव्हेशनसाठी प्रत्येक विद्यापीठात सेक्शन ८ कंपनी स्थापन झाली आहे, आणि त्यातून इंनोव्हेशन–इन्कुबेशन सेंटर चालू आहे. राज्य आणि केंद्र सरकारकडून या कंपनीला स्टार्टअप्ससाठी निधी मिळतो, अमरावती विद्यापीठाला १५ कोटी रुपये मिळाले आहेत. ज्या स्टार्टअपमध्ये नाविन्यपूर्ण व्यावसायिक क्षमता आहे त्यांना बीज भांडवल दिले जाते, आणि हे 'रिस्क कॅपिटल' म्हणून काम करते. हे प्रत्येक विद्यापीठात सुरू आहे, आणि ते नवकल्पनांना प्रोत्साहन देते.

**प्रश्न–** परदेशी विद्यार्थी आकर्षित झाल्यास आर्थिक स्थिती सुधारेल?

उत्तर– युरोपियन विद्यार्थी लगेच येणार नाहीत. पण आफ्रिका, दक्षिण अमेरिका, दक्षिण आशिया येथील येऊ शकतात. तिथल्या १२ विद्यापीठांशी आम्ही सकारात्मक संवाद सुरू आहे. एकेकाळी बऱ्याच विद्यापीठात मध्य पूर्वेचे विद्यार्थी शिक्षण घ्यायचे,आता दिसत नाही.कदाचित आपले अभ्यासक्रम उद्योगाना मिळते जुळते नसावेत. परदेशात शिक्षण आणि संशोधन यात उद्योगाचा मोठा सहभाग असतो.

**प्रश्न–** 'कॉस्ट ऑडिट' शैक्षणिक क्षेत्रात राबवता येईल का? विद्यार्थ्यामागे होणारा खर्च आणि समाजाला आउटपुटचे गणित मांडणे गरजेचे आहे का?

**उत्तर–** ही कल्पना चांगली आहे, आणि ते करताही येईल, पण आपल्या सिस्टिममध्ये प्रत्यक्ष राबविणे कठीण आहे कारण मानसिकतेचा प्रश्न आहे आणि सार्वजनिक विद्यापीठांना नफ्याचे गणित डोळ्यासमोर ठेवता येत नाही. आउटपुट पाहायचे तर निकष कोणते ठेवणार, आणि ते सर्वमान्य हवेत. मात्र, राज्य विद्यापीठांना आज ना उद्या आपल्या सुरक्षित भविष्यासाठी हे करावे लागेल, विद्यार्थी येतो,शिकून जातो. शिक्षक रुजू होतो, शिकवतो,निवृत्त होऊन पेन्शन घेऊन जातो.यात शासनाचा पैसा कुठे खर्च होतो,त्याचे आउटपुट काय हे पाहावेच लागेल. कॉस्ट ऑडिट विद्यापीठांना अधिक उत्तरदायी बनवेल.

**प्रश्न –** आपल्याकडे 'अकॅडमिक' संशोधनाचा ढीग आहे, पण त्याची व्यावसायिक किंमत शून्य का असते? शिक्षकांमध्ये ही व्यावसायिक दृष्टी कशी येणार?

**उत्तर–** हे अत्यंत कटू सत्य आहे. अनेक प्राध्यापक केवळ पदोन्नतीसाठी (उअड) संशोधन करतात. ते कागदावर राहते. पण आमच्या विद्यापीठात डॉ. अनिता पाटील यांनी किडनी स्टोनवर औषध शोधले, त्याचे पेटंट नागपूरच्या एका कंपनीला दिले. जोपर्यंत संशोधनाचे रूपांतर 'उत्पादनात' होत नाही, तोपर्यंत ते संशोधन समाजासाठी उपयोगाचे नाही. शिक्षकांनी उद्योगांच्या गरजा ओळखून (Industry Needs) संशोधन करायला हवे. जर पेटंट कमर्शियल झाले, तर विद्यापीठाला आर्थिकदृष्ट्या मदत होईल. यातही विद्यापीठाला एकदाच काही रक्कम मिळण्यापेक्षा दरवर्षी यातून काही मिळत राहील याची नियमावली करावी लागेल कारण विद्यापीठाचे इन्फ्रास्ट्रक्चर वापरले जाते.

**प्रश्न –**विद्यापीठाने केवळ पदव्या देणारे केंद्र न राहता सल्लागार सेवा (Paid Consultancy) देणारे ज्ञानकेंद्र व्हावे यासाठी काही प्रयत्न सुरु आहेत का?

**उत्तर–** कन्सल्टन्सी हा उत्पन्नाचा हा मोठा मार्ग आहे. आयआयटी सारख्या मोठ्या संस्थामध्ये काही शिक्षकांना वर्षाकाठी करोडो रुपये मिळतात.त्यातील ठराविक टक्के संस्थेला आणि शिक्षकाला असा फॉर्मुला ठरलेला असतो. मात्र आपल्याकडे 'संवादाचा अभाव' आहे. उद्योगांना वाटते की विद्यापीठे फक्त थिअरी शिकवतात. तर विद्यापीठांना वाटते की उद्योगांना फक्त नफा हवाय. हे अंतर कमी व्हायला हवे. ९५% शिक्षकांकडे कन्सल्टन्सी नाही, ही चिंतेची बाब आहे. शिक्षक जेव्हा उद्योगांच्या समस्या सोडवतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने कन्सल्टन्सी संस्कृती रुजेल. आमच्याकडे अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा आहे, डायग्नोस्टिक प्रयोगशाळा आहे त्यातून उत्पन्न मिळते पण ते पुरेसे नाही.

**प्रश्न –** उद्योग–विद्यापीठ संबंध इतके कमकुवत का?

**उत्तर–** आपण व्यवस्थापन, इंजिनीअरिंग, फार्मसी आदीवर भर दिला; इतर विषय दुर्लक्षित राहिले. उद्योगांना उपयुक्त संशोधन कमी झाले. आता इनक्युबेशन सेंटर, स्टार्टअप, पेटंट यावर भर दिला जातोय.

**प्रश्न –**शाश्वत आर्थिक आराखडा तयार करतांना देणग्या की संस्थात्मक सहयोग? काय महत्त्वाचे वाटते?

**उत्तर –** देणग्या घेतल्या की देणारा आणि घेणारा दोघेही विसरतात, पण संस्थात्मक सहयोग (कॉलेब्रेशन) मुळे केवळ निधीच नाही तर फॅकल्टी डेव्हलपमेंट, विद्यार्थ्यांचे आदान–प्रदान, शिकाऊ प्रशिक्षण आणि उद्योगातील लोकांच्या क्लासरूम भेटी यासारखे उपक्रम राबवता येतात. हे अधिक महत्त्वाचे आहे.

**प्रश्न–** अमरावती विद्यापीठ हे ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्राचे प्रतिनिधित्व करते.भौगोलिक आव्हानामुळे विद्यापीठाच्या आर्थिक नियोजनात कोणती अदृश्य आव्हाने उभी राहतात?

**उत्तर–** विद्यापीठाच्या उत्पनवाढीबाबत मोठी आव्हाने जाणवतात. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पाच पैकी चार जिल्हे आदिवासी मागास बहुल असल्यामुळे शुल्कवाढीवर मोठया मर्यादा आहेत. दहा रुपये वाढवले तरी मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया येतात. या भागात उद्योग मोठ्या प्रमाणात नाहीत. आम्ही प्रयत्न करतोय.

**प्रश्न –** निधी वाटपात प्रादेशिक विषमता जाणवते का?मागास भागातील विद्यापीठांना समान निकष न्यायपूर्ण वाटतात का?

**उत्तर –** निधी वाटपात विषमता जाणवत नाही, पण पाच जिल्ह्यातील चार जिल्हे (अकोला वगळता) शासनाने फोकस डिस्ट्रिक्ट म्हणून जाहीर केले आहेत, त्यामुळे जे अनुदान दिले जाते त्यापेक्षा अधिक देणे गरजेचे आहे. सहा महिन्यांपूर्वी पाच विद्यापीठांत आदिवासी अध्ययन केंद्र मान्य झाले, आणि त्यासाठी चार ते पाच कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रश्न –** खासगी भागीदारी (PPP मॉडेल) सार्वजनिक विद्यापीठासाठी संजीवनी आहे की दीर्घकालीन स्वायत्ततेसाठीअसलेला सापळा?

**उत्तर–**विद्यापीठ कायद्याच्या चौकटीत बसून स्वायत्ततेला धक्का न लावता पीपीपी मॉडेल राबवले तर धोका नाही. बारामतीला एआय केंद्र उभारणीसाठी अदानी समूहाने आर्थिक मदत केली तसे प्रयोग विद्यापीठाना करता येतील,त्यात वावगे काही नाही. अमरावतीत सायन्स सेंटरसाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवला आहे. पाच एकर जमीन विद्यापीठ देईल, सरकार निधी देईल. यात आम्ही हे मॉडेल राबवले तर स्वायत्तता धोक्यात येणार नाही.आर्थिक फायदाच होईल.

**प्रश्न–** विद्यापीठे आता हळूहळु शैक्षणिक संस्था न राहता केवळ सेवा पुरवठादार(service roviders) होत चालली आहेत या टिकेकडे आपण कसे पाहता

**उत्तर–** अशी टीका योग्य वाटत नाही कारण आजही राज्य विद्यापीठे दमदारपणे कामे करीत आहेत. या विद्यापीठातील गुरु–शिष्य हा अनुबंध अजून टिकून आहे. वर्गापलीकडे जाऊन शिक्षक हे मेण्टर म्हणून काम करतात. आवश्यक तिथे आर्थिक–वैद्यकीय मदत करतात.

**प्रश्न –** NEP मुळे आर्थिक भार वाढला की संसाधन वापराचे नवे मार्ग खुले झाले?

**उत्तर –** या धोरणामुळे अजून तरी आर्थिक भार वाढलेला नाही, पण संसाधनांच्या वापराचे नवे मार्ग खुले झाले आहेत. सर्व भागधारकांना मानसिकता बदलावी लागेल.

**प्रश्न–** 'मल्टिडिसिप्लिनरी' रचना आणि नवनवीन अभ्यासक्रम यासाठी लागणारा निधी सरकार देणार की विद्यार्थ्यांच्या शुल्कातून उभा करावा लागणार?

**उत्तर–** या धोरणात सुरु झालेल्या अभ्यासक्रमासाठी शासन शिष्यवृत्ती देते. याशिवाय सीएसआर फंड हा देखील पर्याय आहे. काही उद्योग समूह शिक्षकांचे मानधन द्यायला तयार आहेत, तसे शोधून हे प्रयोग यशस्वी राबवता येतात.

**प्रश्न –** स्वायत्त महाविद्यालय वाढल्याने संलग्नता शुल्क घटेल. या आर्थिक फटक्याची काय पूर्वतयारी?

**उत्तर –** हे आर्थिक संकट टाळण्यासाठी नवीन पर्याय शोधावे लागतील. उदा.आम्ही मल्टिपर्पज कॉम्प्लेक्स करतोय, ज्यात कला, क्रीडा, शैक्षणिक उपक्रम एकाच ठिकाणी होतील.त्याचे पुढे आउटसोर्सिंग करून चाळीस–पन्नास लाख उत्पन्न अपेक्षित आहे. सर्व शुल्काचा तीन वर्षांनी आढावा घेऊन वाढवणे गरजेचे वाटते अन्यथा संपण्याची भीती आहे.

**प्रश्न –** ॲल्युमनी फंड पाश्चात्य देशांत मोठा मिळतो.भारतीय मानसिकतेत 'आपल्या विद्यापीठालाआर्थिक मदत करणे ही संस्कृती का रुजली नाही?

**उत्तर–** आपल्याकडे 'गुरु–शिष्य' परंपरेत व्यवहार कधी आलाच नाही. शिक्षकाला डिपार्टमेंटसाठी पैसे मागावे वाटले नाही, विद्यार्थ्याला द्यावे वाटले नाही. आता लक्षात येत आहे, आणि टिकायचे तर ही संस्कृती रुजवावी लागेल. अजून मोठा कालावधी लागेल. अमरावती विद्यापीठात ४२ वर्षांत पहिल्यांदा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच घेतला, आणि उत्तम प्रतिसाद मिळाला. अनेक मदतीला तयार आहेत.

**प्रश्न–**CSR फंड मिळवण्यात सार्वजनिक विद्यापीठे मागे का?

**उत्तर –** खूपदा विद्यापीठे पुढाकार घेत नाहीत, उद्योग समूह देखील राज्य विद्यापीठे म्हणून उदासीन असतात. पाठपुरावा कमी होतो. कुलगुरूंची यात भूमिका महत्त्वाची आहे.अधिकाऱ्यांकडून पाठपुरावा करुन घ्यायला हवा. सातत्याने ई–मेल, फोनद्वारे संवाद साधावा लागतो.काही भागात उद्योग कमी, त्यामुळे फंड अत्यल्प. ग्रामीण भागातील विद्यापीठाना पुणे–मुंबई येथे फोन अथवा मेल द्वारे संपर्क करावा लागतो प्रत्यक्ष जाणे वारंवार शक्य होत नाही.

**प्रश्न –** स्टार्टअप्समध्ये इक्विटी किंवा इनक्युबेशनद्वारे उत्पन्न मिळवण्याचा मार्ग किती यशस्वी वाटतो ?

उत्तर– हा उत्पन्न मिळवण्याचा शंभर टक्के विश्वासार्ह मार्ग आहे, आणि तो सर्वांच्या हिताचा आहे. आमच्याकडे रिसर्च फाउंडेशन आहे, ज्यात इक्विटी घेतली आहे. स्टार्टअप्सना बीज भांडवल दिले जाते, आणि सध्या ४५ स्टार्टअप्स सुरू झाले आहेत.

**प्रश्न–** सार्वजनिक विद्यापीठांसाठी 'टिकाऊ आर्थिक मॉडेल'चे तीन स्तंभ कोणते?

**उत्तर–**

पहिला –काटकसरीचे धोरण.

दुसरा – गरजेवर आधारित खरेदी.

तिसरा – शाश्वत आर्थिक स्त्रोत

व्यक्ती बदलल्या तरी हे मॉडेल टिकले पाहिजे. मी स्वतः गरजेवर आधारित खरेदीसाठी दोन समित्या केल्या.प्रत्येक विभागाकडून डाटा गोळा केला.अनावश्यक खरेदीला कात्री लावली. संस्था हितासाठी कटुता घ्यावी लागते.

**प्रश्न–** कुलगुरू म्हणून आपला असा कोणता 'ड्रीम प्रोजेक्ट' आहे जो केवळ निधीअभावी रखडला आहे?

उत्तर– 'सिंथेटिक ट्रॅक'. हा निधी अभावी राहिलेला ड्रीम प्रोजेक्ट आहे. सात ते दहा कोटी खर्च अपेक्षित. अमरावती खेळाचे माहेरघर आहे,विद्यापीठाच्या मैदानावर मातीचा ट्रॅक आहे. राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सिंथेटिक ट्रॅक असतो. त्या ट्रॅकवरील सरावाअभावी आपले खेळाडू मागे पडतात म्हणून हा ट्रॅक करायचा आहे.

**प्रश्न–** विद्यापीठांचे आर्थिक भविष्य आशादायक वाटते की अस्थिर?

उत्तर– योग्य नियोजन, खर्चावर नियंत्रण, प्राधान्यक्रम ठरवणे या अटींवर मला भविष्य आशादायक वाटते. विद्यापीठांकडे किमान २००–३०० कोटींचे फिक्स डिपॉझिट असायला हवे. ज्यामुळे अकस्मात खर्चासाठी प्लॅन बी असेल.

**प्रश्न–** विद्यार्थ्यांवर भार न टाकता राज्य विद्यापीठांच्या उत्पन्नाचा तिसरा मध्यम मार्ग कोणता असू शकतो?

**उत्तर–१)** सीएसआर फंड **२)** विद्यापीठाच्या इन्फ्रास्ट्रक्चरचे आऊटसोर्सिंग करणे **३)** विद्यापीठाकडे असलेल्या भरपूर जागेतून उत्पन्नप्राप्तीचे मार्ग शोधणे हे तीन मार्ग दिसतात. पारंपरिक मानसिकता बाजूला ठेऊन आणि विद्यापीठाना हे शोभेल का याची लाज न बाळगता हा विचार करणे

## विद्यापीठात सॉफ्ट स्किल विकास कार्यशाळा संपन्न
## केमिकल टेक्नॉलॉजी व विद्यार्थी विकास विभागाचा उपक्रम



आजच्या स्पर्धात्मक युगात सॉफ्ट स्किलचे महत्त्व ओळखून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील केमिकल टेक्नॉलॉजी विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने चार दिवसीय सॉफ्ट स्किल विकास कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. कार्यशाळेत संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, संघटन कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, निर्णय क्षमता आणि आत्मविश्वास वाढविणे यांसारख्या महत्त्वाच्या सॉफ्ट स्किल्सवर विशेष मार्गदर्शन दिल्या गेले.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, प्रमुख अतिथी म्हणून सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील ट्रेनिंग व प्लेसमेंट आफिसर डॉ. पवन देशमुख, कार्यशाळेचे संयोजक डॉ. पी. बी. शिंगवेकर उपस्थित होते.

डॉ. पवन देशमुख यांनी विद्यार्थी विकास विभागाच्या विविध उपक्रमाची माहिती देऊन व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्व विषद केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. अनिल नाईक यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कौशल्य विकासावर कसा भर दिला जात आहे, याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. जवंजाळ, डॉ. कोकाटे, राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती, सुशीला सूर्यवंशी मनेजमेंट, अमरावतीचे डॉ. अमोल करमरकर या अनुभवी तज्ज्ञांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत आहे. प्रस्ताविकातून डॉ. प्रशांत शिंगवेकर यांनी कार्यशाळेमागील भूमिका स्पष्ट केली. संचालन कु. भारती हिने केले. कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात असून कार्यशाळेला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



# विद्यापीठात ‘फिट इंडिया - संडेज ऑन सायकल’ अभियानांतर्गत झुंबा व योग कार्यक्रम उत्साहात साजरा



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने ‘फिट इंडिया – संडेज ऑन सायकल’ अभियानांतर्गत झुंबा व योग कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नागरिक तसेच विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक सुदृढता, जागरुकता निर्माण व्हावी, नियमित व्यायामाची सवय लागावी, या उद्देशाने सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध विभागांतील विद्यार्थी तसेच मॉर्निंग वॉकर्स मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सहभागी विद्यार्थी व मॉर्निंग वॉकला आलेल्या नागरिकांनी उपक्रमाचे कौतुक करीत अशा आरोग्यवर्धक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमात विभागातील विद्यार्थी संदीप गावंडे, अनुष्का भालमे, मनिता गुरूंग यांनी उपस्थितांना प्रात्यक्षिक दिले. शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांच्या मार्गदर्शनात सदर कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, कु. सविता बावनथडे, डॉ. निलेश इंगोले, डॉ. सौरभ त्रिपाठी, गजानन उंबरकर तसेच विद्यार्थी उपस्थित होते.





क्रीडा विशेष



# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेचा पहिला दिवस खेळाडूंनी गाजविला

श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे झालेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत पहिल्या दिवशी विविध संघांच्या खेळाडूंनी मैदान गाजविले. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या मुख्य क्रीडांगणासोबतच मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय आणि डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अशा पाच ठिकाणच्या क्रीडांगणावर सॉफ्टबॉल स्पर्धेचे सामने झालेत.

पहिल्या दिवशीच्या स्पर्धेत कर्नाटक विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, भोपाळ विद्यापीठ, बिकानेर विद्यापीठ, सौराष्ट्र विद्यापीठ, एम.डी.यू. विद्यापीठ रोहतक, चरणसिंह मेरठ विद्यापीठ, दुर्ग विद्यापीठ, तंतिया विद्यापीठ, राजस्थान, मुंबई विद्यापीठ, कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, एसके अनंतपुरम विद्यापीठ, राजस्थान विद्यापीठ, जयपूर, मणिपूर विद्यापीठ, एलपीयू विद्यापीठ, बास्टर विद्यापीठ, एमडीएसयू अजमेर विद्यापीठ, डॉ. एपीजे कलाम विद्यापीठ, गुरू जम्भेश्वर विद्यापीठ, मुरादाबाद, अण्णा विद्यापीठ, रायपूर विद्यापीठ, संजिवनी विद्यापीठ, राजा महेंद्र प्रतापसिंह अलिगढ विद्यापीठ, हेमचंद्राचार्य उत्तर गुजरात पाटण विद्यापीठ, गोंडवाणा विद्यापीठ, गडचिरोली, गुरुकुल कंगारी विद्यापीठ हरिद्वार, मैसूर विद्यापीठ, कर्नाटक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या

सॉफ्टबॉल स्पर्धेतील क्षणचित्रे










# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी रंगले चुरशीचे सामने

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे झालेल्या'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत तिसरा दिवस अतिशय चुरशीचा ठरला. विविध विद्यापीठाच्या संघांनी मैदानात जोरदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. सकाळी अण्णा विद्यापीठ विरुध्द गुरुकुल कांगरी विद्यापीठ, हरिव्दार यांच्यात झालेल्या लढतीत गुरुकुल कांगरी विद्यापीठ संघ विजयी झाला, दुस–या लढतीत भारतीयार विद्यापीठ संघ एकतर्फी विजयी ठरला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुध्द जय नारायण व्यास विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत नागपूर विद्यापीठ संघ विजयी झाला. माधव विद्यापीठ, पिंडवाडा, राजस्थान विरुध्द गोंडवाणा विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत माधव विद्यापीठ संघ विजयी झाला.

दुपारच्या सत्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक विरुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ संघ विजयी ठरला. राजस्थान विद्यापीठ, जोधपूर विरुध्द भोपाळ विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात राजस्थान विद्यीपीठ संघ विजयी ठरला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुध्द पीटीआरएस विद्यापीठ, रायपूर यांच्यात झालेल्या सामन्यात पुणे विद्यापीठ संघ विजयी झाला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव विरुध्द पीडीयूएस सिकर यांच्यातील सामना जळगांव विद्यापीठ संघाने जिंकला. रायपूर विद्यापीठ विरुध्द भोपाळ विद्यापीठातील सामना रायपूर विद्यापीठाने जिंकला. मणिपूर विद्यापीठ विरुध्द संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर यांच्यातील सामना संजीवनी विद्यापीठ संघाने जिंकला.

दि. २ फेब्रुवारी रोजी झालेल्या सामन्यांमध्ये जळगांव विद्यापीठ, इंदौर विद्यापीठ, राजस्थान विद्यापीठ, जयपूर, भोपाळ विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, एल.पी.यू. विद्यापीठ, एसएमके विद्यापीठ, बास्टर, संजिवनी विद्यापीठ, अहमदनगर, रायपूर विद्यापीठ, एचवायव्ही दुर्ग विद्यापीठ, एमडीएस अजमेर विद्यापीठ, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, आरजेकेयूटी विद्यापीठ, माधव विद्यापीठ आणि बीयूसी विद्यापीठ हे विद्यापीठांच्या संघांनी आपापल्या

सॉफ्टबॉल स्पर्धेतील क्षणचित्रे















# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या चवथ्या दिवशी रंगले अटीतटीचे सामने



सॉफ्टबॉल सामन्याचे दृश्य

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे झालेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या चवथ्या दिवशी अटीतटीचे सामने रंगले. विविध विद्यापीठाच्या संघांनी मैदानात जोरदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली.

गुरूकुल कांग्री विद्यापीठ, हरिद्वार विरुद्ध संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात गुरुकुल विद्यापीठाने बाजी मारली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुद्ध माधव विद्यापीठ, राजस्थान यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात माधव विद्यापीठ, राजस्थान ने सामना जिंकला. एल.पी.यु. विद्यापीठ विरुद्ध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात एल.पी.यु. विद्यापीठाने बाजी मारली. जयपूर विद्यापीठ विरुद्ध कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात जळगांव विद्यापीठाने सामना जिंकला.



# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अव्वल

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी खेळाडूंना दिल्या शुभेच्छा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित 'अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने प्रथम क्रमांक मिळिवला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला सुवर्ण पदक, माधव विद्यापीठ, पिंडवारा, राजस्थानने रजत पदक, कालिकत विद्यापीठाने कांस्य पदक व महाराजा सुरजामल ब्रिज विद्यापीठ, भरतपूरने ब्रांझ पदक पटकाविले. यावेळी ट्रॉफी व पदके देवून चमूंना सन्मानित करण्यात आले. पुरुष स्पर्धेचा समारोपीय समारंभ उत्साहात पार पडला. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सहभागी खेळाडूंचे कौतूक करत त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, संस्थेचे कोषाध्यक्ष श्री दिलीपबाबू इंगोले, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, उपाध्यक्ष श्री केशवराव मेतकर, सचिव डॉ. व्ही.जी. ठाकरे, महाराष्ट्र सॉफ्ट बॉल असोसिएशनचे सहसचिव सुरजसिंह येवतीकर, प्राचार्य डॉ. जी.व्ही. कोरपे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, डॉ. रुपाली इंगोले आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला मोठ्या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाची दीर्घ परंपरा लाभली आहे. संपूर्ण भारतात अमरावती विद्यापीठाची ओळख एक जबाबदार आणि शिस्तबध्द यजमान म्हणून आहे. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते. सर्व सामने पारदर्शकपणे पार पडल्याबद्दल त्यांनी सर्व आयोजक आणि पंच समितीचे विशेष आभार मानले. येणा–या जागतिक सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करताना या स्पर्धेतील पहिल्या चार क्रमांकावर राहिलेल्या संघांमधील गुणवान खेळाडूंचा प्राधान्याने विचार करावा. भविष्यात जागतिक स्तरावरील निवड चाचणी स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी अमरावती विद्यापीठ सदैव सज्ज असेल, असेही कुलगुरू म्हणाले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. दिलीपबाबू इंगोले यांनी स्पर्धेत सहभागी खेळाडूंचे भरभरून कौतुक केले. श्री शिवाजी शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील दुस–या क्रमांकाची सर्वात मोठी संस्था असून विदर्भातील दहा जिल्ह्यांमध्ये ३४० हून अधिक महाविद्यालयांच्या माध्यमातून ही संस्था कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेचे नियोजन अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने पार पाडल्याबद्दल समाधान व्यक्त करुन कालिकत विद्यापीठाचा उल्लेख करीत आपण पहिली आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा कालिकत येथे खेळल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. केवळ जिंकणे महत्त्वाचे नसून आपला सर्वोत्तम खेळ प्रदर्शित करुन निवड समितीचे लक्ष वेधून घेणारा असावा, असा मोलाचा सल्ला त्यांनी खेळाडूंना दिला. खेळात जयपराजय होतच असतो, परंतु आपला खेळ सर्वांच्या स्मरणात राहील व देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल असा असला पाहिजे, असेही ते

यावेळी भरतपूर संघाचे कोच अभिषेक व कालिकत विद्यापीठाचे मोहम्मद अली यांनी मनोगत व्यक्त करतांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने राहण्याची व प्रवासाची उत्तम सोय केल्याचे सांगितले. सर्व अम्पायरने सर्व सामन्यांचे अचूक परिक्षण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व जजेसचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट टिचर पुरस्कार श्री जगदीश (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ कॅचर रोहित सहारे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ बेसमॅन सोनू गुजर (भरतपूर), श्री लेखराज व श्री राजपुत (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ शॉटअप जितेंद्र (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ राईट फिल्डर श्री अभिषेक (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ सेंटर फिल्डर रोहन पोटे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ लेफ्ट फिल्डर श्री जयपाल (भरतपूर विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ ऑलराऊंडर कॅप्टन ऋतिक पुडवे (अमरावती विद्यापीठ) यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

विद्यापीठ गीताने समारोप समारंभाची सुरूवात झाली. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. रुपाली इंगोले यांनी स्पर्धेचा अहवाल मांडला. संचालन डॉ. दिनेश खेडकर व डॉ. रेखा मग्गीरवार यांनी, तर आभार क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मानले. स्पर्धेच्या आयोजनाकरिता श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील सर्व शिक्षक डॉ. कविता वाटाणे, सर्व शारीरिक शिक्षक तसेच विद्यापीठ शारीरिक शिक्षक विभागातील संतोष वानखडे, अरुण लोहे, अब्दुल तौसिफ आदिंनी परिश्रम घेतले. समारोप कार्यक्रमाला स्पर्धेचे मुख्य परिक्षक श्री मुकुंद देशपांडे, महाविद्यालयातील शिक्षक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बुध्दीबळ (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

महात्मा ज्योतिराव फुले विद्यापीठ, जयपूर येथे २३ ते २७ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बुध्दीबळ (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी अ‍ॅन्ड रिसर्च, बडनेराची कु. तन्वी कानतुटे, एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवची कु. साक्षी भोजने व कु. समृध्दी देशमुख, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. अंजली पवार, प्रो. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अ‍ॅन्ड रिसर्च, बडनेराची कु. भार्गवी कुलकर्णी व कु. अयुती पेंढारी, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची कु. दिव्या ग्रेसपुंजे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीची कु. कृष्णा भुयार व कु. सनिका मोरे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे ११ ते २० फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



## अ.भा. आंतर विद्यापीठ शरीर सौष्ठव (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

आंध्रा युनिर्व्हसिटी, विषाखापट्टणम येथे ०३ ते ०४ मार्च, २०२६ दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ शरीर सौष्ठ्व (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये सिताबाई कला व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा निखिल उके व वेदांत ठाकरे, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोलाचा हर्ष कनोजिया, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळीचा रेवित शिरसाट, नथमल गोयनका विधी महाविद्यालय, अकोलाचा क्रिष्णा बागेरे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा बिशाल कामी आणि प्रो. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अ‍ॅन्ड रिसर्च, बडनेराचा यश सरनिक याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या क्रीडा संकुल येथे १९ ते २८ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्ग संपन्न झाला.

# पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाद्वारे आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाद्वारे आंतर विभागीय क्रिकेट टूर्नामेंटचे यशस्वी आयोजन विद्यापीठ क्रिकेट मैदानावर करण्यात आले. एम.पी.एड्. विद्यार्थ्यांच्या वतीने नुकतीच ही स्पर्धा पार पडली.

पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या अभ्यासक्रमांतर्गत 'मॅनेजमेंट' या विषयामध्ये 'मॅनेजमेंट ऑर्गनायझेशन' हा घटक आहे. या विषयाच्या प्रात्यक्षिक अनुभवासाठी विद्यापीठ स्तरावर शैक्षणिक विभागीय क्रिकेट टूर्नामेंटचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये शैक्षणिक विभागातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक अशा एकूण १३ संघांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. स्पर्धेचा अंतिम सामना 'नॉन-टीचिंग' संघ आणि 'पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग' यांच्यात झाला. यामध्ये पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाने विजय मिळवत विजेतेपद पटकावले.

**वैयक्तिक पारितोषिके :**

बेस्ट फलंदाज: आशु ठाकूर (नॉन-टीचिंग संघ)

बेस्ट गोलंदाज व मॅन ऑफ द सिरीज: आरीफ भट (पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग)

**समारोप व मार्गदर्शन:** कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून विभाग प्रमुख डॉ. तनुजा राऊत उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयीन जीवनातील मेहनतीचे महत्त्व सांगतानाच, ही मेहनत भावी आयुष्यात कशी उपयोगी येते, याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, शारीरिक हालचालींचे महत्त्व पटवून देत खेळाडूंना प्रोत्साहित केले. यांनी 'खेळासाठी वय हा फक्त एक आकडा आहे,' असे म्हणत सर्वांना खेळामध्ये सहभागी होत राहण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे लाभल्या होत्या. तसेच भौतिकशास्त्र विभाग प्रमुख व आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. संदीप वाघुळे यांची विशेष उपस्थिती होती.

नियोजन व आभार: कार्यक्रमाची सांगता दोन खेळाडूंनी व्यक्त केलेल्या मनोगताने झाली. प्रांजल ढोके यांनी स्पर्धेचा संपूर्ण अहवाल सादर केला. सूत्रसंचालन रुपेंदर ढकाल आणि मीनल बोडखे यांनी केले. स्पर्धेसाठी पंच म्हणून हर्ष रायना, मीनल बोडखे, निखिल डोंगरे, राहुल राई, अजय कुमार आणि अनिता राय यांनी काम पाहिले. याप्रसंगी डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, कु. सविता बावनथडे, डॉ. निलेश इंगोले, डॉ. सौरभ त्रिपाठी आणि विभागातील सर्व शिक्षकगण व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शीतल देवी



## अ.भा. आंतर विद्यापीठ बॉक्सिंग (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

कुरूक्षेत्र विद्यापीठ, कुरूक्षेत्र येथे ०२ ते ०७ मार्च, २०२६ दरम्यान होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजाचा शिवाजी गेडाम, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीरचा वैभव जरवाल व निळकंठ पुजारी, बी.एस. पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय, पिंपळगांव काळेचा रेहान शाह, श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय, बोरगांव मंजूचा विशाल नुपे, माणिककुमार सिंह व शंतनु खाबळे, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोलाचा प्रज्वल भोयर, गुलाम नबी आझाद महाविद्यालय, बार्शी टाकळीचा क्रिष्णा लोखंडे आणि सरस्वती महाविद्यालय, शेगांवचा पियुष पाटील याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला येथे १८ ते २७ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक



## अ.भा. आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

मंगलोर युनिर्व्हसिटी, मंगलगंगोत्री (कर्नाटक) येथे २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्रीमती एस.आर. मोहता महिला महाविद्यालय, खामगांवची कु. प्रणाली शेगोकार, बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराची कु. वैष्णवी वानखडे व कु. समीक्षा आमझरे, बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडाची कु. स्वाती पळसकर, कु. पायल नागे व कु. वैदेही सिडाम, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. मेबरिशा लिंगडोह, बी.एस. पटेल महाविद्यालय, पिंपळगांव काळेची कु. दिव्या जाधव आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची कु. तनिषा सवई हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे १५ ते २४ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेत दुस-या दिवशी थरार

श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे झालेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) स्पर्धेत दुस-या दिवशी विविध संघांच्या खेळाडूंनी मैदान गाजविले. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या मुख्य क्रीडांगणासोबतच मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय आणि डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अशा पाच ठिकाणच्या क्रीडांगणावर सॉफ्टबॉल स्पर्धेचे सामने झालेत.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेला' उत्साहात सुरुवात झाली. ९८ विद्यापीठाचे देशभरातील महिला संघ या सामनांकरीता अमरावतीत आले .दुसऱ्या दिवशी झालेल्या सामन्यांमध्ये नांदेड विद्यापीठ विरुध्द बंगलोर विद्यापीठ सामन्यामध्ये नांदेड विद्यापीठाने १४–० ने सामना जिंकला. दुर्ग विद्यापीठ विरुध्द जेएनटीयू विद्यापीठ हैद्राबाद यांच्यातील सामना दुर्ग विद्यापीठाने ५–१ ने जिंकला. एमजीयू नालगोंडा विद्यापीठ विरुध्द पतियाला विद्यापीठ यांच्यातील सामना नालगोंडा विद्यापीठाने ७–० ने जिंकला. बीएयू विद्यापीठ संभाजीनगर विद्यापीठ विरुध्द रोहिलखंड विद्यापीठ, बरेली यांच्यातील सामना संभाजीनगर विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. नागपूर विद्यापीठ विरुध्द जीवाजी विद्यापीठ, ग्वालियर यांच्यातील सामना नागपूर विद्यापीठाने १६–३ ने जिंकला. सौराष्ट्र विद्यापीठ, गुजरात विरुध्द एमडीएस विद्यापीठ, अजमेर यांच्यातील सामना एमडीएसयू ने ११–० ने जिंकला. भोपाळ विद्यापीठ विरुध्द मुंबई विद्यापीठ यांच्यातील सामना भोपाळ विद्यापीठाने ७–० ने जिंकला. संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर विरुध्द जुनागढ विद्यापीठातील सामना संजीवनी विद्यापीठाने १२–२ ने जिंकला. उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद विरुध्द महात्मा गांधी विद्यापीठ, कोट्टम यांच्यातील सामना उस्मानिया विद्यापीठाने ६–५ ने जिंकला. बीआरएयू, आग्रा विद्यापीठ विरुध्द माधव विद्यापीठ, राजस्थान यांच्यातील सामना बीआरयू ने १६–६ ने जिंकला. आंध्रा विद्यापीठ विरुध्द बिलासपूर विद्यापीठातील सामना आंध्रा विद्यापीठाने १५–० ने जिंकला. लखनौ विद्यापीठ विरुध्द उदयपूर विद्यापीठातील सामना लखनौ विद्यापीठाने १०–० ने जिंकला. केबीसीएनएमयू जळगांव विरुध्द कन्नौर विद्यापीठ यांच्यातील सामना जळगाव विद्यापीठाने ११–० ने जिंकला. अमरावती विद्यापीठ विरुध्द व्हीएस विद्यापीठ, नेल्लोर यांच्यातील सामना अमरावती विद्यापीठाने ७–० ने जिंकला. कोटी विद्यापीठाने एकतर्फी विजय मिळिवला. जीएनडीयू विद्यापीठ विरुध्द बीसीयू विद्यापीठातील सामना जीएनडी विद्यापीठाने १०–० ने जिंकला. कुएमपू कर्नाटक विद्यापीठ विरुध्द पॅसेफिक विद्यापीठ, उदयपूर यांच्यातील सामना कर्नाटक विद्यापीठाने ८–६ ने जिंकला. पंजाब विद्यापीठ विरुध्द बीबीसी विद्यापीठातील सामना पंजाब विद्यापीठाने १०–० ने जिंकला. संभाजीनगर विद्यापीठ विरुध्द पंजाब विद्यापीठ, चंदीगड यांच्यातील सामना पंजाब विद्यापीठाने १०–० ने जिंकला. दिल्ली विद्यापीठ विरुध्द मुंबई विद्यापीठातील सामना दिल्ली विद्यापीठाने १०–० ने जिंकला. केरला विद्यापीठ विरुध्द उस्मानिया विद्यापीठातील सामना केरला विद्यापीठाने ४–१ ने जिंकला. एसपीपी विद्यापीठ, पुणे विरुध्द मंगलगंगोत्री विद्यापीठातील सामना पुणे विद्यापीठाने ११–० ने जिंकला. कालिकत विद्यापीठ विरुध्द डीएव्हीव्ही विद्यापीठ, इंदौर विद्यापीठातील सामना कालिकत विद्यापीठाने जिंकला. दुर्ग विद्यापीठ विरुध्द व्हीसीआयडब्ल्यूयू कोटी विद्यापीठातील सामना दुर्ग विद्यापीठाने ७–१ ने जिंकला. नागपूर विद्यापीठ विरुध्द एसआरटीएम विद्यापीठ, नांदेड यांच्यातील सामना नांदेड विद्यापीठाने ८–२ ने जिंकला. अजमेर विद्यापीठ विरुध्द सिकर विद्यापीठ यांच्यातील सामना

## महिला सॉफ्टबॉल स्पर्धेतील क्षणचित्रे





# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धा तिसऱ्या दिवशी अटीतटीच्या सामन्यात विजयी संघाची सलामी


संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्ट बॉल महिला स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी दमदार कामगिरी करून विजयी संघाने विजय मिळवला. त्यामध्ये झालेल्या सामन्यात संजीवनी विद्यापीठ कोपरगाव विरुद्ध एच. एन. जी. विद्यापीठ पाटण यांच्यात झालेला सामना सहजपणे पाटण विद्यापीठाने जिंकला. आग्रा विद्यापीठ वर्सेस कानपूर विद्यापीठ यामधील झालेला सामना आग्रा विद्यापीठाने मोठ्या फरकाने जिंकला. कालिकात विद्यापीठ विरुद्ध गोंडवाना विद्यापीठ यांच्यातील सामना कालिकतने एकतर्फी जिंकला. आंध्र विद्यापीठ विरुद्ध बरकतुल्ला विद्यापीठ भोपाळ यांच्यात झालेला सामना बरकतुल्ला विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. एम. एल. एस. यु. उदयपूर विरुद्ध व्ही. टी. यु. विद्यापीठ कर्नाटक यांच्यातील सुद्धा सामना उदयपूरने एकतर्फी जिंकला. एम.डी.एस. यू. अजमेर विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेला सामना अजमेर संघाने जिंकला.

भारती विद्यापीठ, पुणे विरुद्ध कुवेम्पु विद्यापीठ कर्नाटक यांच्यात झालेला अटीतटीचा सामना कर्नाटकने जिंकला. कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विरुद्ध दिल्ली विद्यापीठ यांच्यात झालेला सामना जळगावने एकतर्फी जिंकला. एच. वाय. व्ही. दुर्ग विद्यापीठ विरुद्ध केरळ विद्यापीठ यांच्यातील सामना दुर्ग विद्यापीठ ने जिंकला. जी. एन. डी. यू. अमृतसर विरुद्ध पुणे विद्यापीठातील सामना अमृतसरने जिंकला.

पंजाब विद्यापीठ चंदीगड विरुद्ध एम. जी. यु. नालागोंडा विद्यापीठ यांच्यातील झालेला सामना पंजाब विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. भारती विद्यापीठ पुणे विरुद्ध कोइंबतूर विद्यापीठ शिमोगा विरुद्ध झालेला सामना कोइंबतूर विद्यापीठाने जिंकला.



खेळातील क्षणचित्रे



# बलाढ्य संघातील लढतीने प्रेक्षकांची मने जिंकली

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्ट बॉल महिला स्पर्धेच्या चौथ्या दिवशीही उत्स्फूर्तपणे सामने खेळल्या गेले. चौथ्या दिवशी झालेल्या उपांत्य फेरीतीतील सामन्यांमध्ये महिला संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्याकरिता आपले स्थान निश्चित केले आहे.

यामध्ये चौथ्या दिवशी झालेल्या सामन्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने हेमचंद्र छाया नॉर्थ पाटण गुजरात विद्यापीठावर १० – ० ने मात करून विजय मिळवला आहे. पंजाब विद्यापीठ चंदीगड विरुद्ध एम डी एस यु अजमेर यांच्यात झालेला सामना पंजाब विद्यापीठाने ३–१ ने जिंकला. एम. एल. एस. यु. उदयपूर विरुद्ध कालिकत विद्यापीठ यांच्यातील झालेला सामना कालिकतने एकतर्फी १६ – ० ने जिंकला. तसेच दुर्ग विद्यापीठ विरुद्ध अमृतसर विद्यापीठ यांच्यातील सामना अमृतसरने ४ – १ ने जिंकला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ विरुद्ध शहीद महेंद्र कर्मा विश्वविद्यालय बस्तर यांच्यात पुन्हा सामना झाला आणि त्या सामन्यांमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ४ – १ ने बस्तरवर मात केली. पंजाब विद्यापीठ चंदिगड विरुद्ध एमडीयु रोहतक यांच्यातील सामना अटीतटीचा झाला आणि अखेर पंजाब विद्यापीठाणे ७ – ६ ने जिंकला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विरुद्ध कालिकत विद्यापीठ यांच्यातील सामना कालिकतने २ – १ ने जिंकला. एल पी युनिव्हर्सिटी विरुद्ध अमृतसर विद्यापीठ यांच्यात एकतर्फी झालेला सामना ६ – ० ने एल पी विद्यापीठाने



सामन्यांचे क्षणचित्र



## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बुध्दीबळ (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

हैद्राबाद सिंध नॅशनल कॉलेजीएट युनिर्व्हसिटी, मुंबई येथे ०२ ते ०६ मार्च, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बुध्दीबळ (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावतीचा खुश दोशी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीचा सुह्मद आचार्यकोडुमगुल्ला, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा विश्वेश सयाम, एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवचा प्रतिक तायडे व भावनेश थेलकर, पी.आर. पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीचा आदित्य सदाफळे, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा रोशन कपूर, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीचा वेदांत बक्षी आणि जे.डी. इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळचा वेदांत रागेनवार याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती



## अ.भा. आंतर विद्यापीठ बॉक्सिंग (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

लवली प्रोफेशनल युनिर्व्हसिटी, जालंधर (पंजाब) येथे ०९ ते १४ मार्च, २०२६ दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये महात्मा फुले कला व विज्ञान महाविद्यालय, पातुरची कु. रुपाली डोंगरे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. विजेता देव, एस.एस.जी.एम.सी.ई. शेगांवची कु. समिक्षा दाबेराव, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोलाची कु. पलक झांबरे, कु. रितिका बोसे, कु. गायत्री माटे व कु. पुर्वा गावंडे, श्री आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. रेयती उंबरकर, श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय, बोरगांवमंजूची कु. गौरी मुरुमकर व कु. कांचन सुरंशे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला येथे २५ फेब्रुवारी ते ०६ मार्च, २०२६ दरम्यान संपन्न झाला.



## अ.भा. आंतर विद्यापीठ तायक्कांडो (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

दाव युनिव्र्हसिटी, जालंधर येथे १६ ते २० मार्च, २०२६ दरम्यान होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्कांडो (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा दिपेंद्रसिंह बिस्त, समीर सैफी, सुरज कुंटारे व आशुतोष सोळंके, पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीचा महेश जाधव व प्रणव जाधव, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा मनिष चेट्टरी, एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवचा प्रतिक वंदे याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे ०४ ते १३ मार्च, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्ग संपन्न झाला.



## अ.भा. आंतर विद्यापीठ तायक्कांडो (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

फकिर मोहन युनिव्र्हसिटी, व्यासा विहार, बालासोर येथे १६ ते २० मार्च, २०२६ दरम्यान होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्कांडो (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. रोहिणी फाड, कु.साक्षी डहाके, कु. महेक बुंदेले, कु. अनामिका डेका व कु. नम्रता तायडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची कु. नुतन पुंड, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळीची कु. पुनम काशिद आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर तायक्कांडो विभागाची कु. विद्या पुरी हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे ०४ ते १३ मार्च, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्ग संपन्न झाला.

जयंती विशेष

# विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

विज्ञानवादी, सत्य व अहिंसा याची शिकवणूक देणारे बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील कर्मचारी उपस्थित होते. संचालन व संत सेवालाल यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



# विद्यापीठात आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी



मराठी भाषेतील आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



# विद्यापीठात संत गाडगे बाबा जयंती साजरी
# जनरल मनोज पांडे यांच्याहस्ते हारार्पण





संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी माजी भारतीय सेना प्रमुख जनरल मनोज पांडे, कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी मुख्य प्रशासकीय इमारत येथे संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन गाडगे बाबा यांना अभिवादन केले.

विद्यापीठ परिसरात मुख्य प्रवेशव्दारासमोर असलेल्या श्री संत गाडगे बाबांच्या संदेश शिल्पाला कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पुष्पार्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, सर्व अधिष्ठाते, विद्यापीठातील विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.





# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## बेचाळिसवा दीक्षांत समारंभ

### दि.२३ फेब्रुवारी २०२६



पहिली रांग (डावीकडुन) :- डॉ. नितीन ए.कोळी, डॉ.कु. मनिषा एम.कोडापे, डॉ. ए.एम. बोर्डे, डॉ.आर.एम.कडू ,डॉ. हर्षवर्धन पी.देशमुख, प्रमुख अतिथी माजी भारतीय लष्कर प्रमुख मा.जनरल मनोज पांडे , कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. कुलगुरू डॉ. मिलींद ए. बारहाते, मा. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र पी. ढोरे, डॉ. प्रवीण बी. रघुवंशी, डॉ. आर.डी. सिकची , डॉ.व्ही.एच. नागरे, डॉ.व्ही.एम. मेटकर, कुलसचिव डॉ. अविनाश एम. असनारे

दुसरी रांग (डावीकडुन) :- डॉ.व्ही.आर. मानकर, डॉ.वैशाली पी. गुडधे, डॉ. एस.ए.वाघुळे, डॉ. मोना एम. चिमोटे, सीए. पुष्कर देशपांडे, डॉ.एच.आर. देशमुख, डॉ. अरुण हरणे, डॉ. विद्या ए. शर्मा, डॉ. अभय खांबोरकर

विद्यादंडधारक :- श्री उमाशंकर ठाकूर, श्री अब्दुल समीर अब्दुल सलीम

सकाळ

# विद्यापीठात एलईडी लॅम्प फॅब्रिकेशन कार्यशाळा

अमरावती, ता. २ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील उपयोजित परमाणू विद्युत विभागामध्ये ऊर्जा संवर्धन जागृती केंद्रांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एलईडी लॅम्प फॅब्रिकेशन कार्यशाळा नुकतीच पार पडली. अध्यक्षस्थानी डॉ. सुजाता काळे, उद्घाटक म्हणून विद्यापीठ व्य. प. सदस्य तथा पदार्थ विज्ञान प्रमुख डॉ. संदीप वाघुळे, प्रमुख पाहुणे म्हणून टेक्नोसंकल्प प्रा. लि. अमरावतीचे संचालक संदीप पांडे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन प्रयत्न करावेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असावे, प्रकल्प



राबवावे, विविध सर्किट्स तयार करून आपले तांत्रिक कौशल्य वाढवावे, असे आवाहन डॉ. संदीप वाघुळे यांनी केले.

डॉ. सुजाता काळे यांनी कार्यशाळा केवळ एलईडी लॅम्प निर्मितीपुरती मर्यादित नाही, तर त्यामागील आधुनिक तंत्रज्ञान, प्रायोगिक कौशल्य विकास, शाश्वत विकासासोबतच सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. कार्यशाळेत ६५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. संचालन पायल गवई यांनी केले. आभार राजकुमार राठोड यांनी मानले.

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेचा पहिला दिवस खेळाडूंनी गाजविला

प्रतिनिधी/२ फेब्रुवारी

अमरावती : श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत पहिल्या दिवशी विविध संघांच्या खेळाडूंनी मैदान गाजविले. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या मुख्य क्रीडांगणासोबतच मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय आणि डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अशा पाच ठिकाणच्या क्रीडांगणावर सॉफ्टबॉल स्पर्धेचे सामने सुरू आहेत. पहिल्या दिवशीच्या स्पर्धेत कर्नाटक विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, भोपाळ विद्यापीठ, बिकानेर विद्यापीठ, सौराष्ट्र विद्यापीठ, एम.डी.यू. विद्यापीठ रोहतक, चरणसिंह मेरठ विद्यापीठ, दुर्ग विद्यापीठ, तंतिया विद्यापीठ, राजस्थान, मुंबई विद्यापीठ, कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, एसके अनंतपुरम विद्यापीठ, राजस्थान विद्यापीठ, जयपूर, मणिपूर विद्यापीठ, एलपीयू विद्यापीठ, बास्टर विद्यापीठ, एमडीएसयू अजमेर विद्यापीठ, डॉ. एपीजे कलाम विद्यापीठ, गुरू जम्भेश्वर विद्यापीठ, मुरादाबाद, अण्णा विद्यापीठ, रायपूर विद्यापीठ, संजिवनी विद्यापीठ, राजा महेंद्र प्रतापसिंह अलिगढ विद्यापीठ, हेमचंद्राचार्य उत्तर गुजरात पाटण विद्यापीठ, गोंडवाणा विद्यापीठ, गडचिरोली, गुरुकुल कंगारी विद्यापीठ हरिद्वार, मैसूर विद्यापीठ, कर्नाटक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठांच्या संघाने विजय मिळविला.



The Hitavada


# All-India Inter-University Softball Tourney off to action-packed start

**Amravati Bureau**
AMRAVATI, Feb 2

THE All-India Inter-University Men's Softball Tournament, organised by Shri Shivaji Education Society, commenced at Shri Shivaji Science College Ground here with players of various universities participating with much enthusiasm.

Matches are being conducted simultaneously at five different venues including the main playground of Shri Shivaji Science College, Matoshri Vimalabai Deshmukh College, Shri Shivaji College of Physical Education, Shri Shivaji College of Horticulture and Dr Panjabrao Deshmukh Medical College.

On the first day of the tournament, the teams that registered wins include Karnataka University, Shivaji University, Kolhapur, Bhopal University, Bikaner University, Saurashtra University, Maharshi Dayanand University Rohtak, Chaudhary Charan Singh University, Meerut, Durg University, Tantia University Rajasthan, University of Mumbai, Kavi Kulguru Kalidas Sanskrit University, Sri Krishnadevaraya University, Anantapur, University of Rajasthan, Jaipur, Manipur University, Lovely Professional University, Bastar University, Maharshi Dayanand Saraswati University Ajmer, Dr APJ Abdul Kalam University.



Players in action during the match.

(Contd on page 2)

लोकमत

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष,महिला स्पर्धेचे थाटात उद्घाटन

## १०७ विद्यापीठांचा सहभाग; पाच दिवस रंगणार सामने, देशपातळीवर आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमरावती :** श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धा २०२५-२६' चे भव्य उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. सॉफ्टबॉलच्या इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांच्या राष्ट्रीय स्पर्धा एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी आयोजित करून अमरावतीने एक नवा इतिहास रचला आहे.

खेळातून घडते चारित्र्य : पोलिस उपायुक्त गणेश शिंदे

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. 'अमरावती हे प्रदूषणमुक्त आणि सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध शहर असून येथील पोषक वातावरणात ही स्पर्धा होत आहे,' असे ते म्हणाले. खेळ केवळ हार-जित पुरता मर्यादित नसून तो खेळाडूंची मातीशी नाळ जोडून ठेवणारा आणि कठीण परिस्थितीत जिद्दीने उभे राहायला शिकवतो. आजची तरुण पिढी तंत्रज्ञान आणि विज्ञानात प्रगती करत असतानाच खेळाच्या माध्यमातून देशाची जबाबदारी पेलण्यास सक्षम होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रकल्प महेंद्र ढोरे, उद्घाटक म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, अॅड. जयवंत पाटील पुसदेकर, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कढू, डॉ. प्रवीण रघुवंशी, ए.आय.यू.चे निरीक्षक दिलीप तुरकी, स्पर्धेचे मुख्यपरीक्षक मुकुंद देशपांडे, प्राचार्य डॉ. जी. व्ही.कोरपे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. सतीश पहाडे,डॉ. विकास टोणे, डॉ. रूपाली इंगोले उपस्थित होते.



सॉफ्टबॉल स्पर्धेत उद्घाटन करताना श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे हर्षवर्धन देशमुख आदी

### शिवाजी शिक्षण संस्थेचा ऐतिहासिक पुढाकार

संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी उद्घाटनपर भाषणात म्हणाले, सॉफ्टबॉल सारख्या खेळाला राष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी शिक्षण संस्थेने पुढाकार घेतला आहे. संपूर्ण भारतातून आलेल्या खेळाडूंना अमरावतीचे आदरातिथ्य आणि संस्कृतीची ओळख करून दिली जाईल. खेळाडूंनी मैदानावर केवळ कौशल्यच नाही, तर शिस्त आणि खिलाडूवृत्तीचे ही दर्शन घडवावे, असेही ते म्हणाले. या स्पर्धेच्या तांत्रिक जबाबदारीसाठी मुकुंद देशपांडे आणि दिलीप तुरकी यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांची समिती काम पाहत आहे. याप्रसंगी खेळाडूंना खेळाडू वृत्तीने सामने खेळण्याची शपथ घेतली.

# देशाचा सर्वांगीण विकास हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन

पुण्य नगरी / प्रतिनिधी

**अमरावती :** राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना समान नागरिकत्व बहाल केले. राज्यघटनेमध्ये ३५२, ३५६ आणि ३६० या कलमांचा अंतर्भाव करून देश एकसंघ केला. कलम ३५६ देशाची अखंडता कायम ठेवते. राष्ट्राचा विचार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचा सर्वांगीण विकास हा दृष्टिकोन ठेवला, असे प्रतिपादन पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यास केंद्राच्या वतीने लोकनेते खोब्रागडे स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते तर प्रमुख अतिथी म्हणून नोंदणी विभाग, माहितीलेखी कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, डॉ. आंबेडकर अध्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

यावेळी डॉ. अनिल हिरेखण, कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांनीही आपले विचार व्यक्त केले. संत गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, मेणबत्ती प्रज्वलित करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी एकता रॅली समितीच्या वतीने कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. आंबेडकर थीटमध्ये आचार्य पदवी प्राप्त करणाऱ्या वंदना थवणे यांचा कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड, संचालन डॉ. जगदीश गोवर्धन, तर आभार प्रदर्शन डॉ. मनोहर खोडे यांनी केले.

डॉ. विजय खरे यांचे प्रतिपादन

विद्यापीठात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा' विषयावर व्याख्यान

दिव्य मराठी, अमरावती. मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ | २

**क्रीडा** • शहरात आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

# अमरावतीत १०७ विद्यापीठांच्या खेळाडूंचा रणसंग्राम झाला सुरू

प्रतिनिधी | अमरावती

श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष व महिला) स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. सॉफ्टबॉलच्या इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांच्या राष्ट्रीय स्पर्धा एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी आयोजित करून अमरावतीने एक नवा इतिहास रचला आहे.

यावेळी व्यासपीठावर महेंद्र ढोरे, उद्घाटक हर्षवर्धन देशमुख, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, अॅड. जयवंत पुसदेकर, डॉ. रवींद्र कडू, डॉ. प्रवीण रघुवंशी, दिलीप तुरकी, स्पर्धेचे मुख्य परिक्षक मुकुंद देशपांडे, प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, डॉ. तनुजा राऊत, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. सतीश पहाडे, डॉ. विकास टोणे, डॉ. रूपाली इंगोले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आपल्या भाषणात अमरावतीच्या क्रीडा वारसाचा गौरव केला. खेळ हे सर्वांगीण विकासाचे साधन असून त्यातून मिळणारा संयम आणि सांघिक भावना जीवनात महत्त्वाची ठरते.



शहरात आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणारे हे आयोजन देशासाठी अभिमानास्पद आहे. असे त्यांनी सांगितले.

तसेच या स्पर्धेबद्दल माहिती देताना दिलीप इंगोले म्हणाले की, देशभरातील १०७ विद्यापीठांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. ५ तारखेपर्यंत पुरुषांचे सामने रंगणार असून ६ ते १० तारखेदरम्यान महिलांच्या स्पर्धा होतील. विशेष म्हणजे, या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर ऑल इंडिया भारतीय संघासाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे. मैदानावर फ्लड लाईट्सची सोय करण्यात आल्याने रात्रीच्या वेळीही सामने खेळवले जाणार आहेत.

तत्पूर्वी सुरुवातीला क्रीडा ज्योत मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा व शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तिरंगा असलेली फुगे मान्यवरांच्या हस्ते आकाशात सोडण्यात आली.

खेळाडूंना खेळाडू वृत्तीने सामने खेळण्याची शपथ देण्यात आली. स्मृतीचिन्ह व पुष्प देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. तनुजा राऊत यांनी केले.

संचालन डॉ. मनीष गायकवाड व डॉ. हर्षाली वानखेडे यांनी तर आभार डॉ. रूपाली इंगोले यांनी मानले. डॉ. अवंतिका मानकर यांनी प्रेरणादायी गीत सादर केले.

**खेळातून घडते चारित्र्य : पोलिस आयुक्त गणेश शिंदे**

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना पोलिस आयुक्त गणेश शिंदे यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. अमरावती हे प्रदूषणमुक्त आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध शहर असून येथील पोषक वातावरणात ही स्पर्धा होत आहे. आजची तरुण पिढी तंत्रज्ञान आणि विज्ञानात प्रगती करत असतानाच खेळाच्या माध्यमातून देशाची जबाबदारी पेलण्यास सक्षम होत असल्याचेही त्यांनी यावेळी प्रामुख्याने नमूद केले.

**श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा ऐतिहासिक पुढाकार**

संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले की, सॉफ्टबॉल सारख्या खेळाला राष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी शिक्षण संस्थेने पुढाकार घेतला आहे. संपूर्ण भारतातून आलेल्या खेळाडूंना अमरावतीचे आदरातिथ्य आणि संस्कृतीची ओळख करून दिली जाईल. खेळाडूंनी मैदानावर केवळ कौशल्यच नाही, तर शिस्त आणि खिलाडूवृत्तीचेही दर्शन घडवावे.

प्रतिदिन अखबार

# कर्मचारियों ने विद्यापीठ को परिवार समझकर कार्य किया : कुलगुरु

## विद्यापीठ में सेवानिवृत्त होनेवाले कर्मचारियों का सत्कार



प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 2 फरवरी- कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते ने कहा कि विद्यापीठ से सेवानिवृत्त होनेवाले सभी कर्मचारियों ने अपने सेवा काल में विद्यापीठ के लिए अपना परिवार समझकर कार्य किया. विद्यापीठ के कर्मचारियों की सेवानिवृत्त प्रसंग पर आयोजित समारोह में वे बतौर अध्यक्ष बोल रहे थे. कार्यक्रम में बतौर प्रमुख अतिथि व्यवस्थापन परिषद सदस्य अधिष्ठाता डॉ.हेमंत देशमुख, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, डॉ.नितिन खुल, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, कर्मचारी संघ के अध्यक्ष अजय देशमुख तथा सत्कारमूर्ति सुरेंद्र गुल्हाणे, नरेंद्र खैरे, संजय काळे तथा उसी प्रकार पीआरओ डॉ.विलास नांदुरकर उपस्थित थे. आयोजित कार्यक्रम में सत्कारमूर्तियों को उनके उज्वल भविष्य के लिए शुभकामनाएं दी. इस अवसर पर कुलगुरु डॉ.बाराहाते ने सत्कारमूर्ति सुरेंद्र गुल्हाणे, नरेंद्र खैरे तथा संजय काळे का शाल, श्रीफल, स्मृतिचिन्ह, सम्मान प्रमाणपत्र देकर सत्कार किया. उसी प्रकार सौ.गुल्हाणे, सौ.खैरे तथा सौ.काळे का मोनाली तोटे, मनीषा कुर्हेकर व स्मिता म्हैसाळकर ने साडी-चोली व कुमकुमदानी प्रदान करके सभी का सत्कार किया. कार्यक्रम में सभी अतिथियों ने अपने समयोचित विचार व्यक्त करते हुए सभी स्वागत मूर्तियों को उज्वल भविष्य के लिए शुभकामनाएं दी. इस अवसर पर सत्कारमूर्ति सुरेंद्र गुल्हाणे, नरेंद्र खैरे तथा संजय काळे ने अपने मनोगत में अपने सेवाकाल के अनुभव व्यक्त करते हुए सभी से मिले प्रेम, स्नेह के बदले सभी का आभार व्यक्त किया. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्था की ओर से अध्यक्ष मंगेश वरखेडे व उपाध्यक्ष अविनाश असनारे, सचिव डॉ.श्रीकांत तायडे आदि ने सत्कार मूर्तियों की जमा राशि का धनादेश प्रदान करके सभी का सत्कार करते हुए शुभकामनाएं दी. कार्यक्रम में बड़ी संख्या में विद्यापीठ के अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तथा सत्कार मूर्तियों के परिवार के सभी सदस्य बड़ी संख्या में उपस्थित थे.

विदर्भ मतदार

## अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचा तिसरा दिवस गाजला

# देशातील नामांकित संघाची विजयी घोडदौड सुरू



अमरावती (प्रतिनिधी) दि. ३ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत तिसरा दिवस अतिशय चुरशीचा ठरला. विविध विद्यापीठाच्या संघांनी मैदानात जोरदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. सकाळी अण्णा विद्यापीठ विरुद्ध गुरुकुल कांगरी विद्यापीठ, हरिद्वार यांच्यात झालेल्या लढतीत गुरुकुल कांगरी विद्यापीठ संघ विजयी झाला, दुसऱ्या लढतीत भारतीयार विद्यापीठ संघ एकतर्फी विजयी ठरला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुद्ध जय नारायण व्यास विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत नागपूर विद्यापीठ संघ विजयी झाला. माधव विद्यापीठ, पिंडवाडा, राजस्थान विरुद्ध गोंडवाणा विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत माधव विद्यापीठ संघ विजयी झाला.

दुपारच्या सत्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ संघ विजयी ठरला.

राजस्थान विद्यापीठ, जोधपूर विरुद्ध भोपाळ विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात राजस्थान विद्यापीठ संघ विजयी ठरला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुद्ध पीटीआरएस विद्यापीठ, रायपूर यांच्यात झालेल्या सामन्यात पुणे विद्यापीठ संघ विजयी झाला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव विरुद्ध पीडीयूएस सिकर यांच्यातील सामना जळगांव विद्यापीठ संघाने जिंकला. रायपूर विद्यापीठ विरुद्ध भोपाळ विद्यापीठातील सामना रायपूर विद्यापीठाने जिंकला. मणिपूर विद्यापीठ विरुद्ध संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर यांच्यातील सामना संजीवनी विद्यापीठ संघाने जिंकला.. दि. ४ फेब्रुवारी रोजी होणारे सामने अटीतटीचे होणार असून विद्यापीठाच्या बलाढ्य संघादरम्यान लढत होईल.

आपली मातृभूमि

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी रंगले चुरशीचे सामने





प्रतिनिधी/३ फेब्रुवारी

अमरावती : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरु असलेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत तिसरा दिवस अतिशय चुरशीचा ठरला. विविध विद्यापीठाच्या संघांनी मैदानात जोरदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. सकाळी ऊष्णा विद्यापीठ विरुध्द गुरुकुल कांगरी विद्यापीठ, हरिद्वार यांच्यात झालेल्या लढतीत गुरुकुल कांगरी विद्यापीठ संघ विजयी झाला, दुस-या लढतीत भारतीयार विद्यापीठ संघ एकतर्फी विजयी ठरला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुध्द जय नारायण व्यास विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत नागपूर विद्यापीठ संघ विजयी झाला. माधव विद्यापीठ, पिंडवाडा, राजस्थान विरुध्द गोंडवाणा विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत माधव विद्यापीठ संघ विजयी झाला.

दुपारच्या सत्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक विरुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ संघ विजयी ठरला. राजस्थान विद्यापीठ, जोधपूर विरुध्द भोपाळ विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात राजस्थान विद्यापीठ संघ विजयी ठरला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुध्द पीटीआरएस विद्यापीठ, रायपूर यांच्यात झालेल्या सामन्यात पुणे विद्यापीठ संघ विजयी झाला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव विरुध्द पीडीयूएस सिकर यांच्यातील सामना जळगांव विद्यापीठ संघाने जिंकला. रायपूर विद्यापीठ विरुध्द भोपाळ विद्यापीठातील सामना रायपूर विद्यापीठाने जिंकला. मणिपूर विद्यापीठ विरुध्द संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर यांच्यातील सामना संजीवनी विद्यापीठ संघाने जिंकला.

काल दि. २ फेब्रुवारी रोजी झालेल्या सामन्यांमध्ये जळगांव विद्यापीठ, इंदौर विद्यापीठ, राजस्थान विद्यापीठ, जयपूर, भोपाळ विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, एल.पी.यु. विद्यापीठ, एसएमके विद्यापीठ, बास्टर, संजिवनी विद्यापीठ, अहमदनगर, रायपूर विद्यापीठ, एचवायव्ही दुर्ग विद्यापीठ, एमडीएस अजमेर विद्यापीठ, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, आरजेकेयूटी विद्यापीठ, माधव विद्यापीठ आणि बीयूसी विद्यापीठ हे विद्यापीठांच्या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करुन विजय मिळविला. दि. ४ फेब्रुवारी रोजी होणारे सामने अटीतटीचे होणार असून विद्यापीठाच्या बलाढ्य संघादरम्यान लढत होईल.

सेवानिवृत्तीनिमित्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

# कर्मचाऱ्यांनी विद्यापीठासाठी कुटूंब समजून कार्य केले







## कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी / युवा केसरी

अमरावती, ३ फेब्रुवारी: सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कष्टाने व निष्ठेने या विद्यापीठाला नावलौकिक प्राप्त झाला आहे. [illegible] विद्यापीठासाठी [illegible] विद्यापीठाकरीता कुटूंब समजून कार्य केले असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कार्यक्रमप्रसंगी [illegible] ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, [illegible] परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती सुदिप गुल्हाने, नरेंद्र खैरे, संजय काळे तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले की, आजचा हा क्षण भावनिक आहे, [illegible]

[illegible] कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सत्कारमूर्ती सुदिप गुल्हाने, नरेंद्र खैरे व संजय काळे [illegible] सत्कार केला. [illegible]

[illegible] सत्कारमूर्ती सुदिप गुल्हाने, नरेंद्र खैरे व संजय काळे यांनी [illegible] कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या प्रेम, [illegible] आभार व्यक्त केले. डॉ. नितीन कोळी, मंगेश वरखेडे व विद्यापीठ कर्मचारी संघाचे अजय देशमुख यांनी [illegible] प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, [illegible] जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांनी, तर आभार [illegible] यांनी मानले.

प्रतिदिन अखबार

## विवि में सूचना साक्षरता वर्ग कल

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 4 फरवरी- संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के ज्ञानस्त्रोत केंद्र तथा ईबीएससीओ इंटरनॅशनल इंक के संयुक्त तत्वावधान में 5 फरवरी को दोपहर 3 बजे ज्ञानस्त्रोत केंद्र में सूचना साक्षरता वर्ग आयोजित किया गया है. यह प्रशिक्षण विद्यार्थियों, पाठकों और शोधकर्ताओं के लिए उपयोगी रहेगा. विश्वविद्यालय को 'वन नेशन वन सब्सक्रिप्शन' योजना के अंतर्गत 30 ऑनलाइन डेटाबेस का एक्सेस प्राप्त हुआ है, जिसमें आईईईई एक्सप्लोर भी शामिल है. इस डेटाबेस में अभियांत्रिकी, तकनीक तथा अन्य अंतरविषयक शोध सामग्री उपलब्ध है. इस कार्यक्रम के दौरान आईईईई एक्सप्लोर के माध्यम से शोध संबंधी जानकारी कैसे खोजें और उसका प्रभावी उपयोग कैसे करें, इसका मार्गदर्शन दिया जाएगा. इच्छुक शिक्षक, विद्यार्थी व शोधकर्ता दी गयी लिंक पर पंजीकरण कर प्रशिक्षण का लाभ उठा सकते हैं.

## संगाबा विवि में हुआ कवि सम्मेलन



### मराठी भाषा विकास, विचार और परिवर्तन का माध्यम बने : डॉ. चिमोटे

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 4 फरवरी- संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के स्नातकोत्तर मराठी विभाग एवं विदर्भ साहित्य संघ, अमरावती के संयुक्त तत्वावधान में मराठी भाषा संवर्धन पखवाड़े के अंतर्गत विद्यार्थियों का कवि सम्मेलन लिया गया. इसमें छात्रों ने एक से बढ़कर एक कविताएं प्रस्तुत कर उपस्थितों को मंत्रमुग्ध कर दिया. अध्यक्षीय संबोधन में प्रा. डॉ. मोना चिमोटे ने कहा कि मराठी भाषा को ज्ञान, सामाजिक परिवर्तन और विकास का प्रभावी माध्यम बनना चाहिए. कार्यक्रम की प्रस्तावना प्रा. डॉ. माधव पुटवाड ने की. वरिष्ठ कवि अनंत नांदुरकर, कवि नितिन भट, वरिष्ठ पत्रकार माधव पांडे तथा प्रमुख अतिथि प्रा. डॉ. हेमंत खडके ने कविता, भाषा और डिजिटल युग में साहित्य की भूमिका पर विचार व्यक्त किए. कवि सम्मेलन में विश्वविद्यालय के विभिन्न विभागों के विद्यार्थियों ने स्वरचित कविताएँ प्रस्तुत कर सराहना प्राप्त की. कार्यक्रम का संचालन ऋषिकेश पाडर व साक्षी धुले तथा आभार प्रदर्शन प्रा. अभिजीत इंगले ने किया. बड़ी संख्या में विद्यार्थी, शोधार्थी व प्राध्यापक उपस्थित थे. सभी ने कार्यक्रम की सराहना की.

## कर्मचाऱ्यांनी विद्यापीठासाठी कुटुंब समजून कार्य करा - कुलगुरू

### सेवानिवृत्तप्रसंगी कर्मचाऱ्यांचा सत्कार

अमरावती/का.प्र.

विद्यापीठातून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कष्टाने व निष्ठेने या विद्यापीठाचा वटवृक्ष बहरला आहे. त्यांची सेवा संपली असली, तरी त्यांचा स्नेह विद्यापीठासाठी कायम असून त्यांनी आपल्या सेवाकाळात विद्यापीठाकरीता कुटुंब समजून कार्य केले असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित सत्कारमूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रक अधिकारी म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितिन कोळी, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती सुरेंद्र गुल्हाने, नरेंद्र डेरे, संजय काळे तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, आजचा हा क्षण खूप भावनिक आहे, ज्याप्रमाणे जेवणात मीठ नसेल, तर मीठाची गरज भासते, त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांची उपस्थिती ही विद्यापीठासाठी महत्त्वाची आहे. कर्मचारी निवृत्त होत असतांना आम्हाला खंत वाटते, कारण त्यांचा अनुभव सुद्धा निवृत्त होत आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात या विद्यापीठाच्या विकासासाठी, सेवा देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले आहे. समाधानाने व आनंदाने निवृत्त होत असताना चांगल्या भावना त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितल्या. निश्चितच ही विद्यापीठासाठी पावती आहे. त्यांचे पाल्यही आज उच्च पदावर कार्यरत आहे, ही सुद्धा भाग्याची गोष्ट आहे. मनाची व नात्याची श्रीमंती सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने ठेवली आहे, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्यात. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांनी सत्कारमूर्ती सुरेंद्र गुल्हाने, नरेंद्र डेरे व संजय काळे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला, तर गुल्हाने, डेरे व काळे यांच्या सौभाग्यवती सौ. पाटील, मनिषा कुळेकर व स्मिता भोसलकर यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. हेमंत देशमुख म्हणाले, कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात जे कार्य केले व परिश्रम घेतलेत, त्यामुळेच विद्यापीठाचा नावलौकिक आर्थिक पातळीवर पोहेचला आहे. मी परीक्षा संचालक असतांना कर्मचारी किती जबाबदारीने व वेळेत काम करतात, हे मी जवळून पाहिले आहे, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवले सुद्धा आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या आयुष्याची तीस-पस्तीस वर्षे या विद्यापीठाला दिली आहेत. त्यांचा सत्कार हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा असून त्यांचे नातेवाईक सुद्धा यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत, असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना भावी आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, सचिव डॉ. श्रीकांत तायडे व कोषाध्यक्ष राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार भांडार विभागाचे डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. सुरेंद्र गुल्हाने यांचा त्यांच्या नातेवाईकांकडून सुद्धा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला वित्त व लेखा अधिकारी मीर, पुष्पा देशपांडे, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे, कर्मचारी संघाचे माजी अध्यक्ष पैध्यमसिंग भांबे, माजी सचिव विलास सातपुते, अशोक थावे यांचेसह विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## दैनिक भास्कर

# प्रोजेक्ट तैयार करें, सर्किट्स बनाए व तकनीकी कौशल बढ़ाएं : डा. वाघुले

### ▪ एलईडी लैंप फैब्रिकेशन कार्यशाला में विद्यार्थियों से किया आह्वान

भास्कर डेस्क | अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के उपयोजित परमाणु विद्युत विभाग में ऊर्जा संवर्धन जागरूकता केंद्र के अंतर्गत महाविद्यालयीन छात्रों के लिए एलईडी लैंप फैब्रिकेशन कार्यशाला आयोजित की गई। कार्यक्रम की अध्यक्षता विभागाध्यक्ष डॉ. सुजाता काले ने की, उद्घाटन डॉ. संदीप वाघुले ने किया, जबकि प्रमुख अतिथि के रूप में संदीप पांडे उपस्थित थे।



डॉ. संदीप वाघुले ने छात्रों को प्रोत्साहित किया कि वे राष्ट्रीय शैक्षणिक नीति के मार्गदर्शन में प्रोजेक्ट तैयार करें, सर्किट्स बनाएं और तकनीकी कौशल बढ़ाएं। श्री संदीप पांडे ने कंपनी निर्माण और व्यावसायिक अनुभव साझा किया। प्रा. डी.आर. सोळंके ने ऊर्जा संरक्षण, एलईडी लैंप की कार्यक्षमता और निर्माण प्रक्रिया पर मार्गदर्शन दिया।

डॉ. सुजाता काले ने कहा कि कार्यशाला केवल एलईडी लैंप निर्माण तक सीमित नहीं है, बल्कि आधुनिक तकनीक, प्रयोगात्मक कौशल और सकारात्मक दृष्टिकोण विकसित करने का अवसर है। कार्यशाला में 65 छात्रों ने भाग लिया। प्रशिक्षण में विभाग के प्राध्यापक और शोध छात्र चंद्रकांत चौधरी, एन.एस.सी. अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स के छात्र शामिल थे। महात्मा फुले महाविद्यालय, वरूड और राजश्री शाहू महाविद्यालय, चांदूर रेल्वे के छात्र भी उपस्थित थे। कार्यक्रम में प्रा. के.डी. चिंचखेडे, प्रा.पी.एस. कंटाले, प्रा. ए.एस. कदम, प्रा. यु.बी. चौधरी, डॉ. एन.एन. सरकार, प्रा. अमिन शाह, प्रा. सोनाली मावेवार, प्रा. यामीन शेख, प्रा. चेतना सावरकर, प्रा. हिमानी राऊत, प्रा. पल्लवी देशमुख उपस्थित थे। संचालन पायल गवई, आभार प्रदर्शन राजकुमार राठोड ने किया। कार्यशाला की सफलता में शिक्षकों, शिक्षकेतर कर्मचारियों और छात्रों के अथक प्रयास की सराहना की गई।

# विद्यापीठस्तरीय गणित कार्यशाळा उत्साहात

◆ **अचलपूर, □४ फेब्रुवारी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत लागू करण्यात आलेल्या नवीन गणित अभ्यासक्रमावर एक दिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळा नुकलीसह जगदंबा महाविद्यालय, अचलपूर येथे यशस्वीपणे पार पडली. ही कार्यशाळा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा तसेच अमरावती विद्यापीठ गणित शिक्षक संघटना, अमरावती यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती.

उद्घाटन जगदंब विणकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रमाकांत शेरकार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश कोहळे व प्रा. डॉ. विद्या शर्मा, प्रा. आर. एम. धायगुडे, प्रा. व्ही. आर. पाटील, प्रा. डॉ. जी. यू. खापेकर यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी नव्याने आकाराला आलेल्या अभ्यासक्रमाची रचना, उद्दिष्टे, अध्ययन - अध्यापन पद्धती, मूल्यांकन प्रक्रिया व कौशल्याधिष्ठित शिक्षण यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळा तीन सत्रात पार पडली. प्रा. डॉ. विद्या शर्मा, प्रा. डॉ. एस. आर. भोयर, प्रा. डॉ. अल्फेड शेख यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अश्विना रंगारी व आभार प्रा. सिद्धांत दारूंडे यांनी मानले. कार्यशाळेत अमरावती विद्यापीठ संलग्नित विविध महाविद्यालयातील गणित विषयाचे प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परस्पर संवाद, शंका-समाधान सत्रे तसेच अनुभवांची देवाणघेवाण यामुळे कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरली. कार्यशाळेसाठी डॉ. प्रज्ञा खापेकर, डॉ. निलेश जाधव, प्रा. मोनिका दीक्षित, डॉ. तुलिका खडसे, प्रा दीपक पराते, संदीप रावेकर, साक्षी फिसके, तनुश्री कडू यांनी परीश्रम घेतले.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

## देशोन्नती

नागपूर | बुधवार | दि. ४ फेब्रुवारी २०२६

# अ. भा. आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत चुरशीचे सामने



देशोन्नती वृत्तसंकलन

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत तिसरा दिवस अतिशय चुरशीचा ठरला. विविध विद्यापीठांच्या संघांनी मैदानात जोरदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. सकाळी अण्णा विद्यापीठ विरुद्ध गुरुकुल कांगरी विद्यापीठ, हरिद्वार यांच्यात झालेल्या लढतीत गुरुकुल कांगरी विद्यापीठ संघ विजयी झाला. दुसऱ्या लढतीत भारतीयार विद्यापीठ संघ एकतर्फी विजयी ठरला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुद्ध जय नारायण व्यास विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत नागपूर विद्यापीठ संघ विजयी झाला. माधव विद्यापीठ, पिंडवाडा, राजस्थान विरुद्ध गोंडवाणा विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत माधव विद्यापीठ संघ विजयी झाला.

दुसऱ्या सत्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ संघ विजयी ठरला. राजस्थान विद्यापीठ, जोधपूर विरुद्ध भोपाळ विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात राजस्थान विद्यापीठ संघ विजयी ठरला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुद्ध पीटीआरएस विद्यापीठ, रायपूर यांच्यात झालेल्या सामन्यात पुणे विद्यापीठ संघ विजयी झाला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव विरुद्ध पीडीयूएस सिकर यांच्यातील सामना जळगांव विद्यापीठ संघाने जिंकला. रायपूर विद्यापीठ विरुद्ध भोपाळ विद्यापीठातील सामना रायपूर विद्यापीठाने जिंकला. मणिपूर विद्यापीठ विरुद्ध संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर यांच्यातील सामना संजीवनी विद्यापीठ संघाने जिंकला.


काल दि. २ फेब्रुवारी रोजी झालेल्या सामन्यांमध्ये जळगांव विद्यापीठ, इंदौर विद्यापीठ, राजस्थान विद्यापीठ, जयपूर, भोपाळ विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, एल.पी.यू. विद्यापीठ, एसएमके विद्यापीठ, बास्टर, संजिवनी विद्यापीठ, अहमदनगर, रायपूर विद्यापीठ, एचवायसी दुर्ग विद्यापीठ, एमडीएस अजमेर विद्यापीठ, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, आरजेकेपुटी विद्यापीठ, माधव विद्यापीठ आणि बीयूसी विद्यापीठ हे विद्यापीठांच्या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धांना पराभूत करून विजय मिळविला.

# विद्यापीठात जनरेटिव्ह एआयवर फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन



# देशोन्नती

## राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत आठ पारितोषिकासह अमरावती विद्यापीठ तिस-या स्थानावर



देशोन्नती वृत्तसंकलन

**अमरावती :** परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठयेथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आठ पारितोषिकासह तिसरे स्थान मिळविले आहे.

अजिंक्य पोटे याने शेती व पशू संवर्धन विषयाच्या पी.एचडी. गटातून प्रथम पारितोषिक, कु. रोहिणी कांबे हिने वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा विषयाच्या पदवी गटातून द्वितीय, कु. प्रिया जंजाळकर हिने अभियांत्रिकी व तांत्रिकी विषयाच्या पदव्युत्तर गटातून तृतीय, तर सौरभ श्रीराव याने मेडिसीन ॲन्ड फार्मसी विषयाच्या पदव्युत्तर गटातून तृतीय व राजकुमार जीवतानी याने मानवविज्ञान, भाषा आणि ललित कला विषयाच्या पी.एचडी. गटातून, रोहन बुंदेले याने वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा विषयाच्या पदव्युत्तर गटातून, कु. श्रावणी ठाकरे हिने शुध्द विज्ञान विषयाच्या पदव्युत्तर गटातून, कु. रेणुका येंडे हिने वैद्यकीय आणि औषध निर्माण विषयाच्या पदव्युत्तर गटातून उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त करुन विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. स्पर्धेच्या समारोपीय समारंभात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

स्पर्धेतील पहिल्या टप्प्यात पहिल्या दिवशी पोस्टर व मॉडेल सादरीकरणाच्या माध्यमातून १०८ स्पर्धकांमधून व सर्व गटातून एकूण २२९ स्पर्धकांची निवड दुस-या दिवशी होणा-या सादरीकरणाच्या टप्प्यासाठी करण्यात आली होती. यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४६ पैकी १८ विद्यार्थ्यांचा समावेश होता. या टप्प्यात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करुन परिक्षकांची मने जिंकलीत. महोत्सवाच्या समारोपीय समारंभामध्ये सर्व विजेत्यांना पारितोषिके व संशोधन फेलोशिप देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, तर प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंग, पद्मश्री तथा प्रगतिशील शेतकरी श्री श्रीरंगदादा लाड होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ८ स्पर्धकांनी विविध पारितोषिके प्राप्त केलीत.

## सातत्य राखत ध्येयाकडे वाटचाल

### सहा सुवर्णपदकांची मानकरी निकिता पुनसे



अमरावती : दीक्षांत समारंभात सहा सुवर्णपदके पटकाविणारी निकिता पुनसे तिच्या आई-वडिलांसह.

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. २३ : घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने इच्छा असूनही खर्चिक अभ्यासक्रमास जाता आले नाही. मात्र जे मिळाले त्या संधीचे सोने करायचे या जिद्दीने वाटचाल करणाऱ्या निकिता पुनसे हिने मानव विज्ञान विद्या शाखेत [illegible] परीक्षेत सहा सुवर्ण पदके मिळवत नाव रोशन केले आहे. ध्येयाकडे वाटचाल व अभ्यासातील सातत्य यश आपल्या हे यश प्राप्त केल्याचे तिने सांगितले.

यवतमाळ जिल्ह्यातील [illegible] (ता. ने [illegible]) येथील निकिता किशोर पुनसे हिला सहा सुवर्ण पदके मिळाली आहेत. ने येथील नेहरू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायंस कॉलेजच्या या विद्यार्थिनीचा एकूण प्रवास हा खडतर आहे. आई- वडिलांची आर्थिक स्थिती बेताची असल्याने सध्या शिक्षण घेत मार्गक्रमण करणाऱ्या निकिताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात सहा सुवर्ण पदकांवर नाव कोरले. या यशाचे वर्णन करताना ती म्हणाली, मला मराठी विषयात संशोधन करायचे आहे. पुढे पी. एचडी करून प्राध्यापक बनायचे आहे. शिक्षणासाठी पवित्र क्षेत्र असून ज्ञानदान करण्यासारखे पुण्य नाही. त्यामुळेच शिक्षकी पेशाला महत्त्व देत पुढील मार्गक्रमण करणार आहे. बीएडला प्रवेश घेणार असून पीएचडीसाठीही अभ्यास करणार आहे. सध्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा अभ्यास सुरू आहे. आई वडील हातमजुरी करतात. त्यांच्या मिळकतीवरच घरचा गाडा हाकला जातो. मोठी बहीण व लहान भाऊ यांच्या शिक्षणासोबतच निकिताच्या शिक्षणासाठी या आई वडिलांनी अपार कष्ट घेतले आहेत. आर्थिक स्थितीचा बाऊ न करता ध्येय गाठण्यासाठी सतत केंद्रित करीत अभ्यासात सातत्य राखल्यास यश हमखास मिळते असा सल्लाही तीने दिला आहे. आपल्या या यशात आई वडिलांसह शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याचा उल्लेखही तीने आवर्जून केला.

## विद्यापीठाच्या दोन कर्मचाऱ्यांना पीएचडी



अमरावती दि. २३ : आजच्या दीक्षांत समारंभात विद्यापीठाच्या एकाच विभागातील दोन कर्मचाऱ्यांना आचार्य पदवी ने सन्मानित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या आस्थापना विभागाचे प्रभारी सहायक कुलसचिव डॉ. धनंजय पाटील व याच विभागाचे वरिष्ठ सहायक डॉ श्रीकांत तायडे यांना या वर्षी एकाच दीक्षांत समारंभात एकाच विषयात आचार्य पदवी प्राप्त झाली आहे. मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत मराठी वाङ्मय विषयातील बहुमूल्य संशोधनाबद्दल विद्यापीठाने पीएचडी पदवी ने सन्मानित केले आहे.

दोघेही शिक्षकेतर कर्मचारी असून प्रशासकीय जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडून त्यांनी अभ्यासू वृत्तीचा परिचय दिला आहे. तक्षशिला महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ पी .जी . राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले असून त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू - प्र कुलगुरू व कुलसचिवासह सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

नवराष्ट्र

## अखिल भारतीय सॉफ्टबॉल स्पर्धा; उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन

# चौथ्या दिवशी थरारक सामने

क्रीडा

▶ अमरावती, ब्युरो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या चौथ्या दिवशी अत्यंत रोमांचक आणि अटीतटीचे सामने खेळविण्यात आले. देशातील विविध विद्यापीठांच्या संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या

### जळगाव विद्यापीठाची प्रभावी कामगिरी



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुद्ध माधव विद्यापीठ, राजस्थान यांच्यात झालेल्या सामन्यात माधव विद्यापीठ, राजस्थान संघाने बाजी मारली. एल. पी. यू. विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात झालेल्या रोमांचक लढतीत एल. पी. यू. विद्यापीठाने विजय मिळविला. तसेच जयपूर विद्यापीठ आणि कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यात झालेल्या सामन्यात जळगाव विद्यापीठाने प्रभावी कामगिरी करत सामना जिंकला.

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या चौथ्या दिवशी मैदानावर चुरशीचे आणि थरारक सामने रंगले. विविध विद्यापीठांच्या संघांनी दमदार कामगिरी करत उपस्थित प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

गुरुकुल कांग्री विद्यापीठ, हरिद्वार आणि संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात गुरुकुल कांग्री विद्यापीठाने उत्कृष्ट खेळ करत विजय मिळविला. स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी कौशल्यपूर्ण खेळ, अचूक फील्डिंग आणि प्रभावी बॅटिंगचे प्रदर्शन केले. स्पर्धेमुळे विद्यापीठीय क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असून खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

विदर्भ मतदार

## ■ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचा समारोप ■

# अमरावती विद्यापीठ अव्वल तर माधव विद्यापीठ द्वितीय

अमरावती (वृ.सं.) दि.९ : [illegible]



[illegible]

### उत्कृष्ट खेळाडूंचा केला गौरव

[illegible]

# दैनिक भास्कर



## सॉफ्टबॉल में अमरावती विश्वविद्यालय अव्वल, जीता स्वर्ण पदक

**▪ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धा का समापन**

भास्कर ब्यूरो | अमरावती.संत गाडगेबाबा अमरावती विवि की मेजबानी में आयोजित अखिल भारतीय अंतर-विश्वविद्यालय सॉफ्टबॉल (पुरुष) प्रतियोगिता में मेजबान अमरावती विवि ने शानदार प्रदर्शन करते हुए प्रथम स्थान और स्वर्ण पदक पर कब्जा जमाया। प्रतियोगिता का समापन उत्साहपूर्ण वातावरण में हुआ। प्रतियोगिता में माधव विश्वविद्यालय, पिंडवाड़ा (राजस्थान) ने रजत पदक, कालिकत विश्वविद्यालय ने कांस्य पदक, जबकि महाराजा सूरजमल बृज विश्वविद्यालय, भरतपुर ने चौथा स्थान प्राप्त किया। समापन पर विजेता एवं उपविजेता टीमों को ट्रॉफी और पदक प्रदान कर सम्मानित किया गया। अध्यक्षता कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने की। उन्होंने सुझाव दिया कि आगामी अंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल प्रतियोगिताओं के लिए चयन करते समय इस प्रतियोगिता की शीर्ष चार टीमों के प्रतिभाशाली खिलाड़ियों को प्राथमिकता दी जानी चाहिए। इस समय प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, श्री शिवाजी शिक्षण संस्था के कोषाध्यक्ष डॉ. दिलीपबाबू इंगोले, महाराष्ट्र सॉफ्टबॉल एसोसिएशन के सहसचिव सूरजसिंह येवतीकर, क्रीड़ा संचालक डॉ. तनुजा राऊत सहित अन्य उपस्थित थे। डॉ. इंगोले ने प्रतियोगिता के सुव्यवस्थित आयोजन की सराहना करते हुए खिलाड़ियों को जीत-हार से परे श्रेष्ठ प्रदर्शन पर ध्यान केंद्रित करने का संदेश दिया। समापन समारोह में उत्कृष्ट प्रदर्शन करने वाले खिलाड़ियों एवं निर्णायकों को सम्मानित किया गया।

# लोकमत

शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६



## आठ पारितोषिकांसह विद्यापीठ तिसऱ्या स्थानी

लोकमत न्यूज नेटवर्क

अमरावती : परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने आठ पारितोषिकांसह तिसरे स्थान मिळविले.

अभिजीत पोटे याने शेती व पशुसंवर्धन विभागाच्या पीएच.डी. गटातून प्रथम पारितोषिक [illegible] हिने वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा विभागाच्या पदवी गटातून, द्वितीय प्रिया [illegible] हिने अभियांत्रिकी व तांत्रिकी विभागाच्या पदव्युत्तर गटातून तृतीय, तर सौरभ [illegible] याने मेडिसीन अँड फार्मसी विभागाच्या पदव्युत्तर गटातून तृतीय व राजकुमार [illegible] याने मानव्यविज्ञान, भाषा आणि ललित कला विभागाच्या पीएचडी गटातून, [illegible] याने वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा विभागाच्या पदव्युत्तर गटातून [illegible] हिने शुद्ध विज्ञान विभागाच्या पदव्युत्तर गटातून, [illegible] हिने [illegible] आणि [illegible] विभागाच्या पदव्युत्तर गटातून उत्कृष्ट पारितोषिक प्राप्त करून विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. स्पर्धेत समारोपीय सत्रात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

पोस्टर व मॉडेल सादरीकरणात विद्यापीठाच्या ४८ पैकी ५८ [illegible] विद्यार्थी अविष्कारमध्ये सहभागी होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ८ स्पर्धकांनी विविध पारितोषिके प्राप्त केलीत. अमरावती विद्यापीठाचे चमू गटातून ४८ विद्यार्थी संशोधक सहभागी झाले होते. चमूसोबत अविष्कार समन्वयक डॉ. मनीष कोहारे, चमू व्यवस्थापक डॉ. राजेश भोयर, डॉ. नीलम पवार, डॉ. जयंत वडतकर सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, अविष्कार समन्वयक डॉ. मनीष कोहारे आदींनी कौतुक केले आहे.

राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धा : विद्यापीठाच्या आठ स्पर्धकांनी मिळवली विविध पारितोषिके

# सकाळ



**अमरावती :** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत रंगलेला सामना.

## हरिद्वार, राजस्थानच्या विद्यापीठाची आगेकूच

**आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धा**

■ सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. ४ : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेच्या चौथ्या दिवशी हरिद्वारच्या गुरुकुल कांग्री विद्यापीठ विरुद्ध अहिल्यानगरच्या संजीवनी विद्यापीठादरम्यान झालेल्या अटीतटीच्या लढतीत गुरुकुल विद्यापीठाने बाजी मारली. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ विरुद्ध राजस्थानच्या माधव विद्यापीठात झालेल्या सामन्यात माधव विद्यापीठाने सामना जिंकला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारे संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या चौथ्या दिवशी अटीतटीचे सामने रंगले. विविध विद्यापीठाच्या संघांनी मैदानात जोरदार कामगिरी करीत प्रेक्षकांची मने जिंकली. एल. पी. यू. विद्यापीठ विरुद्ध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात एल. पी. यू. विद्यापीठाने बाजी मारली. जयपूर विद्यापीठ विरुद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात जळगांव विद्यापीठाने सामना जिंकला.

दैनिक दिव्य मराठी

क्रीडा • कुलगुरू डॉ. मिलींद बारहातेंनी खेळाडूंना दिल्या शुभेच्छा, स्पर्धेचा समारोप

# अ. भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये विद्यापीठाला अजिंक्यपद

प्रतिनिधी । अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उत्कृष्ट सांघिक खेळाद्वारे अजिंक्यपद पटकावले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला सुवर्ण पदक, माधव विद्यापीठ, पिंडवारा, राजस्थानने रौप्य पदक, कालिकत विद्यापीठाने कांस्य पदक व महाराजा सुरजमल ब्रिज विद्यापीठ, भरतपूरने कांस्य पदक पटकावले. या वेळी ट्रॉफी व पदके देवून चमूंना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सहभागी खेळाडूंचे कौतुक करत त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, उपाध्यक्ष केशव मेटकर, सचिव डॉ. व्ही.जी. ठाकरे, महाराष्ट्र सॉफ्ट बॉल असोसिएशनचे सहसचिव सुरजसिंह येवतीकर, प्राचार्य डॉ. जी.व्ही. कोरपे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, डॉ. रुपाली इंगोले आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला मोठ्या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाची दीर्घ परंपरा लाभली आहे. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. सर्व सामने पारदर्शकपणे झाल्याबद्दल त्यांनी सर्व आयोजक आणि पंच समितीचे विशेष आभार मानले. येणाऱ्या जागतिक सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करताना या स्पर्धेतील पहिल्या चार क्रमांकावर राहिलेल्या संघांमधील गुणवान खेळाडूंचा प्राधान्याने विचार करावा. भविष्यात जागतिक स्तरावरील निवड चाचणी स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी अमरावती विद्यापीठ सदैव सज्ज असेल, असेही कुलगुरू म्हणाले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. दिलीप इंगोले यांनी स्पर्धेत सहभागी खेळाडूंचे भरभरून कौतुक केले. खेळात जयपराजय होतच असतो, परंतु आपला खेळ सर्वांच्या स्मरणात राहील व देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल असा असला पाहिजे, असेही ते म्हणाले. यावेळी भरतपूर संघाचे कोच अभिषेक व कालिकत विद्यापीठाचे मोहम्मद अली यांनी मनोगत व्यक्त करतांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने राहण्याची व प्रवासाची उत्तम सोय केल्याचे सांगितले.

विद्यापीठ गीताने समारोप समारंभाची सुरुवात झाली. डॉ. पंजाबराव देशमुख व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. रुपाली इंगोले यांनी स्पर्धेचा अहवाल मांडला. संचालन डॉ. दिनेश खेडकर व डॉ. रेखा मग्गीरवार यांनी, तर आभार क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मानले. स्पर्धेच्या आयोजनाकरिता श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील सर्व शिक्षक डॉ. कविता वाटाणे, सर्व शारीरिक शिक्षक तसेच विद्यापीठ शारीरिक शिक्षक विभागातील संतोष वानखडे, अरुण लोहे, अब्दुल तौसिफ आदिंनी परिश्रम घेतले. समारोप कार्यक्रमाला स्पर्धेचे मुख्य परिक्षक मुकुंद देशपांडे, महाविद्यालयातील शिक्षक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अमरावती विद्यापीठाचा विजेता पुरुष सॉफ्टबॉल संघ

## अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धा; सर्वोत्तम ऑलराऊंडर ठरला ऋतिक पुडवे

उत्कृष्ट टीचर पुरस्कार जगदीश (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ कॅचर रोहित सहारे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ बेसमॅन सोनू गुजर (भरतपूर), लेखराज, राजपूत (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ शॉटअप जितेंद्र (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ राईट फिल्डर अभिषेक (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ सेंटर फिल्डर रोहन पोटे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ लेफ्ट फिल्डर जयपाल (भरतपूर विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ ऑलराऊंडर कॅप्टन ऋतिक पुडवे (अमरावती विद्यापीठ) यांचा सन्मान केला.

प्रतिदिन अखबार

# कमलनयन बजाज स्मृति राष्ट्रीय वादविवाद स्पर्धा



## शानदार सफलता पाने वाली श्रावणी का कुलगुरु ने किया सत्कार

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 5 फरवरी- वर्धा में हाल ही में संपन्न 50वीं कमलनयन बजाज स्मृति राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा में विद्यापीठ की श्रावणी रोटे ने चतुर्थ क्रमांक हासिल किया. इसके बदले कुलगुरु डॉ.मिलिंद बारहाते के हाथों श्रावणी रोटे का सत्कार किया गया. 22 व 23 जनवरी को ह्यक्या गांधीजी आज भी जीवित है?ह्य इस विषय पर शिक्षा मंडल वर्धा की ओर से 50वीं कमलनयन बजाज स्मृति वक्तृत्व स्पर्धा का आयोजन शिक्षा मंडल, जमनालाल बजाज मार्ग, सिविल लाइन, वर्धा में किया गया था. इस स्पर्धा में देशभर से 84 विद्यापीठों ने इसमें सहभाग लिया था. स्पर्धा में संगाबा अमरावती विद्यापीठ का प्रतिनिधित्व करने के लिए विद्यार्थी विकास विभाग की ओर से सिपना कॉलेज ऑफ इंजीनियरिंग की छात्रा श्रावणी श्रीकांत रोटे नामक छात्रा का चयन किया गया था. स्पर्धा में चतुर्थ क्रमांक प्राप्त करके नकद 5 हजार रुपए व स्मृति चिन्ह, प्रमाण पत्र अर्जित करके विद्यापीठ का नाम रोशन किया है. श्रावणी की सफलता पर कुलगुरु डॉ.बारहाते, प्रति कुलगुरु डॉ.ढोरे तथा कुलसचिव डॉ.असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ.राजीव बोरकर ने उसका अभिनंदन किया है.

तरुण भारत

# सॉफ्टबॉल स्पर्धेत अमरावती विद्यापीठ अव्वल



अमरावती विद्यापीठाचा संघ मान्यवरांच्या हस्ते चषक स्वीकारताना

## अ. भा. आंतर विद्यापीठ स्पर्धा

अमरावती, ५ फेब्रुवारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने प्रथम क्रमांक मिळविला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला सुवर्ण पदक, माधव विद्यापीठ-पिंडवारा राजस्थानने रजत पदक, कालिकत विद्यापीठाने कांस्य पदक व महाराजा सुरजमल ब्रीज विद्यापीठ- भरतपूरने कांस्यपदक पटकाविले. याप्रसंगी ट्रॉफी व पदके देवून खेळाडूंना सन्मानित करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, उपाध्यक्ष गजानन पुंडकर, उपाध्यक्ष केशव मेतकर, सचिव डॉ. व्ही. जी. ठाकरे, महाराष्ट्र सॉफ्ट बॉल असोसिएशनचे सहसचिव सुरजसिंह येवतीकर, प्राचार्य वी. व्ही. कोरपे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, डॉ. रुपाली इंगोले आदी उपस्थित होते.

कुलगुरू बारहाते म्हणाले, येणाऱ्या जागतिक सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करताना या स्पर्धेत पहिल्या चार क्रमांकावर राहिलेल्या संघांमधील गुणवान खेळाडूंचा प्राधान्याने विचार करावा. भविष्यात जागतिक स्तरावरील निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी अमरावती विद्यापीठ सदैव सज्ज आहे.

मान्यवरांच्या हस्ते सर्व पंचांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट पिचर पुरस्कार जगदीश (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ कॅचर रोहित सहारे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ बेसमॅन सोनू गुजर (भरतपूर), तेजपाल व राजपूत (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ बॅटिंग विवेक (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ राईट फिल्डर अभिषेक (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ सेंटर फिल्डर रोहन पोटे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ लेफ्ट फिल्डर जयपाल (भरतपूर विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ ऑलराऊंडर कॅप्टन ऋतिक पुढवे (अमरावती विद्यापीठ) यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

संचालन डॉ. दिनेश खेडकर व डॉ. रेखा मग्गीरवार यांनी केले. आयोजनासाठी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील शिक्षक डॉ. कविता वाटाणे, शारीरिक शिक्षक आदींनी परिश्रम घेतले. (तभा वृत्तसेवा)

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने मारले मैदान

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धा



अमरावती : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकाविल्यावर मान्यवरांच्या हस्ते चषक स्वीकारताना अमरावती विद्यापीठाचा संघ.

अमरावती, ता. ५ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेच्या पुरुष गटात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने बाजी मारली असून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे.

या स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने सुवर्ण, राजस्थानच्या पिंडवारा येथील माधव विद्यापीठाने रौप्य, तर कालिकत विद्यापीठ व महाराजा सूरजमल ब्रीज विद्यापीठाने ब्राँझपदक पटकाविले. बक्षीस वितरण समारंभात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्व सहभागी खेळाडूंचे कौतुक करीत त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, उपाध्यक्ष केशवराव मेतकर, सचिव डॉ. व्ही. जी. ठाकरे, महाराष्ट्र सॉफ्ट बॉल असोसिएशनचे सहसचिव सूरजसिंह येवतीकर, प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, डॉ. रूपाली इंगोले आदी उपस्थित होते.

येणाऱ्या जागतिक सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करताना या स्पर्धेत पहिल्या चार क्रमांकावर राहिलेल्या संघांमधील गुणवान खेळाडूंचा प्राधान्याने विचार करावा. भविष्यात जागतिक स्तरावरील निवडचाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी अमरावती विद्यापीठ सदैव सज्ज असेल, असे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते याप्रसंगी म्हणाले.

देशातील आघाडीच्या १०८ विद्यापीठांमधील खेळाडू एकाच वेळी शहरातील विविध पाच कोर्टवर एकत्र आल्याने गेल्या पाच दिवसांपासून चांगलीच धूम होती. आता शुक्रवारपासून (ता. सात) कुस्तीच्या सामन्यांना सुरवात होणार आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेच्या निमित्ताने साडेतीन हजारांवर खेळाडू व त्यांचे प्रशिक्षक अमरावतीत दाखल झाले होते.

# देशोन्नती

### अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धा ■ श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे यशस्वी आयोजन

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ 'अव्वल'

देशोन्नती वृत्तसंकलन

अमरावती - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमान पदाखाली आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने प्रथम क्रमांक मिळविला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला सुवर्ण पदक, मगध विद्यापीठ, बिहार, राजस्थानने रजत पदक, कालिकत विद्यापीठाने कास्य पदक व महाराजा सुरजमल ब्रिज विद्यापीठ, भरतपूरने [illegible] पदक पटकाविले. पाचही ट्रॉफी व पदके देऊन खेळूंना सन्मानित करण्यात आले.

[illegible]



[illegible]

# वृत्त केसरी

### श्री संत मारोती महाराज व्याख्यानमाला

## जगाला दिशा देण्याचे सामर्थ्य भारतीय अध्यात्मात

### डॉ. प्रवीण देशमुख यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी/वृत्त केसरी

अमरावती, ५ फेब्रुवारी: समाजाचे अधःपतन होतांना दिसते आहे. त्यामुळे समाजाचे सर्वांगीण प्रबोधन होणे आवश्यक असून जगाला दिशा देण्याचे सामर्थ्य भारतीय आध्यात्मिक तत्वज्ञानात असल्याचे प्रतिपादन डॉ. प्रविण देशमुख यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात संत मारोती महाराज संस्थान, माकनेर यांच्या दाननिधीतून केमिकल टेक्नॉलॉजी विभागातर्फे आयोजित 'आध्यात्मिक लोकशाहीचे श्रेष्ठ भाष्यकार' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, दानदात्यांचे प्रतिनिधी प्रा. दिवाकर देशमुख, रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए.बी. नाईक उपस्थित होते. डॉ. प्रवीण देशमुख म्हणाले की, नीतीमान व चिकित्सक समाज आज अभिप्रेत आहे. विज्ञानमूल्य, आध्यात्मिक जोड असलेला समाज घडला, तर भारताला विश्वगुरु बनल्याशिवाय कोणीच रोखू शकणार नाही. भारतभूमितच





सर्व संतांचा जन्म झाला. वेगवेगळ्या संप्रदायाचा आश्रयदाता आपली भूमी आहे. आध्यात्मिक लोकशाहीची सुरुवात संत ज्ञानेश्वरांनी केली. संतांनी समाजासाठी खूप कार्य केले आहे, असेही डॉ. देशमुख म्हणाले.

व्यसनाच्या आहारी जावू नका - कुलगुरू

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू म्हणाले, व्यसनाधीनतेचे मोठे संकट आज दिसत आहे. त्यातच मोबाईलचे देखील मोठे वेड लागल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे तरुणांनी व्यसनाच्या आहारी जावू नये, असे आवाहन त्यांनी केले. कौटुंबिक मूल्यांचा ह्रास, न्युक्लियर फॅमिली आणि लिव्ह-इन रिलेशनशिप यांसारख्या संकल्पनांमुळे भारतीय समाजव्यवस्था आणि कौटुंबिक वीण विस्कळीत होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. कुलगुरू म्हणाले, आज संत साहित्याची अत्यंत आवश्यकता असून समाजातील अंधकार दूर करण्यासाठी ज्याप्रमाणे संतांनी कार्य केले, त्याचप्रमाणे आजच्या विस्कळीत समाजाला सावरण्यासाठी संत मारोती महाराज, गणपती महाराज, गुलाबराव महाराज यांच्या विचारांची तरुणांना ओळख करून देणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. यावेळी प्रा. दिवाकर देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले.

संत गाडगे बाबा व श्री संत मारोती महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. ए.बी. नाईक, सूत्रसंचालन कु. कृती बारबुध्दे, तर आभार डॉ. प्रदीप वानखडे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, श्री संत मारोती महाराज संस्थानचे विश्वस्त, विद्यार्थी उपस्थित होते.

विदर्भ मतदार

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात माता रमाई जयंती उत्साहात



**नमस्कार अमरावती**

अमरावती (प्रतिनिधी) दि. ७ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत पाली आणि बुद्धिझम विभागाततर्फे शनिवारी (ता. सात) माता रमाई जयंती साजरी करण्यात आली.

माता रमाई आंबेडकर यांच्या सामाजिक त्याग, संघर्षमय जीवन आणि स्त्री-मुक्तीच्या कार्याला उजाळा देणाऱ्या या कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या प्रादर्शिक कला विभागात जुना पाली व बुद्धिझम विभागाजवळ सायंकाळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रेखा वानखडे होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी माता रमाई यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि संघर्ष याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास भिक्खू सीलवंसलंकार, डॉ. मानवटकर, डॉ. रजनी गेडाम, प्रा. जी. एच. पांडे, डॉ. राजेश चौरपगार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच प्रा. डॉ. टी. बी. रामटेके, प्रा. अनिता निर्गुळे, प्रा. कल्पना डोंगरे, प्रा. सपना मेश्राम, प्रा. कल्पना पाटील, प्रा. एस. कुमार मेश्राम, प्रा. डॉ. कमलाकर गोवर्धन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन पाली आणि बुद्धिझम विभागातील विद्यार्थी अभ्यास मंडळातर्फे करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भीमगीते, बुद्धगीते तसेच माता रमाई यांच्या जीवनावर आधारित कविता व विचार मांडणी सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# 8 पुरस्कारों के साथ तीसरे स्थान पर रहा अमरावती विवि



## राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धा

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार


अमरावती, 5 फरवरी- परभणी स्थित वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ में हाल ही में संपन्न राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव में संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ने 8 पुरस्कारों सहित तीसरा स्थान हासिल किया. सभी विजेताओं को स्पर्धा के समापन समारोह में अतिथियों के हाथों पुरस्कार प्रदान करके संबंधित विद्यार्थियों सम्मानित किया गया.

स्पर्धा के पहले चरण में पहले दिन पोस्टर व मॉडेल प्रस्तुतिकरण के माध्यम से 908 स्पर्धकों में से व सभी गुटों में कुल 229 स्पर्धकों का चयन दूसरे दिन होने वाले प्रस्तुतिकरण के चरण के लिए किया गया था. इसमें अमरावती विद्यापीठ के 46 में 18 विद्यार्थियों का समावेश था. इस चरण में विद्यार्थियों ने उत्कृष्ट प्रस्तुतिकरण करके परीक्षकों को मोहित कर दिया. महोत्सव के समापन समारोह में सभी विजेताओं को पुरस्कार व संशोधन फेलोशिप देकर सम्मानित किया गया. कार्यक्रम की अध्यक्षता मराठवाडा कृषि विद्यापीठ के कुलगुरु डॉ.इंद्रमणि, प्रमुख अतिथि के रुप में पद्मश्री डॉ.अशोक सिंह, पद्मश्री तथा प्रगतिशील किसान श्रीरंग लाड आदि उपस्थित थे. कार्यक्रम में अमरावती विद्यापीठ के 8 स्पर्धकों ने विविध पुरस्कार प्राप्त किए. राज्यपाल की पहल पर महाराष्ट्र में प्रतिवर्ष आविष्कार स्पर्धा का आयोजन किया जाता है. इस वर्ष राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव परभणी के कृषि विद्यापीठ में 28 से 31 जनवरी के दौरान संपन्न हुआ. इस महोत्सव में राज्य के 25 कृषि व अकृषि विद्यापीठों के 908 विद्यार्थी संशोधकों ने भाग लिया. अमरावती विद्यापीठ के 6 गुटों से 46 विद्यार्थी संशोधक सहभागी हुए थे. टीम के साथ आविष्कार समन्वयक डॉ.मनीषा कोडापे, टीम व्यवस्थापक डॉ.राजेश भोयर, डॉ.नीरज घनवटे, डॉ.जयंत वडतकर सहभागी हुए थे. विजेता विद्यार्थियों की सफलता पर कुलगुरु डॉ.मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे आदि सहित अन्य संबंधित अतिथियों ने विद्यार्थियों का अभिनंदन करते हुए उन्हें उज्वल भविष्य के लिए शुभकामनाएं दी.



## विद्यापीठात आंतर विभागीय क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन

## नेट परीक्षेत पदव्युत्तर मराठी विभागाच्या यशाची परंपरा यंदाही कायम



लोकमत

, सोमवार, दि. ९ फेब्रुवारी,२०२६

# तिसऱ्या दिवशी अटीतटीच्या सामन्यात विजयी संघाची सलामी

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी रविवारी संजीवनी विद्यापीठ कोपरगाव विरुद्ध एच. एन. जी. विद्यापीठ, पाटण यांच्यात झालेला सामना सहजपणे पाटण विद्यापीठाने जिंकला.

आग्रा विद्यापीठ विरुद्ध कानपूर विद्यापीठ यांमधील झालेला सामना आग्रा विद्यापीठाने मोठ्या फरकाने जिंकला. कालिकत विद्यापीठ विरुद्ध गोंडवाना विद्यापीठ यांच्यातील सामना कालिकतने एकतर्फी जिंकला. आंध्र विद्यापीठ विरुद्ध बरकतुल्ला विद्यापीठ, भोपाळ यांच्यातील सामना बरकतुल्ला विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. एम. एल. एस. यू. उदयपूर विरुद्ध व्ही. टी. यू. विद्यापीठ कर्नाटक यांच्यातील सुद्धा सामना उदयपूरने एकतर्फी जिंकला. एम. डी. एस. यू. अजमेर विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेला सामना अजमेर संघाने जिंकला.

भारती विद्यापीठ, पुणे विरुद्ध कुवेम्पु विद्यापीठ, कर्नाटक यांच्यात झालेला अटीतटीचा सामना कर्नाटकने जिंकला. कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ विरुद्ध दिल्ली विद्यापीठ यांच्यात सामना जळगावने एकतर्फी जिंकला. एच.वाय.व्ही. दुर्ग विद्यापीठ विरुद्ध केरळ विद्यापीठ यांच्यातील सामना दुर्ग विद्यापीठाने जिंकला. जी.एन.डी.यू. अमृतसर विरुद्ध पुणे विद्यापीठातील सामना अमृतसरने जिंकला. पंजाब विद्यापीठाने एम.जी.यू. नालागोंडा विद्यापीठाला हरविले. भारती विद्यापीठ, पुणे व कोइंबतूर विद्यापीठ, शिमोगा यांत १० तारखेला अंतिम सामने होणार असून त्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान निश्चित होणार आहे.

जनमाध्यम

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धा

## तिसऱ्या दिवशी अटीतटीच्या सामन्यात विजयी संघाची सलामी



अमरावती / प्रतिनिधी :- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे सुरू झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्ट बॉल महिला स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी दमदार कामगिरी करून विजयी संघाने विजय मिळवला. त्यामध्ये आज झालेल्या सामन्यात संजीवनी विद्यापीठ कोपरगाव विरुद्ध एच. एन. जी. विद्यापीठ पाटण यांच्यात झालेला सामना सहजपणे पाटण विद्यापीठाने जिंकला. आग्रा विद्यापीठ वर्सेस कानपूर विद्यापीठ यामधील झालेला सामना आग्रा विद्यापीठाने मोठ्या फरकाने जिंकला. कालिकत विद्यापीठ विरुद्ध गोंडवाना विद्यापीठ यांच्यातील सामना कालिकतने एकतर्फी जिंकला. आंध्र विद्यापीठ विरुद्ध बरकतुल्ला विद्यापीठ भोपाळ यांच्यात झालेला सामना बरकतुल्ला विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. एम. एल. एस. यु. उदयपूर विरुद्ध व्ही. टी. यु. विद्यापीठ कर्नाटक यांच्यातील सुद्धा सामना उदयपूरने एकतर्फी जिंकला. एम.डी.एस. यु. अजमेर विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेला सामना अजमेर संघाने जिंकला. भारती विद्यापीठ, पुणे विरुद्ध कुवेम्पु विद्यापीठ (पान २ वर)

राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यापीठाचे सुयश

# श्रावणी रोटेचा कुलगुरू डॉ. बारहातेंच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, ७ फेब्रुवारी: वर्धा येथे नुकत्याच झालेल्या 50 व्या कमलनयन बजाज स्मृति राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यापीठाची श्रावणी श्रीकांत रोटे हिने चतुर्थ क्रमांक पटकावून विद्यापीठाचा नावलौकीक केला. याबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते कु. श्रावणी हिचा सत्कार करण्यात आला.



22 व 23 जानेवारी, 2026 या कालावधीत 'क्यों गांधी आज भी जीवित है ?' या विषयावर शिक्षा मंडळ वर्धा तर्फे 50 वा कमलनयन बजाज स्मृती राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शिक्षा मंडळ, जमनालाल बजाज मार्ग, सिव्हिल लाईन, वर्धा येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून 84 विद्यापीठांनी आपला सहभाग नोंदविला. सदर वक्तृत्व स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याकरीता विद्यार्थी विकास विभागातर्फे सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, बडनेरा रोड, अमरावती येथील कु. श्रावणी श्रीकांत रोटे या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली होती. कु. श्रावणी हिने सदर स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावून रोख रक्कम रु. पाच हजार व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्राप्त करुन विद्यापीठाचा नावलौकीक केला आहे. याबद्दल कु. श्रावणीचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक, डॉ. राजीव बोरकर यांनी अभिनंदन केले आहे.

# 'सॉफ्टबॉल'मध्ये अमरावती विद्यापीठ प्रथम

## विद्यापीठाचे राष्ट्रीय पातळीवर नाव उज्ज्वल

क्रीडा



▶ अमरावती, ब्युरो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत संत अमरावती विद्यापीठ संघाने दमदार आणि सातत्यपूर्ण कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या संघाला सुवर्णपदकाने गौरविण्यात आले. राजस्थान येथील पिंडवाडा येथील माधव विद्यापीठ संघाने रौप्य पदक मिळवले, तर कालिकट विद्यापीठ आणि महाराजा सूरजमल ब्रज विद्यापीठ, भरतपूर यांनी कांस्य पदकावर समाधान मानले. सर्व विजेत्या संघांना ट्रॉफी व पदक प्रदान करण्यात आले. स्पर्धेचा समारोप सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते होते. त्यांनी सहभागी सर्व खेळाडूंचे कौतुक केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीयस्तरावरील क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्याची समृद्ध परंपरा असून, शिस्तबद्ध व जबाबदार आयोजक म्हणून विद्यापीठाची देशभरात ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. दिलीप इंगोले, गजानन पुंडकर उपस्थित होते.

# नेट परीक्षेत विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाच्या यशाची परंपरा कायम!

देशोन्नती वृत्तसंकलन

अमरावती : उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, सातत्य आणि शैक्षणिक निष्ठेचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाने यंदाही उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेट परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत विभागातील एकूण सहा विद्यार्थ्यांनी यश मिळवत सहायक प्राध्यापक पदासाठी तसेच आचार्य पदवीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे.



अभ्यासक्रमातील सातत्य, नियमित मार्गदर्शन वर्ग, चर्चासत्रे, वाचनसंस्कृतीला चालना देणारे उपक्रम आणि स्पर्धा परीक्षांसाठीची विशेष तयारी यामुळे विद्यार्थ्यांना सक्षम आधार मिळत असल्याचे शिक्षकांनी नमूद केले. नेट परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विभागाची माजी विद्यार्थिनी कु. निकिता शेंडे हिने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच सध्या विभागात द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या कु. स्नेहा खडसे आणि निलेश कुमरे यांनीही नेट परीक्षा उत्तीर्ण होत विभागाचा गौरव वाढविला आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यमान विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरणा मिळाली आहे.

याबरोबर विभागाचे माजी विद्यार्थी निखिल चव्हाण, आशिष धुर्वे तसेच सध्या द्वितीय वर्षात प्रवेशित असलेला राजेश ढोंगरे यांनी आचार्य पदवीसाठीची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

माजी आणि विद्यमान विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे यश संपादन केल्याने विभागातील शैक्षणिक परंपरेचे सातत्य अधोरेखित झाले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विभागप्रमुख प्रा. डॉ. मोना चिमोटे, प्रा. डॉ. माधव पुटवाड आणि डॉ. प्रणव कोलते यांनी अभिनंदन केले.

मराठी भाषा व साहित्य क्षेत्रात गुणवत्तापूर्ण संशोधक, प्राध्यापक आणि अभ्यासक घडविण्याच्या दिशेने पदव्युत्तर मराठी विभाग सातत्याने कार्यरत असून यंदाचे यश हे त्या ध्येयाकडे टाकलेले आणखी एक भक्कम पाऊल मानले जात आहे.

वृत्त केसरी

विद्यापीठाचा 'आव्हान' मध्ये विजयघोष!

# चमू व्यवस्थापकांचा कुलगुरूंच्या हस्ते गौरव



प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, ८ फेब्रुवारीः महामहीम राज्यपालकार्यालयाच्यावतीने अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर 'आव्हान-२०२५' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने 'उत्कृष्ट विद्यापीठ' हा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर दबदबा निर्माण केला आहे. या ऐतिहासिक विजयाचे औचित्य साधून, मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या जिल्हा चमू व्यवस्थापकांचा गौरव सोहळा विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. निलेश कडू व सर्व चमू व्यवस्थापकांनी 'आव्हान-२०२५' चा विजेता फिरता चषक कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द केला. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. अजय लाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर आणि अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांची प्रमुख उपस्थिती होती. आव्हान शिबिरादरम्यान दाखवलेले उत्कृष्ट नियोजन आणि मार्गदर्शनाबद्दल जी. एस. कॉलेज, खामगाव येथील डॉ. नीता बोचे यांचा 'उत्कृष्ट महिला चमू व्यवस्थापक' फिरता चषक पटकावल्याबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी शिबिरात सर्वोत्तम कामगिरी नोंदवल्याबद्दल मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. महाराष्ट्रातील २४ विद्यापीठांमधील ११२२ विद्यार्थ्यांच्या सहभागात अमरावती विद्यापीठाच्या १२५ स्वयंसेवकांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी भाषणातून नमूद केले की, आपत्ती व्यवस्थापनातील जिद्द आणि शिस्त ही केवळ पुरस्कारापुरती मर्यादित नसून, ती समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा सन्मान आहे. विद्यार्थ्यांची शिस्तबद्धता, उत्कृष्ट देखावा आणि कार्यतत्परता यामुळेच विद्यापीठाला 'आव्हान चान्सलर्स ब्रिगेड' मध्ये हे यश संपादन करता आले.

१४ विद्यापीठांचा सहभाग

# आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेचे थाटात उद्घाटन

पाच दिवस रंगणार सामने

देशपातळीवर भव्य आयोजन

प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, ७ फेब्रुवारीः संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) स्पर्धा २०२५-२६" चे भव्य उद्घाटन शुक्रवारी थाटात पडले.

सॉफ्टबॉलच्या इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांच्या राष्ट्रीय स्पर्धा एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी आयोजित करून अमरावतीने नवा इतिहास रचला आहे. उद्घाटन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, महाराष्ट्र सॉफ्टबॉल असोसिएशनचे महासचिव डॉ. सुरजसिंह येवतीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे, डॉ. श्वेता बारहाते, डॉ. स्वाती





ढोरे, निर्मलाताई हर्षवर्धन देशमुख, प्रेमाताई दिलीपबाबू इंगोले, मीनाताई विजय ठाकरे, शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाचे संचालक डॉ. तनुजा राऊत, समन्वयप्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. सतीश पहाडे, डॉ. विकास टोणे, प्राचार्य डॉ. जी.व्ही. कोरपे, डॉ. रुपाली इंगोले, ए. आय. यु. चे निरीक्षक दिलीप



तुरकी, संघांचे मुख्य परीक्षक मुकुंद देशपांडे आदी उपस्थित होते. तिरंगा असलेले फुगे मान्यवरांच्या हस्ते आकाशात सोडण्यात आले. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.व्ही. कोरपे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. तनुजा राऊत यांनी, संचालन डॉ. रेखा मग्गीरवार व डॉ. मुकुंद चोंडे यांनी केले, तर आभार डॉ. रुपाली इंगोले यांनी मानले. डॉ. अर्चना मानकर यांनी प्रेरणादायी गीत सादर केले.

खेळ माणसांना जोडतो - जिल्हाधिकारी येरेकर

जिल्हाधिकारी येरेकर यांनी सर्व खेळाडूंचे स्वागत केले. ते म्हणाले की, अमरावती ही अंबादेवी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांची भूमी आहे. या भूमीने देशाला नामवंत खेळाडू दिले आहेत. विविध राज्यांतून आलेल्या खेळाडूंमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, खेळ हे सर्व प्रांतांना एकत्र जोडण्याचे महत्त्वाचे साधन आहे. केवळ शिस्तबद्ध व्यक्तीच आयुष्यात खऱ्या अर्थाने प्रगती करू शकतो. खेळामुळे आयुष्यात शिस्त येते, संघभावना आणि स्वतःवरचा विश्वास या गोष्टी खेळातूनच शिकायला मिळतात, ज्यामुळे खेळाडूच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. पाच दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील विविध विद्यापीठांचे संघ सहभागी झाले आहेत.

# देशोन्नती

## तिसऱ्या दिवशी अटीतटीचे सामने

■ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धा



**देशोन्नती वृत्तसंकलन**

**अमरावती** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे सुरू झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी दमदार कामगिरी करून विजयी संघाने विजय मिळवला. त्यामध्ये झालेल्या सामन्यात संजीवनी विद्यापीठ कोपरगाव विरुद्ध एच. एन. जी. विद्यापीठ पाटण यांच्यात झालेला सामना सहजपणे पाटण विद्यापीठाने जिंकला. आग्रा विद्यापीठ विरुद्ध कानपूर विद्यापीठ यांच्यातील झालेला सामना आग्रा विद्यापीठाने मोठ्या फरकाने जिंकला. कालिकत विद्यापीठ विरुद्ध गोंडवाना विद्यापीठ यांच्यातील सामना कालिकतने एकतर्फी जिंकला. आंध्र विद्यापीठ विरुद्ध बरकतुल्ला विद्यापीठ भोपाळ यांच्यात झालेला सामना बरकतुल्ला विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. एम. एल. एस. यु. उदयपूर विरुद्ध व्ही. टी. यु. विद्यापीठ कर्नाटक यांच्यातीलसुद्धा सामना उदयपूरने एकतर्फी जिंकला. एम.डी.एस. यु. अजमेर विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेला सामना अजमेर संघाने जिंकला.

भारती विद्यापीठ, पुणे विरुद्ध कुवेम्पु विद्यापीठ कर्नाटक यांच्यात झालेला अटीतटीचा सामना कर्नाटकने जिंकला. कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विरुद्ध दिल्ली विद्यापीठ यांच्यात झालेला सामना जळगावने एकतर्फी जिंकला. एच. वाय. जी. दुर्ग विद्यापीठ विरुद्ध केरळ विद्यापीठ यांच्यातील सामना दुर्ग विद्यापीठाने जिंकला. जी. एन. डी. यु. अमृतसर विरुद्ध पुणे विद्यापीठातील सामना अमृतसरने जिंकला.

पंजाब विद्यापीठ चंडीगड विरुद्ध एम. जी. यु. नलगोंडा विद्यापीठ यांच्यातील झालेला सामना पंजाब विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. भारती विद्यापीठ पुणे विरुद्ध कोइंबतूर विद्यापीठ शिमोगा विरुद्ध झालेला सामना कोइंबतूर विद्यापीठाने जिंकला. उद्या तीन मॅच होणार असून आज होणारे सामनेसुद्धा बलाढ्य संघामध्ये होणार आहेत. दहा तारखेला अंतिम सामने होणार असून त्यामधून प्रथम द्वितीय व तृतीय स्थान निश्चित होणार आहे.

# दैनिक दिव्य मराठी



विद्यापीठात आंतर विभागीय क्रिकेट सामन्यांच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर आणि खेळाडू.

## विद्यापीठात आंतर विभागीय क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन

**प्रतिनिधी | अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने आंतर विभागीय क्रिकेट सामन्यांचे ५ ते ५ फेब्रुवारी दरम्यान विद्यापीठाच्या क्रीडांगणावर आयोजन करण्यात आले आहे.

सामन्यांचे उद्घाटन प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दिनानाथ नवाथे, असोसिएट एलएनआयपीई, ग्वाल्हेरचे डॉ. दिलीप तुळकी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सुभाष गावंडे म्हणाले, आजची पिढी मोबाइलमध्ये व्यस्त दिसतात, त्यातून बाहेर पडण्यासाठी क्रीडा स्पर्धा आवश्यक असून, विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनातील परिश्रम पुढील आयुष्यात उपयोगी पडतात. प्रमुख अतिथी डॉ. दीनानाथ नवाथे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवांचे दाखले दिले. जेव्हा स्मृती मंधानासारखे खेळाडू बाद होतात, तेव्हा त्या आपल्या चुका सुधारण्यासाठी स्वतःचे व्हीडीओ हजारो वेळा पाहतात. खेळात यश मिळवण्यासाठी अथाक चिकाटीची, सूक्ष्म अभ्यासाची गरज असते, असे सांगितले. डॉ. दिलीप तुळकी यांनी फिटनेसचे महत्त्व पटवून देताना जर तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असाल, तर तुम्ही तरुण दिसाल. शारीरिक क्षमता टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी खेळामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा.

खेळासाठी वय हा आकडा आहे, असे त्या म्हणाल्या. संचालन सुरभी ढोंगे, लोकेशिवुंग यांनी, तर आभार लोकेशिवुंग यांनी मानले. निखील कुमार यांनी मानले. सामन्यांच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. हेमंतराज कवारे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, सविता बावनकडे, डॉ. नीलेश इंगोले, डॉ. सौरभ तिवडी, विभागातील शिक्षक परिश्रम घेत आहेत. कार्यक्रमाला विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यापीठाचा 'आव्हान'मध्ये विजयघोष; चमूंचा गौरव

**लोकमत न्यूज नेटवर्क**



अमरावती : राज्यपाल कार्यालयाच्या वतीने अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर 'आव्हान-२०२५' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने 'उत्कृष्ट विद्यापीठ' हा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर दबदबा निर्माण केला आहे. या विजयाचे औचित्य साधून, मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या जिल्हा चमू व्यवस्थापकांचा गौरव सोहळा विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृहात संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. निलेश कढ्ढ व सर्व चमू व्यवस्थापकांनी 'आव्हान-२०२५' चा विजेता फिरता चषक कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द केला. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. अजय लाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांची उपस्थिती होती. आव्हान शिबिरात दाखवलेले उत्कृष्ट नियोजन व मार्गदर्शनाबद्दल जी. एस. कॉलेज, खामगाव येथील डॉ. नीता बोचे यांचा 'उत्कृष्ट महिला चमू व्यवस्थापक' फिरता चषक पटकावल्याबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते विशेष सत्कार केला. त्यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी सर्वोत्तम कामगिरी नोंदवल्याबद्दल मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. राज्यातील २४ विद्यापीठांमधील ११२२ विद्यार्थ्यांच्या सहभागात अमरावती विद्यापीठाच्या १२५ स्वयंसेवकांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी आपल्या भाषणातून नमूद केले की, आपत्ती व्यवस्थापनातील जिद्द आणि शिस्त ही केवळ पुरस्कारापुरती मर्यादित नसून, ती समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा सन्मान आहे.

आपली मातृभूमि

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धा

## तिसऱ्या दिवशी अटीतटीच्या सामन्यात विजयी संघाची सलामी





**प्रतिनिधी / ८ फेब्रुवारी**

**अमरावती** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे सुरू झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्ट बॉल महिला स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी दमदार कामगिरी करून विजयी संघाने विजय मिळवला. त्यामध्ये आज झालेल्या सामन्यात संजीवनी विद्यापीठ कोपरगाव विरुद्ध एच. एन. जी. विद्यापीठ पाटण यांच्यात झालेला सामना सहजपणे पाटण विद्यापीठाने जिंकला. आग्रा विद्यापीठ वर्सेस कानपूर विद्यापीठ यामधील झालेला सामना आग्रा विद्यापीठाने मोठ्या फरकाने जिंकला. कालिकात विद्यापीठ विरुद्ध गोंडवाना विद्यापीठ यांच्यातील सामना कालिकतने एकतर्फी जिंकला. आंध्र विद्यापीठ विरुद्ध बरकतुल्ला विद्यापीठ भोपाळ यांच्यात झालेला सामना बरकतुल्ला विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. एम. एल. एस. यु. उदयपूर विरुद्ध व्ही. टी. यु. विद्यापीठ कर्नाटक यांच्यातील सुद्धा सामना उदयपूरने एकतर्फी जिंकला. एम.डी.एस. यु. अजमेर विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेला सामना अजमेर संघाने जिंकला.

भारती विद्यापीठ, पुणे विरुद्ध कुवेम्पु विद्यापीठ कर्नाटक यांच्यात झालेला अटीतटीचा सामना कर्नाटकने जिंकला. कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विरुद्ध दिल्ली विद्यापीठ यांच्यात झालेला सामना जळगावने एकतर्फी जिंकला. एच. वाय. व्ही. दुर्ग विद्यापीठ विरुद्ध केरळ विद्यापीठ यांच्यातील सामना दुर्ग विद्यापीठ ने जिंकला. जी. एन. डी. यु. अमृतसर विरुद्ध पुणे विद्यापीठातील सामना अमृतसरने जिंकला. पंजाब विद्यापीठ चंदीगड विरुद्ध एम. जी. यु. नालागोंडा विद्यापीठ यांच्यातील झालेला सामना पंजाब विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. भारती विद्यापीठ पुणे विरुद्ध कोइंबतूर विद्यापीठ शिमोगा विरुद्ध झालेला सामना कोइंबतूर विद्यापीठाने जिंकला. उद्या लीग मॅच होणार असून उद्या होणारे सामने सुद्धा बलाढ्य संघामध्ये होणार आहेत. दहा तारखेला अंतिम सामने होणार असून त्यामधून प्रथम द्वितीय व तृतीय स्थान निश्चित होणार आहे.

# अमरावतीमध्ये अ.भा.आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेचे उद्घाटन

## १८ विद्यापीठांचा सहभाग;पाच दिवस रंगणार सामने






[illegible]

वृत्त केसरी

१४ विद्यापीठांचा सहभाग

# आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेचे थाटात उद्घाटन

पाच दिवस रंगणार सामने

देशपातळीवर भव्य आयोजन

प्रतिनिधी/ वृत्त केसरी अमरावती, ७ फेब्रुवारी: संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) स्पर्धा २०२५-२६' चे भव्य उद्घाटन शुक्रवारी थाटात पडले.

सॉफ्टबॉलच्या इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांच्या राष्ट्रीय स्पर्धा एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी आयोजित करून अमरावतीने नवा इतिहास रचला आहे. उद्घाटन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, महाराष्ट्र सॉफ्टबॉल असोसिएशनचे सहसचिव डॉ. सुरजसिंह येवतीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे, डॉ. श्वेता बारहाते, डॉ. स्वाती ढोरे, निर्मलताई हर्षवर्धन देशमुख, प्रेरणाताई दिलीपबाबू इंगोले, मीनाताई विजय ठाकरे, शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाचे संचालक डॉ. तनुजा राऊत, सदस्य प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. सतीश पहाडे, डॉ. विकास टोणे, प्राचार्य डॉ. जी.व्ही. कोरपे, डॉ. रुपाली इंगोले, ए. आय. यू. चे निरीक्षक दिलीप तुरकी, स्पर्धेचे मुख्य परीक्षक मुकुंद देशपांडे आदी उपस्थित होते. तिरंगा असलेले फुगे मान्यवरांच्या हस्ते आकाशात सोडण्यात आले. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांनी केले.







प्रास्ताविक डॉ. तनुजा राऊत यांनी, संचालन डॉ. रेखा मग्गीरवार व डॉ. मुकुंद थोडे यांनी केले, तर आभार डॉ. रुपाली इंगोले यांनी मानले. डॉ. अर्चिता यावलकर यांनी प्रेरणादायी गीत सादर केले.

**खेळभावनांना जोडणे - जिल्हाधिकारी येरेकर**

जिल्हाधिकारी येरेकर यांनी सर्व खेळाडूंचे स्वागत केले. ते म्हणाले की, अमरावती ही अंबादेवी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांची भूमी आहे. या भूमीने देशाला नामवंत खेळाडू दिले आहेत. विविध राज्यांतून आलेल्या खेळाडूंमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, खेळ हे सर्व प्रांतांना एकत्र जोडण्याचे महत्त्वाचे साधन आहे. केवळ शिस्तबद्ध व्यक्तीच आयुष्यात खऱ्या अर्थाने प्रगती करू शकतो. खेळांमुळे आयुष्यात शिस्त येते, संघभावना आणि स्वतःवरचा विश्वास या गोष्टी खेळामुळे शिकायला मिळतात, ज्यामुळे खेळाडूंच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील विविध विद्यापीठांचे संघ सहभागी झाले आहेत.

# 'सॉफ्टबॉल'मध्ये अमरावती विद्यापीठ प्रथम

## विद्यापीठाचे राष्ट्रीय पातळीवर नाव उज्ज्वल

क्रीडा

▶ अमरावती, ब्युरो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत संत अमरावती विद्यापीठ संघाने दमदार आणि सातत्यपूर्ण कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या संघाला सुवर्णपदकाने गौरविण्यात आले. राजस्थान येथील पिंडवाडा येथील माधव विद्यापीठ संघाने रौप्य पदक मिळवले, तर कालिकट विद्यापीठ आणि महाराजा सूरजमल ब्रज विद्यापीठ, भरतपूर यांनी कांस्य पदकावर समाधान मानले. सर्व विजेत्या संघांना ट्रॉफी व पदक प्रदान करण्यात आले. स्पर्धेचा समारोप सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते होते. त्यांनी सहभागी सर्व खेळाडूंचे कौतुक केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीयस्तरावरील क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्याची समृद्ध परंपरा असून, शिस्तबद्ध व जबाबदार आयोजक म्हणून विद्यापीठाची देशभरात ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. दिलीप इंगोले, गजानन पुंडकर उपस्थित होते.



प्रतिदिन अखबार

# अमरावती विद्यापीठ का 'आव्हान' में जयघोष



## तीन व्यवस्थापकों का कुलगुरु के हाथों सत्कार

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 7 फरवरी- महामहिम राज्यपाल कार्यालय की ओर से अकोला स्थित पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ का आयोजित राज्यस्तरीय आपत्ति व्यवस्थापन प्रशिक्षण शिविर ह्यआव्हान-2025ह्व में संगाबा अमरावती विद्यापीठ ने उत्कृष्ट विद्यार्थी का सर्वोच्च सम्मान का घुमता कप हासिल करके राज्य के शैक्षणिक नक्शे पर अपनी छाप छोड़ी. इस ऐतिहासिक विजय के अवसर पर मुहिम के नेतृत्व करनेवाले जिला टीम व्यवस्थापकों का सम्मान समारोह 5 फरवरी को विद्यापीठ के पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृह में संपन्न हुआ.

इस अवसर पर रासेयो के संचालक डॉ.निलेश कडू व सभी टीम व्यवस्थापकों ने आव्हान-2025 का विजेता घुमता कप कुलगुरु डॉ.मिलिंद बारहाते को सम्मानपूर्वक सुपूर्द किया. इस अवसर पर विद्यापीठ के प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे, प्रभारी कुलसचिव डॉ.अजय लाड, विद्यार्थी विकास विभाग के संचालक डॉ.राजीव बोरकर और अधिसभा सदस्य डॉ.प्रशांत विघे प्रमुख रूप से उपस्थिति थे.

आव्हान शिविर के दौरान दिखाया गया उत्कृष्ट नियोजन और मार्गदर्शन के बदले जी.एस. कॉलेज, खामगांव के डॉ.नीता बोचे का उत्कृष्ट महिला टीम व्यवस्थापक को घूमता कप मिलने पर कुलगुरु डॉ.बारहाते के हस्ते विशेष सम्मान किया गया. उनके नेतृत्व में स्वयंसेवकों ने शिविर में सर्वोत्तम प्रदर्शन करने के बदले मान्यवरों ने उनकी सराहना की.

महाराष्ट्र के 24 विद्यापीठों से 1,122 विद्यार्थियों के सहभाग में अमरावती विद्यापीठ के 125 स्वयंसेवकों ने अपनी एक अलग ही पहचान निर्मित की. कुलगुरु डॉ.बारहाते ने अपने संबोधन में कहा कि, आपत्ति व्यवस्थापन में जिद और अनुशासन ही केवल पुरस्कार के लिए मर्यादित न होकर, वह समाज के प्रति रहनेवाले उत्तरदायित्व का सम्मान है. विद्यार्थियों के अनुशासन बध्दता, उत्कृष्ट प्रदर्शन और कार्यतत्परता के कारण ही विद्यापीठ को आव्हान चान्सलर्स ब्रिगेड की यह सफलता प्राप्त की जा सकी.

### पांचों जिलों के विद्यार्थियों का योगदान

रासेयो संचालक डॉ.निलेश कडू ने इस सफलता का श्रेय पांचों ही जिलों के विद्यार्थियों के कठोर परिश्रम को और टीम व्यवस्थापक के योग्य नियोजन को दिया है. विद्यार्थियों ने निकाली गई रैली में प्रस्तुत की गई उत्कृष्ट झांकी और प्रशिक्षण में अनुकरणशिलता उनकी विशेष योग्यता साबित हुई ऐसा उन्होंने कहा. इस सफलता के कारण अमरावती विद्यापीठ का सम्मान संपूर्ण राज्य में ऊंचा उठा है.

---

राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यापीठाचे सुयश

# श्रावणी रोटेचा कुलगुरू डॉ. बारहातेंच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, ७ फेब्रुवारीः वर्धा येथे नुकत्याच झालेल्या 50 व्या कमलनयन बजाज स्मृति राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यापीठाची श्रावणी श्रीकांत रोटे हिने चतुर्थ क्रमांक पटकावून विद्यापीठाचा नावलौकीक केला. याबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते कु. श्रावणी हिचा सत्कार करण्यात आला.



22 व 23 जानेवारी, 2026 या कालावधीत 'क्यों गांधी आज भी जीवित है?' या विषयावर शिक्षा मंडळ वर्धा तर्फे 50 वा कमलनयन बजाज स्मृती राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शिक्षा मंडळ, जमनालाल बजाज मार्ग, सिव्हिल लाईन, वर्धा येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून 84 विद्यापीठांनी आपला सहभाग नोंदविला. सदर वक्तृत्व स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याकरीता विद्यार्थी विकास विभागातर्फे सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी, बडनेरा रोड, अमरावती येथील कु. श्रावणी श्रीकांत रोटे या विद्यार्थीनीची निवड करण्यात आली होती. कु. श्रावणी हिने सदर स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावून रोख रक्कम रु. पाचहजार व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्राप्त करुन विद्यापीठाचा नावलौकीक केला आहे. याबद्दल कु. श्रावणीचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक, डॉ. राजीव बोरकर यांनी अभिनंदन केले आहे.

# आविष्कार स्पर्धेत अमरावती विद्यापीठाची उत्कृष्ट कामगिरी

## विद्यार्थ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार : विद्यार्थ्यांनी संशोधनातून स्वत:चे स्टार्टअप उभे करावे



अमरावती (प्रतिनिधी) दि.१९ : पुणे-मुंबईसारख्या महानगरांशी तुलना करता आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि कल्पकतेची अजिबात कमतरता नाही. येणारा काळ हा संशोधनाचा असून विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता आपल्या संशोधनातून स्वत:चे 'स्टार्टअप' उभे करावे आणि 'जॉब सीकर' (नोकरी मागणारे) होण्यापेक्षा 'जॉब गिव्हर' (नोकरी देणारे) बनावे, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठाच्यावतीने आविष्कार स्पर्धेत राज्यातून तिसरे स्थान मिळविल्याबद्दल सहभागी सर्व विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृह येथे सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलगुरू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे उपस्थित होते.

कुलगुरूंनी सर्वप्रथम राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून मार्गदर्शन करताना कुलगुरू पुढे म्हणाले, अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी, विशेषत: ग्रामीण भागातील मुले नाविन्यपूर्ण संशोधनात आघाडीवर आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बुलडाणा जिल्ह्यातील अजिंक्य पोटे या विद्यार्थ्याने 'अन्वेषण' स्पर्धेत थेट आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारून यश मिळविले. यावरून हे सिध्द होते की, आपल्या विद्यार्थ्यांचे 'इनोव्हेशन' जागतिक दर्जाचे आहे.

### यशाला पहिले पाऊल समजा

आविष्कार स्पर्धेत आज मिळालेले यश हा शेवट नसून, हे तुमच्या कारकिर्दीचे 'पहिले पाऊल' आहे, असे समजून जिद्दीने पुढे वाटचाल करा, असा मोलाचा सल्ला कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी अजिंक्य पोटे, रोहिणी कांबे, प्रिया जंजाळकर, सौरभ श्रीराव, रोहण बुंदेले, राजीवकुमार जीवतानी, कु. श्रावणी ठाकरे, कु. रेणुका येंडे या विद्यार्थ्यांचा कुलगुरुंच्या हस्ते सत्कार झाला. तसेच आविष्कार सेलचे अध्यक्ष डॉ. अजय लाड, समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, व्यवस्थापक डॉ. निरज घनवटे, डॉ. राजेश भोयर, डॉ. जयंत वडतकर तसेच शाहु महाविद्यालयाचे डॉ. शिरिष जैन व डॉ. प्रकाश केंद्रे, डॉ. तिडके यांचाही त्यांनी सत्कार केला. सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक भाषणातून आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी आविष्कार स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकडून करून घेतलेली तयारी, स्पर्धेचे नियोजन आदींविषयी माहिती दिली. संचालन करत आभार कु. खुशबु जयस्वाल हिने मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच शिक्षक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

# तरुण पिढीने शिवरायांच्या विचारांचा वारसा जपावा : कुलगुरु



अमरावती/का.प्र. शिवरायांच्या संस्कारांची आणि मूल्यांची आजच्या काळात गरज असून तरुण पिढीने शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपावा, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, कार्यकारी अभियंता श्री शशांक रोडे, प्रदर्शित कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

कुलगुरु पुढे म्हणाले आजच्या काळात सर्वांना आपल्या हक्कांची जाणीव आहे, परंतु आपण आपल्या जबाबदाऱ्या विसरत चाललो आहोत. तरुण पिढीने अमली पदार्थांच्या व्यसनासोबतच मोबाईलच्या व्यसनापासून दूर राहणे आवश्यक आहे. वाढता स्क्रीन टाईम तरुणांच्या मानसिक स्वास्थ्यावर आणि सहनशीलतेवर विपरीत परिणाम करत आहे. शिवजयंती म्हणजे केवळ रॅली किंवा उत्सव नसून, ती स्वतःच्या भूमिकेचे आणि राष्ट्रभक्तीचे आत्मचिंतन करण्याची संधी असल्याचेही ते म्हणाले. प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांनी समर्थ रामदास स्वामींनी शिवरायांचे वर्णन करताना लिहिलेल्या 'शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप' या ओळींचा उल्लेख करत शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची आठवण करून दिली. समाजाला आपल्या हक्कांची पूर्ण जाणीव आहे, परंतु आपण आपल्या जबाबदाऱ्या विसरत चाललो आहोत, अशी खंत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. मानवी शिस्तीचे महत्व अधोरेखित करताना ते म्हणाले स्वच्छतेतील त्रुटींसाठी प्रशासनाला दोष देतानाच, रस्त्यावर न थुंकणे ही आपलीही जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले. शिवजयंती केवळ रॅली काढून साजरी न करता, शिवरायांनी दिलेला राष्ट्रभक्तीचा मंत्र अंगीकारून आपण समाजासाठी आणि देशासाठी काय करू शकतो, याचे चिंतन प्रत्येकाने करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रा. शुभम वानखडे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. प्रास्ताविक भाषणातून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी १६ ते २१ फेब्रुवारी दरम्यान शस्त्र प्रदर्शन, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्फूर्ती गीत स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, एकपात्री प्रयोग स्पर्धा आणि पोवाडा आदी स्पर्धा आयोजनामागील भूमिका मांडली. वैभव म्हस्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली. पेटेन्ट मिळाल्याबद्दल डॉ. रत्नदीप खोब्रागडे यांचा, सॉफ्टबॉल स्पर्धेत मेडल मिळविल्याबद्दल राधिका उमेश दानखडे हिचा, तर उत्कृष्ट जनजागृती कार्यक्रमाबद्दल ईश्वरी पांडे हिचा कुलगुरूंनी सत्कार केला. याप्रसंगी सहा वर्षांचा शिवांश वैभव इंगळे याने 'छत्रपती संभाजी महाराजांवर', तसेच अनजित वानखडे व चमूने 'अफजलखानाचा वध' सुस्वरातील पोवाडा सादर केला. संचालन प्रा. आदित्य पुंड याने, तर आभार डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी मानले. कार्यक्रमाला उपकुलसचिव मनीष वरखेडे, किशोर मालवीय, डॉ. अनिल पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. प्रेमानंद तिडके तसेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

मार्गदर्शन • आविष्कार स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

# विद्यार्थ्यांनी संशोधनातून स्वत:चे स्टार्टअप उभे करावेत : कुलगुरू

प्रतिनिधी | अमरावती

पुणे-मुंबईसारख्या महानगरांशी तुलना करता आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि कल्पकतेची अजिबात कमतरता नाही. येणारा काळ हा संशोधनाचा असून विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता आपल्या संशोधनातून स्वत:चे 'स्टार्टअप' उभे करावे आणि 'जॉब सीकर' नोकरी मागणारे होण्यापेक्षा 'जॉब गिव्हर' नोकरी देणारे बनावे, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठाच्या वतीने आविष्कार स्पर्धेत राज्यातून तिसरे स्थान मिळवल्याबद्दल सहभागी सर्व विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृह येथे सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे उपस्थित होते.



आविष्कार स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

यावेळी कुलगुरूंनी सर्वप्रथम राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कुलगुरू पुढे म्हणाले, अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी, विशेषत: ग्रामीण भागातील मुले नाविन्यपूर्ण संशोधनात आघाडीवर आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील अजिंक्य पोटे या विद्यार्थ्याने अन्वेषण स्पर्धेत थेट आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारून यश मिळविले. यावरून हे सिध्द होते की, आपल्या विद्यार्थ्यांचे इनोव्हेशन'' जागतिक दर्जाचे आहे. आविष्कार स्पर्धेत आज मिळालेले यश हा शेवट नसून, हे तुमच्या कारकीर्दीचे पहिले पाऊल'' आहे. असे समजून जिद्दीने पुढे वाटचाल करा, असा मोलाचा सल्ला कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी अजिंक्य पोटे, रोहिणी कांबे, प्रिया जंजाळकर, सौरभ श्रीराव, रोहण बुंदेले, राजीवकुमार जीवतानी, श्रावणी ठाकरे, रेणुका येंडे या विद्यार्थ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार झाला. तसेच आविष्कार सेलचे अध्यक्ष डॉ. अजय लाड, आविष्कार सेल समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, व्यवस्थापक डॉ. निरज घनवटे, डॉ. राजेश भोयर, डॉ. जयंत वडतकर तसेच शाहु महाविद्यालयाचे डॉ. शिरिष जैन व डॉ. प्रकाश केंद्रे, डॉ. तिडके यांचाही त्यांनी सत्कार केला. सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्तविक भाषणातून आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी आविष्कार स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकडून करून घेतलेली तयारी, स्पर्धेचे नियोजन आदीविषयी माहिती दिली. संचालन करत आभार खुशबु जयस्वाल हिने मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच शिक्षक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

### स्टार्टअप्ससाठी विद्यापीठाचा ४५ स्टार्टअप्स नोंदणीकृत

बदलत्या काळाचा वेध घेताना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) चे उदाहरण दिले. ते म्हणाले, आज एआयमुळे सॉफ्टवेअर क्षेत्रात क्रांती होत आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे व्यापारीकरण करणे काळाची गरज आहे. आपल्या विद्यापीठातही इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सीड फंड दिला जातो. सध्या ४५ स्टार्टअप्स आपल्याकडे नोंदणीकृत आहेत, याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

---

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम

# छत्रपती शिवरायांचे विचार युवा पिढीने अंगिकारावे

प्रतिनिधी/ युवा केसरी

अमरावती, १९ फेब्रुवारी: छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ इतिहासाच्या पानात राहू न देता, आजच्या युवा पिढीने शिवरायांचे विचार अंगिकारावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आयोजित शिवकालिन शस्त्र प्रदर्शनीच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. मिनल मालधुरे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे शिवा काळे, आय.आय.एम.सी. चे संचालक डॉ. राजेश कुशवाह उपस्थित होते. कुलसचिव पुढे म्हणाले, शिवाजी महाराजांचे विचार हे आयुष्यातील महत्त्वाचे असतात. हा काळ जो युवक साक्षरपणे वापरेल, तो समाजासाठी नवी चमकणारी व्यक्ती बनू शकेल. सोशल मीडियाचा वापर करताना तंत्रज्ञानाचा वापर विधायक कामासाठी करावा असे सांगून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या विचारांचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. शिवा काळे म्हणाले, स्वतंत्रपणे संग्रह करून अमरावती जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळांची माहिती करण्यात आली, ते शस्त्र प्रदर्शनासाठी उपलब्ध होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय कौशल्यांचा वारसा जपण्यासाठी विद्यापीठाने विशेष अभ्यासक्रम सुरू केला आहे. याशिवाय शिवकालीन इतिहास लोकांपर्यंत नेण्यासाठी विशेष पत्रिकांचे प्रकाशन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. मिनल मालधुरे म्हणाल्या, विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे शिवजयंतीनिमित्त



कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचे आवाहन

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शस्त्रांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सांस्कृतिक वारसा या माध्यमातून जोपासण्याचा हा प्रयत्न असून या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची आवड निर्माण करणे, शस्त्रास्त्रांमागील विज्ञान जाणणे आणि महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा मुख्य उद्देश असल्याचे त्या म्हणाल्या. संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी १८ ते १९ फेब्रुवारी दरम्यान शिवजयंती उत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धेची माहिती दिली. संचालन आदित्य पुंड यांनी, तर आभार डॉ. अनघा देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# युवा पीढ़ी छत्रपति के विचारों की विरासत को संभाले : डॉ. बारहाते

## ▪ संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय में हुआ कार्यक्रम

**अमरावती** | संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय में छत्रपति शिवाजी महाराज की 396वीं जयंती उत्साह से मनाई गई। कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने कहा कि युवाओं को शिवरायों के विचार अपनाते हुए नशे और मोबाइल की लत से दूर रहना चाहिए।

कार्यक्रम में विभिन्न प्रतियोगिताएं आयोजित हुईं, प्रतिमाओं का पूजन किया गया और विद्यार्थियों को सम्मानित किया गया।

समारोह में अधिकारी, शिक्षक और विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित रहे। विश्वविद्यालय में पिछले चार दिनों से शस्त्र प्रदर्शनी, चित्रकला, रंगोली, स्फूर्ति गीत, एकांकी, एकपात्री अभिनय और पोवाड़ा जैसी प्रतियोगिताएं आयोजित की गईं। कार्यक्रम में संत गाडगे बाबा और डॉ. बाबासाहेब आंबेडकर की प्रतिमाओं का पूजन भी किया गया।



**आपली मातृभूमि**

## तरूण पिढीने शिवरायाच्या विचाराचा वारसा जपावा





## खेलो इंडिया स्पर्धा में पहुंची विद्यापीठ की टीम

वृत्त केसरी

## विद्यापीठाचा 'आव्हान' मध्ये विजयघोष!

# चमू व्यवस्थापकांचा कुलगुरूंच्या हस्ते गौरव



प्रतिनिधी/वृत्त केसरी

अमरावती, ८ फेब्रुवारीः महामहीम राज्यपालकार्यालयाच्या वतीने अकोलायेथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर 'आव्हान-२०२५' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने 'उत्कृष्ट विद्यापीठ' हा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर दबदबा निर्माण केला आहे. या ऐतिहासिक विजयाचे औचित्य साधून, मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या जिल्हा चमू व्यवस्थापकांचा गौरव सोहळा विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. निलेश कडू व सर्व चमू व्यवस्थापकांनी 'आव्हान-२०२५' चा विजेता फिरता चषक कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द केला. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. अजय लाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर आणि अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांची प्रमुख उपस्थिती होती. आव्हान शिबिरादरम्यान दाखवलेले उत्कृष्ट नियोजन आणि मार्गदर्शनाबद्दल जी. एस. कॉलेज, खामगाव येथील डॉ. नीता बोचे यांचा 'उत्कृष्ट महिला चमू व्यवस्थापक' फिरता चषक पटकावल्याबद्दल कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी शिबिरात सर्वोत्तम कामगिरी नोंदवल्याबद्दल मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. महाराष्ट्रातील २४ विद्यापीठांमधील ११२२ विद्यार्थ्यांच्या सहभागात अमरावती विद्यापीठाच्या १२५ स्वयंसेवकांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी भाषणातून नमूद केले की, आपत्ती व्यवस्थापनातील जिद्द आणि शिस्त ही केवळ पुरस्कारापुरती मर्यादित नसून, ती समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा सन्मान आहे. विद्यार्थ्यांची शिस्तबद्धता, उत्कृष्ट देखावा आणि कार्यतत्परता यामुळेच विद्यापीठाला 'आव्हान चान्सलर्स ब्रिगेड' मध्ये हे यश संपादन करता आले.

लोकमत

## विद्यापीठाचा 'आव्हान'मध्ये विजयघोष; चमूंचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क



अमरावती : राज्यपाल कार्यालयाच्या वतीने अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर 'आव्हान-२०२५' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने 'उत्कृष्ट विद्यापीठ' हा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर दबदबा निर्माण केला आहे. या विजयाचे औचित्य साधून, मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या जिल्हा चमू व्यवस्थापकांचा गौरव सोहळा विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव देशमुख अधिसभा सभागृहात संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. निलेश कडू व सर्व चमू व्यवस्थापकांनी 'आव्हान-२०२५' या विजेता फिरता चषक कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द केला. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. अजय लाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांची उपस्थिती होती. आव्हान शिबिरात दाखवलेले उत्कृष्ट नियोजन व मार्गदर्शनाबद्दल जी. एस. कॉलेज, खामगाव येथील डॉ. नीता बोचे यांचा 'उत्कृष्ट महिला चमू व्यवस्थापक' फिरता चषक पटकावल्याबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते विशेष सत्कार केला. त्यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवल्याबद्दल मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. राज्यातील २४ विद्यापीठांमधील ११२२ विद्यार्थ्यांच्या सहभागात अमरावती विद्यापीठाच्या १२५ स्वयंसेवकांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी आपल्या भाषणातून नमूद केले की, आपत्ती व्यवस्थापनातील जिद्द आणि शिस्त ही केवळ पुरस्कारापुरती मर्यादित नसून, ती समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा सन्मान आहे.

जनमाध्यम

## नेट परीक्षेत पदव्युत्तर मराठी विभागाच्या यशाची परंपरा यंदाही कायम



अमरावती/प्रा.प्र.

[illegible]

लोकमत समाचार

# भविष्य में विविध क्षेत्रों के नेतृत्व की कमान युवाओं के कंधों पर

## अमरावती विवि के दीक्षांत समारोह में बोले सेना के पूर्व प्रमुख मनोज पांडे

लोकमत समाचार सेवा

**अमरावती :** भारतीय सेना के पूर्व प्रमुख जनरल मनोज पांडे ने कहा कि युवा पीढ़ी ही आने वाले समय में विविध क्षेत्रों का नेतृत्व करेगी. युवा शक्ति ही भारत की प्रगति की सही पहचान होगी. वे सोमवार, 23 फरवरी को संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के 42 वें दीक्षांत समारोह में बतौर प्रमुख अतिथि अपने विचार व्यक्त कर रहे थे. कार्यक्रम की अध्यक्षता कुलपति डॉ. मिलिंद बारहाते ने की. इस अवसर पर प्र-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. आर. एम. कडू, शिवाजी शिक्षा संस्था के अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, डॉ. प्रवीण रघुवंशी सहित अन्य उपस्थित थे.

पूर्व सेना प्रमुख ने छात्रों को भविष्य में आने वाली चुनौतियों का समान करने के लिए 'थ्री सी' का मंत्र दिया. उन्होंने कहा कि चरित्र, क्षमता और आचरण सफलता के तीन आधारस्तंभ है. प्रामाणिकता, निष्ठा और नैतिक धैर्य अच्छे व्यक्ति के लक्षण हैं. यह गुण आपको योग्य मार्ग का चयन करने में मदद करेंगे. जीवन भर सीखने की प्रवृत्ति रखे. नई कल्पना स्वीकार करना समय की आवश्यकता है. केवल प्रयत्न कर रुके नहीं, बल्कि सकारात्मक परिणाम पर ध्यान केंद्रित करें.




अमरावती विवि के 42 वे दीक्षांत समारोह में संबोधित करते हुए भारतीय सेना के पूर्व प्रमुख जनरल मनोज पांडे

### एआई से सफलता की ऊंचाइयों को छूना चाहिए

कुलपति ने कहा कि आज का युग आर्टिफिशियल इंटेलिजेंस अर्थात 'एआई' का है. विद्यार्थियों को बदलते स्वरुप से घबराना नहीं चाहिए. उन्हें नए कौशल आत्मसात करना चाहिए. एआई से रोजगार के नए अवसर मिलेंगे. एआई को अपनाकर सफलता की ऊंचाइयों को छूना चाहिए.

# प्राध्यापक बनकर छात्रों को नई दिशा देने की हसरत

**अमरावती :** अमरावती विवि के 42 वें दीक्षांत समारोह में किसान की बेटी और नेहरु कला, वाणिज्य और विज्ञान कॉलेज, नेरपरसोपंत की छात्रा निकिता किशोर पुनसे ने सबसे अधिक 6 स्वर्ण तथा एक नगद पुरस्कार हासिल किया. निकिता पीएचडी करने के बाद प्राध्यापक बनकर छात्रों को नई दिशा देना चाहती है. नेर तहसील मुख्यालय से करीब 12-15 किमी दूरी पर स्थित मांगलादेवी गांव के किशोर पुनसे दो एकड़ खेती कर परिवार का भरणपोषण करते है.

निकिता की मां नंदा गृहिणी है. निकिता की बड़ी बहन की शादी हो चुकी है. जबकि उसका भाई छोटा है. बचपन से ही पढ़ाई में रुचि देखकर ही माता-पिता ने उसे पढ़ाई में पूरा सहयोग किया. निकिता ने कहा कि सभी युवाओं को शिक्षकों का मार्गदर्शन लेकर आगे बढ़ना चाहिए. निकिता के पिता ने कहा कि उन्हें अपनी बेटी पर पूरा भरोसा था. उसने वह भरोसा नहीं तोड़ा.



अपने माता और पिता के साथ निकिता.

# पुण्य नगरी

# विद्यार्थ्यांनो, विकसित भारतासाठी तीन 'सी'चा मंत्र जोपासा

**अमरावती विद्यापीठाचा ४२ वा दीक्षान्त समारंभ**

अमरावती : विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तरुणांच्या खांद्यावर असेल. त्यामुळे युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची व विकसित भारताची खरी ओळख आहे. मात्र त्यासाठी आजच्या तरुणा पिढीने चारित्र्य (कॅरेक्टर), क्षमता (कॉम्पिटन्स) आणि आचरण (कंडक्ट) या तीन 'सी'चा मंत्र जोपासला पाहिजे, असे आवाहन देशाचे माजी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी सोमवारी येथे केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षान्त समारंभ २३ फेब्रुवारीला संत गाडगेबाबांच्या जयंतीदिनी पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनोज पांडे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जुन्या विचारसरणीला आव्हान देऊन नवनवीन कल्पनांचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञान आपली क्षमता वाढवत असले, तरी भावनिक बुद्धिमत्ता आणि मानवी मूल्ये यांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही; परंतु तंत्रज्ञानाचा वापर करताना माणुसकी

## माजी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांचे आवाहन



### कमल गवई यांना 'डी.लिट.' प्रदान

विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभामध्ये डॉ. कमल गवई यांना मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयात वाङ्मय पंडित (डी. लिट) या सर्वोच्च पदवीने सन्मानित करण्यात आले. डॉ. कमल गवई यांनी आतापर्यंत १२ पुस्तकांचे लेखन केले असून, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवरही त्यांनी सदस्य म्हणून कार्य केले आहे. या कार्यक्रमाला कमल गवई यांचे सुपुत्र तथा माजी सरन्यायाधीश भूषण गवई हेसुद्धा उपस्थित होते.

विसरू नये, असा सावधगिरीचा सल्लाही मनोज पांडे यांनी दिला. कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते म्हणाले की, आजचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या बदलांना घाबरून न जाता नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. एआय हे रोजगाराची नवीन दालने उघडणारे तंत्रमित्र ठरेल. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य उपस्थित होते.

# दैनिक दिव्य मराठी

**मार्गदर्शन** • माजी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांचा दीक्षांत संदेश : सकारात्मक परिणामांवर लक्ष केंद्रित करण्याचा संदेश

# विकसित भारताची खरी ओळख म्हणजे आजची युवाशक्ती

प्रतिनिधी | अमरावती

[illegible]



विद्यापीठात दीक्षांत भाषण करताना माजी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे.

[illegible]

**यशासाठी 'तीन सी'चा मंत्र**

[illegible]

**दिव्य मराठी नॉलेज**

**डीजी लॉकरमधून डाउनलोड करता येणार पदवी**

[illegible]

## नवराष्ट्र

### विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचा सामाजिक उपक्रम

# मेळघाटातील गावामध्ये जनजागृती

▸ अमरावती, ब्युरो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने मेळघाटमधील आदिवासी गावांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना विविध प्रकारची माहिती देण्यात आली.

मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील घटांग, सेमाडोह, हरिसाल, धारणी, खार्याटेम्ब्रा, मोथा, पंचबोल, चिखलदरा अशा विविध गावांना भेटी देण्यात आल्या. गावागावांमध्ये आदिवासी बांधव तसेच युवकांना शासनाच्या विविध योजना, कार्यक्रम कीर्तनकार मंडळी तसेच विद्यार्थी व प्राध्यापकाच्या माध्यमातून, साउंड सिस्टिमच्या माध्यमातून ग्रामस्थांना माहिती देण्यात आली.

या जनजागृती मोहिमेमध्ये समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, अंशदायी शिक्षक डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा. साधना इंगोले, शिक्षकेतर कर्मचारी प्रवीण घर्डीणकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी राजकुमार सयाम, रमेश पवार, गोपाल वानखडे, दिलीप धावणे तसेच विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जनजागृती मोहीमेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आदिवासी समाजातील वास्तव अनुभवण्याची संधी मिळाली. समाजाभिमुख शिक्षणाची ही परंपरा भविष्यातही कायम राहील, असे मत यावेळी संशोधक, तसेच विद्यार्थी व प्राध्यापकांनी व्यक्त केले.

### आरोग्यविषयक विविध समस्या घेतल्या जाणून

त्याचबरोबर आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण, रोजगार, सामाजिक सुरक्षेच्या योजनांबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थी व प्राध्यापकांनी गावातील आदिवासी महिला व पुरुषांशी संवाद साधून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. तसेच त्यांच्या जीवनशैली व सद्यस्थितीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला. त्यामुळे आदिवासी समाजासमोरील वास्तव परिस्थिती समजून घेण्यास मदत झाली.


## नवराष्ट्र

# युवाशक्ती देशाच्या प्रगतीची ओळख

### जनरल मनोज पांडे यांचे प्रतिपादन; अमरावती विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ

▸ अमरावती, ब्युरो. तरुण पिढी ही केवळ देशाचे नागरिक नसून ती भारताच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग आहे. येणाऱ्या काळात विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तुम्हा तरुणांच्या खांद्यावर असेल, युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचे प्रेरणादायी उद्गार भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना जनरल मनोज पांडे यांनी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी 'तीन सी' चा मंत्र दिला. चारित्र्य, क्षमता आणि आचरण हे यशाचे तीन आधारस्तंभ आहेत. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि नैतिक धैर्य हे उत्तम माणसाचे लक्षण आहे. विद्यार्थ्यांनी हेच गुण तुम्हाला योग्य मार्ग निवडण्यास मदत करतील. आपल्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्य सतत अद्ययावत ठेवा. आयुष्यभर शिकण्याची वृत्ती जोपासा.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, विद्यापीठ गीत व सरस्वती स्तवनाने दीक्षांत समारंभाची सुरुवात झाली. पाहुण्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अतिथींचा परिचय करुन दिला. ... यावेळी व्यासपीठावर भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्यासह समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर. एम. कडू, हर्षवर्धन देशमुख, डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. आर. डी. सिकची, डॉ. व्ही. एच. नागरे, डॉ. व्ही. एम. मेटकर, डॉ. विद्या शर्मा, डॉ. ए. एम. बोंडे, डॉ. मनीषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे यांच्यासह अन्यांची उपस्थिती होती. संचालन डॉ. सुलभा पाटील व डॉ. प्रणव कोलते यांनी केले. पसायदानाने व राष्ट्रगीताने दीक्षांत समारंभाची सांगता झाली. कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश भूषण गवई, त्यांच्या मातोश्री कमलताई गवई, महात्मा गांधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही.एस. जामोदे, डॉ. प्रसाद वाडेगावकर, माजी कुलसचिव डॉ. चंदन मोहोड, प्रा. सी.डी. देशमुख, डॉ. बी.आर. वाघमारे, डॉ. तुषार देशमुख यांच्यासह अन्यांची उपस्थिती होती.



### कृत्रिम बुद्धिमत्तेशी जुळवून शिखरे गाठा : कुलगुरू

आजचे युग हे 'एआय' अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या बदलांना घाबरून न जाता नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. एआय हे रोजगाराची नवीन दालने उघडणारे तंत्रमित्र ठरेल, असे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मिलिंद बाराहाते यांनी अध्यक्षीय भाषण करताना व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, विद्यापीठाशी सध्या ३५१ महाविद्यालये संलग्न असून सुमारे २ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावर्षी ४२३१७ विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या.

### ८० टक्के पदके मुलींनी पटकाविली

नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेर परसोपंत येथील निकिता फुलके ने ६ सुवर्ण, १ रोख पारितोषिक, एस. आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील पल्लवी राठोडने ५ सुवर्ण व रौप्य १ रोख, श्रीसंत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगाव येथील तेजस्विनी भगत आणि विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील साईश्वरी इंदुरकर या विद्यार्थिनींने प्रत्येकी ४ सुवर्ण पारितोषिके प्राप्त केली. समारंभात ८० टक्के पदके मुलींनी प्राप्त केले आहेत.

विदर्भ मतदार

■ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा ४२ वा दीक्षांत समारंभ उत्साहात ■

# युवाशक्तीच्या खांद्यावर राहणार विविध क्षेत्रातील नेतृत्वाची धुरा



## माजी लष्करप्रमुख मनोज पांडे यांचे प्रतिपादन

## दीक्षांत समारंभात विद्यार्थिनींचा बोलबाला

अमरावती (प्रतिनिधी) दि.२३ : तरुण पिढी ही केवळ देशाचे भविष्य नसून ती भारताच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग आहे. येणाऱ्या काळात विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तुम्हा तरुणांच्या खांद्यावर असेल, युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचे प्रेरणादायी उद्गार भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काढले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या दीक्षांत समारंभात विद्यार्थिनींचा बोलबाला दिसून आला. ८० टक्के पदके व पारितोषिके विद्यार्थिनींनी पटकावित महिला शक्तीचा नारा बुलंद केला.



सर्वाधिक पारितोषिके प्राप्त करणाऱ्या निकिता पुसे पुरस्कार प्रदान करताना मान्यवर.

### कृत्रिम बुद्धिमत्तेशी जुळवून घेत विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे पादाक्रांत करावीत : कुलगुरू



■ शेतकऱ्याच्या मुलीची शैक्षणिक झेप ■

## सहा सुवर्णपदके जिंकत प्राध्यापक होण्याचा निर्धार



वडिलांनी निकिताला शिक्षणासाठी ... विद्यापीठ ... पदके ... पुर्ण पाठबळ दिले. त्यांच्या ... उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

### गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव

### ४६६ संशोधकांना आचार्य पदवी प्रदान

लोकमत समाचार

**आयोजन** संत गाड़गे बाबा अमरावती विश्वविद्यालय के 42 वें दीक्षांत समारोह में 42,317 विद्यार्थियों को डिग्री, 466 को पीएचडी प्रदान

# किसान की बेटी निकिता ने 6 स्वर्ण पदक प्राप्त किए

लोकमत समाचार सेवा



संत गाड़गे बाबा अमरावती विश्वविद्यालय 42 वें दीक्षांत समारोह में भारतीय सेना के पूर्व सेनाध्यक्ष मनोज पांडे, अमरावती वि.वि. के कुलपति डॉ. मिलिंद बारहाते ... निकिता पुसे को मेडल प्रदान करते हुए.

### विद्यार्थियों में हर्ष का माहौल

### वि.वि. की स्थापना को 43 साल पूरे हुए



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

### मार्गदर्शक



**श्री जिष्णू देव वर्मा**

मा. राज्यपाल तथा कुलपती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र-कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### प्रकाशक



**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### संपादक



**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ